# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/०१

निर्णय दिनांक   १७-०१-२००९

१ अण्णासाहेब रामकृष्ण काळे, — अपिलार्थी

मु. झोळे, पो. चंदनापुरी, तालुका संगमनेर,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी | : | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर |
| जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज करुनही दिनांक १२-०९-२००७ पर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि या

अपिलावरही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झाली नसल्याने त्यांनी, आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील केले आहे. त्यांच्या या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत सन १९९५ ते दिनांक ३०-०७-२००७ या कालावधीशी संबंधीत नवीन माध्यमिक शाळेच्या मान्यतेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात एकूण दहा मुद्दयांव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. यानंतर जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २१-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविली. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविली असून अपिलार्थीस ही माहिती पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे, तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे त्वरित उपलब्ध होऊ शकली ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०९-२००७ रोजी पाठविली व उर्वरित बहुतांश माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, शिक्षण संस्थेच्या संदर्भातील तपशीलवार माहिती शोधण्यासाठी त्यांना अजून एक महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यांच्या कार्यालयाचे स्थापने पासून आजपर्यंत एकूण चार वेळा स्थलांतर झाल्याने व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जुन्या काळातील असल्याने अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी विलंब लागणार आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा कथित दिनांक १२-०९-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठी होती. अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे केलेले प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना उद्देशून केले होते, तथापि अपिलार्थीने सदर अपील अर्ज जिल्हा परिषद कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही अथवा याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीस उपस्थित नाहीत. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज, उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही, अशा परिस्थितीत आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी बहुतांश माहिती त्यांच्याबरोबर आणली आहे व ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीमध्ये तीन शिक्षण संस्थांचा समावेश असून यापैकी एका शिक्षण संस्थेची पूर्णतः व उर्वरित २ शिक्षण संस्थांची काही कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत व उर्वरित कागदपत्रे ते अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यात शोध घेऊन ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०९-२००७ रोजी पाठविलेली माहिती, अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविण्याची विनंती करुन सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झ ााल्याचा उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये केलेला नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस यापूर्वी दिनांक २१-०९-२००७ रोजी पुरविलेली माहिती व त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाव्दारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस त्यांनी दिनांक २१-०९-२००७ रोजी पुरविलेली व आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व इतर शिक्षण संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर
दिनांक १७-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ अण्णासाहेब रामकृष्ण काळे, मु. झोळे, पो. चंदनापुरी, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/०२

निर्णय दिनांक १७-०१-२००९

१ सौ. सुलोचना लक्ष्मण कोल्हे, अपिलार्थी
इंदिरा पथ, डॉ. आढाव हॉस्पिटल जवळ, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,
कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांना, त्यांनी दिनांक ०४-०११-२००७ रोजी, या प्रकरणी प्रथम अपील केले असता त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना या पत्राव्दारे

उपलब्ध करुन दिली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, सुनावणी अथवा अन्य माध्यमाव्दारे कोणताही निर्णय दिला नाही, मात्र त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कोपरगांव यांनी कोणती माहिती अर्धवट दिली त्याचा खुलासा केला नाही व अपिलार्थीने ज्या आदेशाविरुध्द प्रथम अपील केले त्या आदेशाची प्रत अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जासोबत जोडली नसल्याचे नमूद करुन अपिलार्थीस त्यांच्या या आक्षेपांची पुर्तता करण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने या आक्षेपांची पुर्तता केली नसल्याने, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊ शकली नाही, असे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन, दिनांक ०५-१०-२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविलेल्या या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ A (१) व (२) शी संबंधीत माहिती अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली गेली नाही, असे दिसून येते. तसेच अपिलार्थीस सचिव (महसूल) यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी नंबर जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेला नाही, ही माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कबूल केले असल्याने, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेण्याची कृती सर्वथा गैर असून, जर त्यांना अपिलार्थीचा अपील अर्ज अपूर्ण आहे असे वाटत होते तर त्यांनी, त्याप्रमाणे अपिलार्थीच्या अर्जावर निर्णय घेऊन अपिलार्थीस तसे कळविणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती केल्याचे या ठिकाणी आढळून येत नाही. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार त्याच्याकडे दाखल होणा-या प्रत्येक अपील अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार सतर्कतेने कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर

दिनांक १७-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. सुलोचना लक्ष्मण कोल्हे, इंदिरा पथ, डॉ. आढाव हॉस्पिटल जवळ, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/०३

निर्णय दिनांक १७-०१-२००९

१ श्री. आप्पासाहेब गोपीनाथ दुशिंग, अपिलार्थी
मु. पो. निमगांवखैरी, तालुका श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय सह निबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग,
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले केले आहे की, त्यांनी श्रीरामपूर पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, श्रीरामपूर या संस्थेच्या दिनांक ३१-०३-२००५ व दिनांक ३१-०३-२००६ च्या ताळेबंदातील येणे कर्जाच्या रकमांची कर्जदारनिहाय यादी मिळणेबाबत जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे दिनांक ०७-०४-२००७ रोजी विहित नमुन्यात अर्ज केला होता. यावर जिल्हा उप निबंधक यांनी

श्रीरामपूर पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेस त्यांनी मागणी केलेली माहिती तत्काळ देण्याचे दिनांक १२-०४-२००७ रोजी सूचित केले. तथापि या आदेशानुसार वेळोवेळी बँकेकडे चकरा मारुन व चौकशी करुनही त्यांना सदर माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्याकडे दिनांक ०५-११-२००५ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-११-२००७ रोजी ठेवलेल्या सुनावणीचे पत्र त्यांना दिनांक २८-११-२००७ रोजी प्राप्त झाल्याने त्यांना सदर सुनावणीस हजर राहता आले नाही. या अपील अर्जावर निर्णय देतांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे बँकेचे कार्यक्षेत्र जिल्हा स्तरावरील असल्याने अपिलार्थीस जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे प्रथमतः अपील करणे आवश्यक असतांना त्यांनी चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील केले असल्याचे कारण दर्शवून त्यांचे प्रथम अपील नामंजूर केले आहे. त्यांच्या अपिलावर विभागीय सह निबंधक यांनी आदेश देणे अपेक्षित असतांनाही त्यांनी अपिलार्थीस सुनावणीचे टपाल जाणुनबुजून उशिराने पाठविले. व त्यांनी मागणी केलेली माहिती अर्जदारास देण्याबाबत उचित कारवाई न केल्याने संबंधितांविरुध्द उचित आदेश पारित व्हावेत, अशी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस जिल्हा उप निबंधक व विभागीय उप निबंधक यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०४-२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती, संबंधीत बँकेस देण्यासाठी जिल्हा उप निबंधक यांनी त्यांच्या दिनांक १२-०४-२००७ रोजीच्या पत्रामध्ये सूचित केले आहे. श्रीरामपूर पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे कार्यक्षेत्र अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जिल्हा स्तरावरील असल्याने त्यावेळी, या बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे माहिती अधिकारी होते व जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांची अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली होती. या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार विभागीय सह निबंधक, नाशिक यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि जिल्हा स्तरावरील बँकेच्या संदर्भात, अधिनियमातील कलम १९ (१) नुसार दाखल होणा-या अपिलावर निर्णय घेण्याची त्यांची अधिकारिता नसल्याने त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. आज रोजी श्रीरामपूर पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक ही नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये विलीन झाली असून, या बँकेचे क्षेत्र राज्यस्तरीय आहे. राज्यस्तरीय क्षेत्र असलेल्या बँकेच्या संदर्भात अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे हे पाहता, या प्रकरणी अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी

अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे इष्ट राहील. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास वरीलप्रमाणे अवगत केल्यावरुन अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत त्यांच्या दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस अपर आयुक्त व विशेष निबंधक, यांचे यासंदर्भातील आदेश मान्य न झाल्यास ते अधिनियामातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, प्रथम अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करु शकतील. अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये विभागीय सह निबंधक सहकारी सस्था, नाशिक यांनी त्यांना सुनावणीचे टपाल जाणुनबुजून उशिराने पाठविले असल्याने व त्यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यासंदर्भात उचित कारवाई न केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द उचित आदेश पारित करण्याची आयोगास विनंती केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आप्पासाहेब गोपीनाथ दुशिंग, मु. पो. निमगांव खैरी, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४०४

निर्णय दिनांक १७-०१-२००९

१ श्री. गंगाधर मुरलीधर वैद्य, अपिलार्थी

घर नं. ४४१०, निंबाळकर गल्ली,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्राचार्य, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,

अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा प्राचार्य, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,

अहमदनगर

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : मानद कार्यवाह, आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, प्राचार्य, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक ०८-०१२-२००६ रोजी केलेल्या मूळ अर्जावर, त्यांना अद्याप उत्तर प्राप्त झाले नाही, असे नमूद केले आहे. तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-११-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी

कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्याचे नमूद केले आहे. त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे नमूद केले असून त्यांनी मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी त्यामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०८-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००० ते जून २००४ अखेरपर्यंतच्या पगाराची तपशीलवार आकडेमोडीची माहिती मागितली होती. याच अर्जामध्ये त्यांनी, अपिलार्थीस २००० पूर्वीही जर काही पगार कमी दिला गेला असेल तर त्याही रकमेचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस यासंदर्भात त्यांच्या पगाराच्या फरकाचा वर्षनिहाय तपशील दर्शविणारी माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झ ाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून आले नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्याप्रमाणे माहिती मागितली होती त्यासारखीच माहिती या महाविद्यालयातील श्री. श्रीधर जाकुजी दरेकर यांनी मागितली असता त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची माहिती महाविद्यालयाचा संदर्भ क्रमांक ७००, दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. मात्र हीच माहिती अपिलार्थीस संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही. या माहितीकरिता अपिलार्थी हे दोन वर्षे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या संपर्कात होते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापही माहिती न पुरविल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी व त्यांना श्री. दरेकर यांना ज्या पध्दतीने माहिती दिली गेली आहे त्या पध्दतीने जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी यापूर्वीच वेळोवेळी पुरविली असून याच माहितीची मागणी अपिलार्थीने वारंवार त्यांच्याकडे केली आहे. अपिलार्थीस त्यांच्या दुस-या अर्जाच्या संदर्भात ही माहिती पुरविली असल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत, तथापि अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे श्री. दरेकर यांना ज्या स्वरुपात माहिती दिली त्या स्वरुपात अपिलार्थीस माहिती देण्यास ते आता तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक ०८-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००० ते जून २००४ या कालावधीमध्ये जो पगार कमी मिळाला होता त्याच्या तपशीलासह माहिती मागितली होती. या प्रकरणी अपिलार्थीच्या वेतनात सुधारणा होऊन सन १९८८ ते २००४ या कालावधीतील वेतनाचा फरक त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाला आहे. त्यामुळे ही रक्कम काढतांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देय वेतन व त्यांना प्रत्यक्ष प्राप्त झालेले वेतन यांचा तुलनात्मक तक्ता करुन अपिलार्थीस दिलेल्या एकूण फरकाची रक्कम काढली असणार. अपिलार्थीस या तुलनात्मक तक्त्याची माहिती दिल्यास त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होईल असे येथे दिसून येत आहे. त्यांनी श्री. दरेकर यांना अशा प्रकारची माहिती दिल्याचे आयोगास संबंधीत कागदपत्रांची पाहणी करता आढळून आले आहे. अशा प्रकारची माहिती अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर युक्तिवादामध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीस त्यांच्या दुस-या अर्जाच्या संदर्भान्वये ही माहिती पुरविली गेली आहे असा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दावा केला, तथापि सदर दावा आयोग मान्य करत नाही, कारण अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केल्यानंतर या अर्जाच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती स्वतंत्रपणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देणे भाग होते. तथापि त्यांनी अशी कृती न केल्याने आता त्यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन घ्यावी लागेल. सबब, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रामध्ये पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती म्हणजे अपिलार्थीस देण्यात आलेल्या फरकाची वर्षनिहाय एकूण रक्कम असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या माहितीशी ही माहिती विसंगत

आहे, कारण अपिलार्थीने प्रत्येक महिन्याच्या फरकाच्या रकमेचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे तपशील मागितला असता, प्रत्येक वर्षाच्या फरकाची रक्कम अपिलार्थीस ठोक स्वरुपात व कोणत्याही तपशीलाशिवाय कळविली आहे. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे विसंगत माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस विसंगत माहिती देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब अध्यक्ष, आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, अहमदनगर यांना संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. अध्यक्ष आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, अहमदनगर यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गंगाधर मुरलीधर वैद्य, घर नं. ४४१०, निंबाळकर गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मानद कार्यवाह, आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४०५

निर्णय दिनांक १७-०१-२००९

१ श्री. राधेशाम पांडुरंग जगताप, — अपिलार्थी
स. नं. ७/४, माझिरेचाळ, गल्ली नं. ८, कॅनॉलरोड खाली,
कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १५-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती दिली नाही, त्यांच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दंडात्मक कारवाई न करता त्यांचे अपील निकाली काढून अपिलात माहिती दिली, असे नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०५-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत दिनांक ०१-०३-१९९४ ते ३०-०४-२००७ या कालावधीशी संबंधीत त्यांच्या विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालयामध्ये प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर यांच्या मंजूर पदांची महाविद्यालयनिहाय संख्या, ही माहिती विचारली होती. अपिलार्थीने सदर अर्ज अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला होता. तो अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०५-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही, मात्र अपिलार्थीने अपील केल्यानंतर अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिनांक ०९-०७-२००७ रोजी माहिती पुरविली गेली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून १६ दिवस विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विलंबाचे कारण विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडील सन १९९४ ते २००७ या कालावधीशी संबंधीत माहिती विचारली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रयोगशाळा परिचर/ग्रंथालय परिचर अशी ६१ पदे कायमस्वरुपी त्यांच्या आस्थापनेवर मंजूर केलेली नाहीत, ही पदे प्रत्येक योजनेच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी विशिष्ट कालावधीसाठी मंजूर केली जातात त्यामुळे अस्थापनेवरील पदांची संख्या प्रतीवर्षी बदलत असते. यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना कृषि विभागाच्या वित्त विभागाकडून प्राप्त करुन घेणे गरजेचे होते. वित्त विभागाकडून त्यांना वेळेवर माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लागला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नव्हती. त्यांना अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी त्यांच्या वित्त शाखेवर अवलंबून राहावे लागणार होते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या

तरतुदीनुसार जन माहिती अधिका-यास कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे कर्मचारी / अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक / अधिकारी हे एकत्रितपणे जबाबदार ठरत आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुदतीत न देऊन या सर्वांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब, कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस मूळ अर्जातील माहिती प्राप्त झाली असल्याने व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राधेशाम पांडुरंग जगताप, स. नं. ७/४, माझिरेचाळ, गल्ली नं. ८, कॅनॉलरोड खाली,

कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४०६

निर्णय दिनांक १७-०१-२००९

१ श्री. शिवाजी गणपत दरंदले, अपिलार्थी
मु. पो. सोनई, तालुका नेवासा,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सोनई, तालुका नेवासा, जिल्हा
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नेवासा, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १५-०१-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नेवासा यांनी ग्रामविकास अधिकारी यांच्या विरुध्द केलेल्या अपिलाची योग्य त-हेने चौकशी न करता तालुका

पंचायत अधिकारी, नेवासा यांच्या चुकीच्या अहवालाच्या आधारे दिनांक १७-११-२००६ रोजीचे चुकीचे आदेश काढून ग्रामविकास अधिकारी यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांनी हे अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "नमुना नं. ८ च्या उता-यातील तपशील, ग्रामपंचायत मिळकत नमुना नंबर ८ चा उतारा नक्कल फी तपशील, नक्कल फी, रुजावात फी, कागद फी, प्रती वर्ष सविस्तर माहिती मिळण्याबाबत" - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी ग्रामपंचायत उता-यासाठी अनाधिकाराने जादा फी वसूल केल्याचे व जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न देता माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलासंदर्भात संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस खालीलप्रमाणे उत्तर दिले.

"उपरोक्त विषयांन्वये आपले आपील संदर्भात विस्तार अधिकारी (पं) यांनी चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानूसार ग्रामपंचायत सोनई नियमा प्रमाणे उतारे व ईतिवृत्त झेरॉक्सची नक्कल बाबतची फी ही जमा केलेली आहे. सदरच्या पावत्याची नोंद सामान्य कॅशबुकाला घेतलेली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत सोनई यांनी आकारलेली फी बरोबर आहे. त्यामुळे आपले आपील निकाली काढणेत येत आहे." जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या ग्रामपंचायत कार्यालयात सप्टेंबर २००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी त्यांना दिली आहे. अपिलार्थीस त्यांनी नेमकी कोणती माहिती दिली हे ते आयोगास दाखवू शकले नाहीत, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात दिनांक २०-११-२००६ व ११-१२-२००६ दोन वेळा सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थी गैरहजर असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १७-११-२००६ रोजी निर्णय दिला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांना पुरविणे फार अवघड होती अशातली कोणतीही बाब येथे संभवत नाही. आज रोजी युक्तिवादाच्या वेळी सध्याचे जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या मागणीप्रमाणे त्यांच्या प्रथम अपील निर्णयाबाबत कोणताही समाधानकारक खुलासा सादर करु शकले नाहीत. आयोगास त्यांनी दाखविलेली माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी पूर्णतः विसंगत होती. त्यांच्या आयोगाकडील सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तिवादावरुन त्यांना या प्रकरणाची आवश्यक तेवढी माहिती नसल्याचे दिसून येते. त्यांच्या अशा प्रकारच्या अकार्यक्षेमतेची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवाजी गणपत दरंदले, मु. पो. सोनई, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सोनई, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४०७

निर्णय दिनांक १७-०१-२००९

१ श्री. ज्ञानदेव उत्तम दरंदले, अपिलार्थी
मु. पो. सोनई, तालुका नेवासा,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा दुय्यम निबंधक, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१,
अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : १ श्री. रविंद्र सदाशिव जोशी
२ श्री. ज्ञानेश्वर मधुकर जोशी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २६-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले केले आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, अहमदनगर यांनी अपिलाची सुनावणी न करता दुय्यम निबंधक, नेवासा यांना पाठीशी घालून

सदर अपील सुनावणीकामी मदतनीस म्हणून फक्त वकील नेमण्याची सक्ती करुन प्रतिनिधीमार्फत म्हणणे देण्यास हेतुपुरःस्सर व जाणीवपूर्वक टाळाटाळ करुन माहिती देण्याचे नाकारले व त्या अनुषंगाने कोणताही प्रकारचा पत्रव्यवहार करु नये म्हणून ताकीद देऊन कोणताही आदेश पारित केला नाही, म्हणून त्यांना हे अपील करणे भाग पडले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत दिनांक ०१-०१-२००१ ते २०-१०-२००६ या कालावधीमधील त्रयस्थ पक्षासंदर्भातील काही माहिती एकूण पाच मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे संपूर्ण तपशीलासह कळविले. अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात भरले किंवा कसे याबाबत उपस्थित जन माहिती अधिकारी कोणताही खुलासा करु शकले नाहीत. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती (एकूण पृष्ठे १४) त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००६ रोजी दिल्याचे आयोगास सांगितले. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-१२-२००६, २९-०१-२००७ व ०५-०३-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीस अपिलार्थी हजर न राहिल्याने या सुनावणी संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय घेतला गेला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, दिवाणी प्रक्रियेच्या संहितेतील तरतुदीनुसार त्यांनी अपिलार्थीस केलेल्या पत्रव्यवहारामध्ये अपिलार्थीस सहाय्य करण्यासाठी मदतनीस म्हणून प्रतिनिधीस मनाई केली होती.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याविरुध्द अपिलार्थी वारंवार खोट्या तक्रारी करत असतात आजतागायत त्यांनी केलेल्या तक्रारीत शेवटी काहीही तथ्य आढळून आले नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विषयी दिलेल्या माहितीबद्दल त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक ०२-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीबरोबर या प्रकरणी केलेल्या पत्रव्यवहारामध्ये त्यांना वारंवार कोणताही मदतनीस सुनावणीसाठी त्यांनी आणू नये अशा अर्थाची व त्यांचे म्हणणे फक्त वकीलास मांडता येईल अशी आग्रहाची सूचना केल्याचे दिसून येते. ही सूचना अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज रोजी आयोगासमोर दिवाणी प्रक्रिया संहितेमधील तरतुदींच्या आधारे केल्याचे दिसून येते, असे आयोगास सांगितले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींप्रमाणे प्रथम अपिलावर निर्णय देतांना यासंदर्भात अपिलार्थीस पत्रव्यवहार करतांना दिवाणी प्रक्रिया संहितेप्रमाणेच काम करावे, अशा प्रकारे कोणतेही बंधन जन अपिलीय अधिकारी यांच्यावर असल्याची तरतूद अधिनियमामध्ये नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे फक्त वकीलामार्फत मांडता येईल, त्यांनी मदतनीस आणू नये अशा केलेल्या सूचना निरर्थक आहेत. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस तीन वेळा त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली होती, यावेळी अपिलार्थी त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात मांडू शकले असते, तथापि अशा प्रकारची लिखित कारवाई अपिलार्थीने या प्रकरणी केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरःस्सर व जाणुनबुजून टाळाटाळ केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली आहे, मूळात अपिलार्थीने एकूण ५८ रुपये इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी भरले हे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगास सांगू न शकल्याने त्यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात अथवा शासकीय कोषागारात त्यांना मिळालेल्या माहितीपोटीचे प्रतिपृष्ठ रुपये २ या दराने भरलेले शुल्क अधिक पोस्टाच्या खर्चाची रक्कम त्यांनी, अपिलार्थीने शासकीय कोषागारात अथवा त्यांच्या कार्यालयात भरलेल्या रकमपेक्षा जास्त असेल तर अपिलार्थीस उर्वरित रक्कम परत करावी. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अर्धवट, अपुरी व चुकीची दिली आहे व त्यांची दिशाभूल केली आहे हे त्यांचे म्हणणे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित नव्हते तसेच आजही ते सुनावणीसाठी गैरहजर आहेत. अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांनी माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी ते आज उपस्थित नाहीत. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ज्ञानदेव उत्तम दरंदले, मु. पो. सोनई, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४
निर्णय दिनांक १९-०१-२००९

१ श्री. संजय शिवाजी डापसे, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अन्नधान्य वितरण अधिकारी, अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर.

त्रयस्थ पक्षः स्वस्त धान्य दुकान क्र.७ चे मालक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०१.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून अपिलार्थीने आयोगास असे अवगत करुन दिले आहे की, त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अद्यापही प्राप्त झालेली नाही. त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ७.११.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपील न चालविता, हेतुपूरस्सर संगनमताने माहिती

देण्यास कसूर केला आहे, त्यामुळे संबंधित गैरकायदेशीर कृतीबाबत माहिती अधिकारी,प्रथम अपिलीय अधिकारी यांना शास्ती आकारुन शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः दि. २८.९.२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "स्वस्त धान्य दुकान क्र. ७ जुना दाणे डबरा,या दुकानातील ए.पी.एल.गहू विक्री रजिस्टरची नक्कल, बी.पी.एल.विक्री रजिस्टरची व अंत्योदय विक्री रजिस्टर, अन्नपूर्णा विक्री रजिस्टरची नक्कल तसेच बी.पी.एल,अंत्योदय व अन्नपूर्णा यांचे रेशनकार्डचे झेरॉक्स व पत्ते", अशी दि.१.१.२००७ ते ३१.१०.२००७ या कालावधीशी संबंधित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नसल्याचे दिसून येते. यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ७.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांत आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजपावेतो प्राप्त झाली नाही. अद्यापही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, ते या कार्यालयात दि. ८.१०.२००८ पासून कार्यरत असून, यापूर्वी श्री. आडागळे नावाचे अन्न धान्य वितरण अधिकारी (सध्या नांदेड येथे जिल्हा पुनर्वसन अधिकारी म्हणून कार्यरत) कार्यरत होते. त्यावेळी अपिलार्थीस

त्यांच्या कार्यालयाकडून कोणतीही माहिती पुरविली गेली नाही. मात्र आता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ते २० दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे, हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन, तसेच आयोगाचे कार्यालयातून सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत लेखी सूचनापत्राद्वारे तसेच श्री.दुसिंग,जिल्हा पुरवठा अधिकारी,अहमदनगर यांना दि.१३.१.२००९ रोजी ठीक ४.०० वा.दूरध्वनी संदेशाद्वारे कळवून देखील, आज सुनावणीस स्वतः जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांच्या कार्यालयातील त्यांचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे, कळण्यास मार्ग नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून, अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे (रेशनकार्डधारकांची माहिती वगळता) देय आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास मूळात जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन तसेच जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये केलेल्या युक्तिवादावरुन स्पष्ट होते. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवले असल्याचे अशाप्रकारे सिध्द होत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार प्रतिदिनी रु. २५०/-

याप्रमाणे एकूण रुपये २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत सरळ सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, त्यांना सदर निष्कर्ष मान्य असल्याचे गृहीत धरुन, हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील मान्य करण्यात येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली (रेशनकार्डधारकांची माहिती वगळता) त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रु. २५०/- याप्रमाणे एकूण रुपये २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : १९-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय शिवाजी डापसे,वंजारगल्ली,घर नं. १४८३,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५
निर्णय दिनांक १९-०१-२००९

१. श्री. मुकेश दिगंबर देवळालीकर, रा.अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, अहमदनगर.

प्रत्यक्षः जन माहिती अधिकारीः पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर
जन अपिलीय अधिकारीः पोलीस अधीक्षक, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे दि. २३.०१.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे व त्याचबरोबर त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: दि. ८.९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी विजय सिमरतमल बोरा व अनिस चुडीवाल, संजय चोपडा यांच्याविरुध्द त्यांच्या पत्नीच्या खोटया सहया करुन खोटे साठेखत तयार केल्याबद्दल त्यांनी पोलीस निरीक्षक,कोतवाली पोलीस स्टेशन,अहमदनगर, पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांच्याकडे दि.४.६.२००७ रोजी केलेल्या तक्रारअर्जावर काय कार्यवाही झाली, याची माहिती अहमदनगर यांच्या कार्यालयाकडे मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये व तद्नंतर दि. १५.१ व १६.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस चौकशीची स्थिती अवगत केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी या प्रकरणी अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.१२.२००७, १५.१.२००८, ९.२.२००८, २६.२.२००८ व १.४.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थी हे सुनावणीस हजर न झाल्याने सुनावणी होऊ शकली नाही. मध्यंतरीच्या काळात, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) अहमदनगर यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीमार्फत व्यक्तिशः देऊ केली होती. तथापि अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्यास नकार दिला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार असून आजही ते ती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांना देऊ केलेली माहिती ही त्यांच्या दि. ४.६.२००७ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भातील नसून ही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दुसऱ्या तक्रार अर्जासंदर्भातील होती.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः माहितीची मागणी केली होती, त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतः व्यक्तीशः उपस्थित राहून त्यांच्याकडून माहिती हस्तगत करणे या प्रकरणी मूलतः अभिप्रेत होते, तथापि या ऐवजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्वतःहून ही माहिती देण्याकरिता प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे व अपिलार्थीने ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केला नाही.

आज रोजी अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस ही माहिती त्यांनी दि. ८.९.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाच्या संदर्भाने दिल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देऊ केली आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात व्यक्तिशः माहिती अपेक्षिली असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील निकाली काढण्यात येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तीशः पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : १९-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुकेश दिगंबर देवळालीकर, फ्लॅट नं.१०१, आदर्श क्लासिक अपार्टमेंट,खिस्तगल्ली, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६
निर्णय दिनांक १९-०१-२००९

१ श्री. विठ्ठल एकनाथराव काळे, : अपिलार्थी
रा.रवंदे,ता.कोपरगाव जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,कोपरगाव,
जि. अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,संगमनेर,
जि. अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,कोपरगाव,
जि. अहमदनगर.
जन अपिलीय अधिकारीः तहसीलदार,कोपरगाव,
जि. अहमदनगर.

त्रयस्थ पक्षः श्री. दत्तात्रय विष्णू काळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे उपस्थित आहेत, जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०२.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना रवंदे शिवारातील नोंद क्र.१४६८ मधील नकला मिळाल्या नसल्याने, त्यांनी सदर अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः दि. २७.८.२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "मौ. रवंदे ता.कोपरगाव जि.अहमदनगर शिवारातील नोंद नं.१४६८ संबंधित कागदपत्रांची सन १९९४ सालातील नकला जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या. अपिलार्थीने या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ६ मुद्यांपैकी ५ मुद्यांद्वारे वेगवेगळया कागदपत्रांच्या नकला व एका मुद्याद्वारे नोंद क्र.१४६८ मंजूर करणाऱ्या मंडळ अधिकारी व तलाठी यांचे पूर्ण नाव व पूर्ण पत्ता, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२४.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असून ही माहिती योग्य ते शुल्क भरुन घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले व त्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती, सदरचे पत्र त्यांना प्राप्त झाल्यापासून ३ दिवसांनी हस्तगत केली असून ही बाब अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीमध्ये आयोगासमोर कबूल केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील उपविभागीय अधिकारी, संगमनेर जि.अहमदनगर या चुकीच्या प्राधिकरणाकडे केले असून या प्रकरणी तहसीलदार,कोपरगाव हे जन अपिलीय अधिकारी आहेत. त्यांच्याकडे उपविभागीय अधिकारी,संगमनेर यांच्याकडील दि. २.११.२००७ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज पाठविण्यात आला. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून

अपिलार्थीस प्रथम अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज सुनावणीचे वेळी, अपिलार्थी यांचे म्हणणे त्यांनी असे मांडले आहे की, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ ची नक्कल आणि मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्र.१ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ६.९.९४ रोजी मयत आसराबाई विष्णू काळे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत मागितली होती. यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, त्यांच्याकडे मयत आसराबाई विष्णू काळे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध नाही. या संदर्भात त्यांनी पुढे असे स्पष्टीकरण केले की, आसराबाई विष्णू काळे हे, आसराबाई कचरु टुपके या मयत स्त्रीचे सासरचे नाव असून विचाराधीन जमिनीचा ७/१२ उतारा श्रीमती आसराबाई कचरु टुपके यांच्या नावाने महसूल विभागामध्ये असल्याने हे मृत्यूपत्र 'श्रीमती आसराबाई कचरु टुपके' या नावाने नोंदविले गेले असावे. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भात मागितलेली माहिती अस्तित्त्वात नसण्याची देखील शक्यता आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ द्वारे - 'स्थानिक चौकशी अहवालाची नक्कल', अशी जन माहिती अधिकारी यांना माहिती मागितली होती. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, सातबाराच्या उताऱ्यावर वारसदाराची नोंद करताना मंडळ अधिकारी हे स्थानिक पातळीवर चौकशी करुन वारस रजिस्टरवर नोंद करीत असतात. मंडळ अधिकारी यांच्याकडे या संदर्भात कोणाचाही तोंडी अथवा लेखी अहवाल प्राप्त होत नसतो तसेच अशी कारवाई करताना ते कुणाच्याही जाबजबान्या नोंदवून घेत नाहीत. महसूल विभागात वारस नोंदीबाबत गेल्या अनेक वर्षापासून ही पध्दत रुढ आहे. अपिलार्थीने नमुना नं.६- सर्व हक्काचे पत्रकाच्या नोंदवहीचा उतारा या प्रतीची आयोगाने पहाणी केली असता, यावर, मंडळ अधिकाऱ्याने दि.२६.१२.--- रोजी "सर्व स्थानिक चौकशी व वारसा रजिस्टरवरुन मंजूर झाली," असे त्यांचे अभिप्राय या प्रतीवर नोंदविल्याचे दिसून येते. यावरुन मंडळ अधिकारी यांनी ही स्थानिक चौकशी

तोंडी स्वरुपात केल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्यावरील माहिती देखील ती मूळात अस्तित्त्वातच नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना देता येणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.६ द्वारे - 'नोंद क्र.१४६८ मंजूर करणाऱ्या मंडळ अधिकारी व तलाठी यांची पूर्ण नावे व पत्ते'- ही माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. ही माहिती न देण्याचे कारण उपस्थित जन माहिती अधिकारी यांना माहित नाही, कारण अपिलार्थीस माहिती देताना ते या पदावर कार्यरत नव्हते, असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले. मात्र आता अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसांचे आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्याने त्रयस्थ पक्षाचा जबाब नोंदवून घेण्यात आला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही, हे उघड आहे. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.६ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.६ द्वारे मागणी केलेली माहिती अत्यंत साधी,सरळ व सोपी होती, तथापि एवढे असूनही तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही. अपिलार्थीस अशाप्रकारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले आहेत, सबब महसूल आयुक्त, नाशिक यांना

संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कोपरगाव यांनी कोणत्याही प्रकारचे निर्णय पारित न करुन, अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाई दर्शविली आहे. अशाप्रकारच्या त्यांच्या बेपर्वा कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.६ शी संबंधित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, नाशिक यांना, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १९-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल एकनाथ काळे,मु. पो. रवंदे, ता.कोपरगाव जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,कोपरगाव

जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कोपरगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७
निर्णय दिनांक १९-०१-२००९

१ श्री. राजेश चंद्रकांत वाकचौरे, : अपिलार्थी
रा.संगमनेर,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०२.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना दि. २.११.२००७ पर्यंत माहिती मिळणे अभिप्रेत असताना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि.१५.१०.२००७ रोजी अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी व पैसे भरल्यानंतर एक दिवस उशिरा माहिती प्राप्त झाली . या माहितीमध्ये मुद्दा क्र.२ शी संबंधित माहितीचा समावेश नाही व सुमारे १३ दिवस उशिराने माहिती मिळाल्याने व ते माहितीपासून वंचित राहिल्याने त्यांना आता मोफत माहिती मिळावी. या अपिल अर्जामध्ये त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, त्यांच्या दि. ५.१२.२००७ रोजीच्या, त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या

प्रथम अपिलावर त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करेपर्यंत कोणताही निर्णय झाला नाही व त्यांना ही माहिती मिळण्यापासून संबंधितांकडून वंचित ठेवले गेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्‍चितपणे उशिरा कोणती माहिती पुरविली, यासंदर्भातील कागदपत्रे अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेले नाहीत. तसेच अपिलार्थीच्या दि. ५.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे, हे आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन, तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या, त्यांना सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत दि.१३.१.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राद्वारे तसेच त्यांचे कार्यालयातील श्री. जरे,कनिष्ठ लिपीक यांना ठीक ४.४५ व श्री. वाणी,जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक यांना ४.५० वा आयोगाचे कार्यालयातून दि.१३.१.२००९ रोजी दूरध्वनी संदेशद्वारे कळवूनही, अनुपस्थित राहण्यामुळे, कळण्यास मार्ग नाही. हे पाहता, असे आदेशित करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ०५.१२.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०५.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपिलांवर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : १९-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेश चंद्रकांत वाकचौरे,१२८,आशिर्वाद,स्टेट बँक कॉलनी, मालदाड रोड,संगमनेर,जि.अहमदनगर-४२२६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (सोबत दि. ५.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत)

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८
निर्णय दिनांक १९-०१-२००९

१ श्री. रंजन रावसाहेब लोखंडे, : अपिलार्थी
रा.श्रीरामपूर जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग,अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग,उपविभाग क्र. १
अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपअभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग,उपविभाग क्र.१
अहमदनगर

जन अपिलीय अधिकारीः कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प (सा.बां.) विभाग अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.०३.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्या दि.११.९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील डांबर भरलेल्या टँकरच्या स्लीप्सच्या प्रती उपलब्ध झाल्या नाहीत असे सांगण्यात आले व त्यांना मजूर सोसायटीची जी यादी मिळाली ती संदीग्ध आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर ते कोपरगाव या रस्त्यावरील दि. १६.६.२००५ ते ३१.३.२००७ या कालावधीशी संबंधित डांबर टँकरची माहिती मिळणेसंदर्भात एकूण ११ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या अर्जामध्ये त्यांनी दुसऱ्या मुद्याद्वारे याच रस्त्यावर कोणकोणत्या मजूर संस्थांमार्फत कामे केली गेली, त्या एजन्सीची (संस्थांची) नावे व पत्ते ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत दि.१०.१०.२००७ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे रु.९०/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे, न भरल्यास अपिलार्थीस माहितीची आवश्यकता नाही, असे गृहीत धरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढण्यात येईल असे कळविले. तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि.२४.१०.२००७ रोजी माहिती पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. १३.११.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.१२.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.१०.२००७ रोजी दिलेली माहिती सुसंगत असल्याचे अनुमान काढून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील, त्यांच्याकडील दि. ७.१२.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे दप्तरी दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलाथीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि.२४.१०.२००७ रोजी पुरविल्याचे आयोगास अवगत केले आहे. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये उपस्थित केलेल्या उर्वरित दोन मुद्यांवरच फक्त सुनावणी घेण्यात येत आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून, डांबर टँकरचा अहवाल, टँकरच्या स्लीप्स् त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले गेले.

यावर जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ही माहिती त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भाने मागितली होती. एकूण १५ स्लीपपैकी ४ स्लीप्स् त्यांच्याकडे आज रोजी तयार आहेत व उर्वरित ११ स्लीप्स् संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडे आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले की, संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडे आता या स्लीप्स् उपलब्ध नाहीत असा त्यांना संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडून खुलासा प्राप्त झाला आहे. डांबरीकरणाच्या कामामध्ये डांबराच्या वजनाचे व प्रमाणाचे महत्त्व लक्षात घेता, अशी महत्त्वाची माहिती कार्यालयाकडे न ठेवता, त्यांच्या अधिपत्त्याखालील कार्यालयातील कनिष्ठ अभियंता यांच्याकडे कशी काय असे विचारले असता, या प्रश्नावर जन माहिती अधिकारी यांना आयोगास समाधानकारक स्पष्टीकरण देता आले नाही.

डांबरीकरणाच्या कामातील डांबराच्या प्रमाणाचे महत्त्व व रस्त्याच्या कामांचे गुणनियंत्रण विषयक अभिलेखे जतन करण्याची सार्वजनिक बांधकाम विभागाकडील प्रचलीत पध्दत लक्षात घेता, ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्येच उपलब्ध असावयास हवी. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेले उत्तर व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या वरील युक्तिवादाद्वारे दिलेले उत्तर आयोगास मान्य नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे संदर्भित केलेल्या कामाचे संबंधातील उर्वरित ११ डांबर - स्लीप्स् कामाशी संबंधित असलेल्या कनिष्ठ अभियंता यांच्याकडून तात्काळ प्राप्त करुन घेऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या

स्लीप्स्सह सर्व स्लीप्सच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवाव्यात व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ज्या कनिष्ठ अभियंत्यांकडून डांबराच्या वजनाच्या स्लीप्स् प्राप्त होणार नाहीत, त्यांच्यावर आवश्यकतेप्रमाणे फौजदारी कारवाई / शिस्तभंगविषयी कारवाई करावी.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे महत्त्व लक्षात घेता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नाशिक यांना, या टप्प्यावर असे सूचित करण्यात येते की, सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे डांबरीकरणाच्या कामामध्ये वापरलेल्या डांबराच्या प्रमाणाचे आवश्यक ते हिशोब कसे ठेवावेत, या संदर्भात त्यांना मार्गदर्शन करणारे एक परिपत्रक त्यांचे स्तरावरुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत जारी करावे.

अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, त्यांना प्राप्त झालेल्या मजूर संस्थांची माहिती संदीग्ध स्वरुपाची असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीस आज सुनावणीच्या वेळी 'संदीग्ध' या शब्दाद्वारे त्यांना काय सूचवावयाचे आहे, अशी विचारणा आयोगाने केली असता, यावर ते आयोगास स्पष्टीकरण सादर करु शकले नाहीत. याबाबत अद्यापही प्राप्त माहितीसंदर्भात अपिलार्थीच्या मनातील शंका दूर करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दि. ३१.३.२००५ ते ३१.३.२००७ या कालावधीमधील निविदा रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती काढून त्या अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या तसेच दि. ३१.३.२००५ ते ३१.३.२००७ या

कालावधीमधील त्यांच्या कार्यालयातील निविदा रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रंजन रावसाहेब लोखंडे,द्वारा श्री. स्वामी समर्थ एन्टरप्राईजेस, एस.टी.स्टॅण्डजवळ, रामचंद्र टॉवर्स, श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जागतिक बँक प्रकल्प, उपविभाग क्र.१,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा.बां.) विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९
निर्णय दिनांक १९-०१-२००९

१ श्री. दिलीप नायकु थोरात : अपिलार्थी
रा.कोळपेवाडी ता.कोपरगाव,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
रयत शिक्षण संस्था, सातारा

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: १.) निरीक्षक (इन्स्पेक्टर),
रयत शिक्षण संस्था, सातारा
२) मुख्याध्यापक,
श्री.छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय,
गौतमनगर, पो.कोळपेवाडी ता.कोपरगाव
जि.अहमदनगर.

जन अपिलीय अधिकारी: शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.०३.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची दखल घेतली गेली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१.१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जून,२००७ ते दि. ३० ऑक्टोबर,२००७ या कालावधीशी संबंधित, त्यांच्या रयत शिक्षण संस्थेकडे श्री.छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय,कोळपेवाडी या शाळेसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - 'शालेय हजेरीपत्रक, तांदुळ,किराणमाल,बचतगटाचे मानधन, याबाबतचे शासनाचे आदेश, याबाबत सर्वतोपरी अहवाल तथा निविदा मागणी संख्या, स्कुल कमिटीचा निर्णय, या सर्व अहवालाच्या प्रती,भांडी, गॅस, लाकडे (सरपन)' - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले, तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर अर्ज खाजगी कुरीअर संस्थेमार्फत पाठविल्याची पावती आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला असावा, असे अनुमान काढण्यास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि.३०.१.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित झालेला दिसून येत नाही. संस्थेच्या जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.२. व १४.३.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी, अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे होऊ शकली नाही. आता शिक्षण संचालनालयाने त्यांच्याकडील पत्र क्र. संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्रं.(८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शालेय शिक्षण संस्थांच्या संदर्भात, संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमानुसार दाखल होणाऱ्या प्रथम अपीलावरील

निर्णय घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.१.२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. सुनावणीचे पत्र अपिलार्थीस किमान एक आठवडा अगोदर प्राप्त होईल,असे जन अपिलीय अधिकारी यांनी पहावे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी अपिलार्थी यांच्या दि.३०.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर,झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : १९-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपराव नायकु थोरात, मु.पो. कोळपेवाडी ता.कोपरगाव जि.अहमदनगर-४२३ ६०२

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय,गौतमनगर,पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, कर्मविर समाधी परिसर, सातारा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना अपिलार्थीच्या दि.३०.१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जासह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०
निर्णय दिनांक १९-०१-२००९

१ श्री. दिलीप नायकु थोरात : अपिलार्थी
रा.कोळपेवाडी ता.कोपरगाव,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
श्री.छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय,
कोळपेवाडी,ता. कोपरगाव,जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा
प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०३.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, गरीब विद्यार्थी फंड, १ ली ते ४ थी पर्यंत परीक्षा फी खर्च, अहवाल याची माहिती मिळत नसल्याचे नमूद केले आहे व त्यांच्या अर्जाची संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दखल घेतली

नसल्याने, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १२.१२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहे जून,२००५ ते नोव्हेंबर, २००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या विद्यालयाकडील गरीब विद्यार्थी फंड, परीक्षा फी, इमारत निधी याबाबत एकूण तीन मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - विद्यालयात गरीब विद्यार्थी फंड किती जमा झाला, त्याचा विनियोग कोठे,कसा केला, इ.१ ली ते ४ थी पर्यंत परीक्षा फी वरील कालखंडात किती जमा झाली, त्याचा खर्च कसा केला जातो, शिल्लक खर्चाबाबत काय ? पर विद्यार्थी किती खर्च होतो याचा संपूर्ण अहवाल, इमारत निधी किती व कसा जमा झाला, त्याचा विनियोग कसा झाला/होतो त्याबाबतचा संपूर्ण अहवाल, वरील १ ते ३ मुद्यांचे अहवाल,सत्य झेरॉक्स प्रमाणित प्रत -अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे विहित मुदतीत प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.२. व १४.३.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे उपस्थित राहू शकत नसल्याचे त्यांनी सांगितल्यामुळे, ही सुनावणी झाली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, सदर संस्था ही गरीब विद्यार्थ्यांकरिता फंड जमा करीत असते तसेच इमारत फंडाकरिता वेगवेगळया स्त्रोताद्वारे निधी जमा करीत असते. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १२.१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेल्या माहितीमध्ये परीक्षा निधीचा विनियोग जन माहिती अधिकारी यांच्याकडून कसा केला जातो याची माहिती प्राप्त झाली नाही. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीतील परीक्षा फीसच्या रकमेचा जमा व खर्च एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली आहे. गरीब विद्यार्थी फंड आणि इमारत निधी याबाबत त्यांना अशी माहिती प्राप्त झाली आहे की, सदर संस्थेकडून हा निधी विद्यार्थ्यांकडून जमा केला जातो व या संस्थेचे गौतम सहकारी बँकेत खाते आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दि. १२.१.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असून जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवल्याचे दिवशी अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने निधीचा विनियोग कशाप्रकारे केला जातो, अशी माहिती मागितली आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी प्राप्त झालेल्या निधीतून एकूण किती रक्कम खर्च करण्यात आली, याची माहिती अपिलार्थीस दि.१२.१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे या खर्चाच्या रकमेचे व्हाऊचर्स उपलब्ध असतील, जमा झालेल्या रकमेतून कशाप्रकारे खर्च केला जातो, हे अपिलार्थीस खर्चाच्या व्हाऊचर्सच्या प्रतींवरुन समजून येईल. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये या व्हाऊचर्सच्या प्रती अपिलार्थीने स्वीकारण्याचे मान्य केले आहे.माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास, संबंधित अर्जदारास, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांना देणे

अभिप्रेत आहे हे पाहता, अपिलार्थीस या व्हाऊचर्सवरुन संबंधित संस्थेकडे जमा झालेल्या निधीचा विनियोग कशाप्रकारे केला जातो, याची माहिती मिळू शकेल असे आयोगास वाटते. अपिलार्थीस संबंधित संस्था गरीब विद्यार्थी फंड व इमारत फंड या नावाखाली विद्यार्थ्यांकडून निधी गोळा करते, याची माहिती त्यांना इतर स्त्रोताकडून प्राप्त झालेली आहे व या प्राप्त माहितीच्या आधारे अपिलार्थी हे संबंधित माहिती सदर जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी करीत असल्याचे दिसून येत आहे. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी संबंधित संस्था ही,गरीब विद्यार्थी फंड व इमारत फंडाची रक्कम विद्यार्थ्यांकडून घेत नसल्याचे नमूद केले आहे व त्यांनी अपिलार्थीस दि. १२.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे तसे लेखी कळविले आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या या लेखी जबाबाबाबत, जर काही शंका असेल तर याबाबत शिक्षण विभागाच्या किंवा इतर तत्सम प्राधिकरणाकडे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन स्वतःची तक्रार नोंदवावी व आपल्या गाऱ्हाण्याची तड संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून लावून घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना देय असलेल्या वरील कालावधीतील सर्व खर्चाच्या व्हाऊचर्सच्या प्रती दहा दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे अथवा माहिती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : १९-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपराव नायकु थोरात, मु.पो. कोळपेवाडी ता.कोपरगाव जि.अहमदनगर-४२३ ६०२

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय,गौतमनगर,पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,रयत शिक्षण संस्था, सातारा (मार्फत मुख्याध्यापक, श्री.छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय,गौतमनगर,पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर यांचेमार्फत) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११
निर्णय दिनांक १९-०१-२००९

१ सौ. अलका लहानू थोरात : अपिलार्थी
रा.निमगावजाळी,ता.संगमनेर,
जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,संगमनेर,जि.अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: कक्ष अधिकारी,पंचायत समिती,
संगमनेर जि. अहमदनगर.
जन अपिलीय अधिकारी: गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,संगमनेर,जि.अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी (पती), हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०३.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडून त्यांच्या अपिलासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार अथवा आदेश मुदत

संपल्यानंतरही प्राप्त झाला नसल्याचे, आयोगाकडे नमूद केले, त्याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१३.९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. निमगावजाळी येथील दाखल केलेल्या राजीव गांधी निवारा योजना क्र.२ च्या प्रस्तावाबाबत एकूण ५ मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ८.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपोटीचे रु.२७२/- इतके शुल्क शासकीय कोषागारामध्ये भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने दि. १८.१०.२००७ रोजी शुल्क भरल्यानंतर त्यांना प्राप्त झालेले चलन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५.१०.२००७ रोजी सादर केले व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २६.१०.२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) प्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे केले होते. त्यांच्याकडून गट विकास अधिकारी, पंचायत समिती,संगमनेर जि.अहमदनगर यांच्याकडे सदर अपील अर्ज दि. १७.१.२००८ रोजी हस्तांतरित करण्यात आला. या अपिलावर गट विकास अधिकारी,पं.स.संगमनेर यांनी सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश दि. ५.२.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलातील अभिप्रायांची पूर्तता केल्याचे दिसून येते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे राजीव गांधी निवारा योजनेत त्यांना आवश्यक असलेल्या निवासस्थानापोटी प्रस्ताव सादर केला होता, तथापि या प्रस्तावासोबत अर्ज सादर करताना त्यांनी स्वतःचे मिळकत प्रमाणपत्र न जोडता त्यांच्या पतीचे मिळकत प्रमाणपत्र जोडले होते, तसेच या प्रस्तावामध्ये काही त्रूटी होत्या.या त्रूटींची पूर्तता आता अपिलार्थीकडून झाली असून, याबाबत दि. २६ जानेवारी, २००९ रोजी होणाऱ्या बैठकीत अपिलार्थीच्या अर्जाचा विचार होणार आहे, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीस हे मान्य आहे. अपिलार्थीच्या प्रतिनिधीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांनी त्यांच्या दि. १३.९.२००७ रोजीच्या अर्जामध्ये मौ. निमगावजाळी येथील प्रस्तावाविषयी माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना संगमनेर तालुक्याची संपूर्ण माहिती पाठवून त्यांना एकूण २२ पृष्ठांची अतिरिक्त माहिती आवश्यक व संबंधित नसतानाही दिली आहे. त्यामुळे त्यांच्याकडून जादा आकारलेले शुल्क जन माहिती अधिकारी यांनी परत करावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. सदर मुद्दा उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी मान्य केला असून आता जन माहिती अधिकारी यांना या मुद्यासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी दि. २६.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीमध्ये जी माहिती अपिलार्थीस आवश्यक नसताना पुरविली आहे, ती माहिती त्यांनी अपिलार्थीकडून परत प्राप्त करुन घ्यावी व त्यापोटी आकारले व स्वीकारले गेलेले शुल्क अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य येत आहे.

२. अपिलार्थीस, पुरविण्यात आलेल्या अतिरिक्त माहितीसाठीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हे आदेश निर्गमित होताच त्यांना सात दिवसांचे आत परत करावे.

**अहमदनगर**
**दिनांक : १९-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. अलका लहानु थोरात, मु.पो. निमगावजाळी, ता.संगमनेर जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५०

निर्णय दिनांक २०-०१-२००९

१ श्री. ज्ञानेश्वर लहानुजी खैरे, अपिलार्थी

शिवशंकर कॉलनी, तानाजी चौकाच्या दक्षिणेकडे,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्रशासकीय अधिकारी,

महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : वॉर्ड अधिकारी (फ), महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामळे त्यांनी आयोगाकडे हे अपील केल्याचे म्हटले असून सदरील वस्तीमधील रस्त्यावरील अनधिकृत बांधकामाबाबत अनेक अर्ज देऊनही संबंधित अधिका-यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई न केल्याने त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी व सदरील (शिवशंकर कॉलनी, तानाजी चौकाच्या दक्षिणेस

असलेले) बांधकाम तोडण्याबाबत त्वरित आदेश निर्गमित करण्याची आयोगास या अर्जामध्ये विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या अर्जान्वये शिवशंकर कॉलनी मधील रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७ मुद्दयांव्दारे दिनांक ०१-१२-१९९३ ते २००७ या कालावधीशी संबंधीत काही माहिती मागितली होती. सदर माहिती श्री. गोरख यादव देवकर यांनी शिवशंकर कॉलनी मधील रस्त्यावर केलेल्या अतिक्रमणासंदर्भात होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सुनावणी झाली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना सांगता येत नाही, मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीने ज्या अतिक्रमणाविषयी माहिती मागविली आहे तो रस्ता व संबंधीत शिवशंकर कॉलनी ही अनधिकृतरित्या वसविलेली कॉलनी असून अशा प्रकारे अनधिकृत बांधकाम केलेल्या व गुंठेवारी मंजूर नसलेल्या क्षेत्रामध्ये महानगरपालिकेतर्फे कोणतीही कारवाई केली जात नाही, त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने संदर्भित केलेले श्री. गोरख यादव देवकर यांचे अतिक्रमण काढण्यासंदर्भात महानगरपालिकेने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सात मुद्दयांव्दारे माहिती विचारली होती. याबाबत मुद्दा क्रमांक १ ची माहिती मोघम स्वरुपात मागितलेली असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ , ४, ५ व ७ या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबत कारणे व खुलासा अपेक्षित करणारी आणि भविष्यातील त्यांच्या नियोजनासंदर्भात माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये

स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कारणे देणे, खुलासा करणे हे अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहिती मागितल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात निर्णय घेणे व तद्नंतर अधिनियमातील तरतुदीनुसार ती अर्जदारास देणे एवढ्यापुरतीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४, ५ व ७ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अनधिकृत रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी महानगरपालिकेची नाही, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे या मुद्दयासंदर्भात अशी माहिती कळविली आहे की, "अनधिकृत रस्ता कोणता आहे याचा खुलासा अपिलार्थीने केला नाही. महानगरपालिकेच्या हद्दीतील सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. " जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली ही माहिती संदिग्ध स्वरुपाची आहे असे आयोगाचे मत आहे. आज युक्तिवादामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी या मुद्दयावर अपिलार्थीस स्पष्टपणे माहिती पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांची अतिक्रमणाची तक्रार केव्हा केली होती याचा बोध होत नसल्याचे उत्तर अपिलार्थीस दिले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणाशी संबंधीत शिवशंकर कॉलनीमधील अनधिकृत रस्त्यावर श्री. गोरख यादव देवकर यांनी केलेल्या कथित अतिक्रमणाच्या विषयास अनुसरुन त्यांच्याकडील असलेल्या नस्तींचा त्यांनी शोध घ्यावा, या नस्तींमध्ये श्री. गोरख यादव देवकर यांच्या बांधकामाविरुध्द केलेल्या काही तक्रारी असल्यास त्या तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सशुल्क माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) अनुसार विनामूल्य पुरवावी लागेल. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ६ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ६ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद

दिनांक २०-०१-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ज्ञानेश्वर लहानुजी खैरे, शिवशंकर कॉलनी, तानाजी चौकाच्या दक्षिणेकडे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी (फ), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५१

निर्णय दिनांक २०-०१-२००९

१ श्री. चौधरी महंमद मोईनोद्दीन गौस मणियार, अपिलार्थी
नेहरु चौक,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी
समिती क्रमांक ३, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक २, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी निर्णय देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे. या अपिलासंदर्भात त्यांचे राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक २०-०१-२००९ अशी तारीख असलेले पत्र दिनांक १७-०१-२००९ रोजी प्राप्त झाले असून त्यामध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य तो दंड लावण्याची आणि त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उस्मानाबाद शहरातील मुस्लीम ओबीसी जातीच्या संबंधाने दाखल झालेल्या प्रकरणासंदर्भात व त्या अनुषंगाने इतर विषयावर दिनांक ०१ मार्च २००० ते ०१ मार्च २००७ या कालावधीशी संबंधीत एकूण १६ मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन दिनांक २७-०८-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००७ पर्यंत त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे आदेशित केले, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी त्यांचे म्हणणे दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पाठविले आहे. या पत्रामध्ये त्यांचा युक्तिवाद त्यांनी लेखी स्वरुपात कळविला आहे. या पत्रामध्ये त्यांनी माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक ३ लातूर यांना, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत योग्य तो दंड करण्यात यावा व त्यांच्याविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करुन, अपिलार्थीस माहिती देण्याची व्यवस्था करावी अशी विनंती आयोगास केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी आता १२-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली आहे. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे काम अर्धन्यायिक स्वरुपाचे काम असून त्यांच्या नियमीत कामाकरिता त्यांना विशिष्ट लक्ष्य ठरवून दिलेले नसते, तसेच जाती

प्रमाणपत्र पडताळणी विहित मुदतीत न झाल्यास समितीच्या सदस्यावर कारवाई करण्याची तरतूद, ज्या नियमाव्दारे त्यांच्या समितीचे कामकाज चालते, त्यामध्ये नाही.

अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी पाठविलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १६-०१-२००९ रोजी मिळाली असून, या माहितीने त्यांचे समाधान झाले आहे व यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात दिनांक १६-०१-२००९ रोजी लिहिलेले पत्र त्यांनी आयोगास सादर केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विस्तृत व व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. मागितलेल्या माहितीचे स्वरुप समिश्र असून काही मुद्दयातील उप मुद्दयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय व त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अपेक्षिली असल्याचे दिसून येते. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीस देय असणार नाही. उदा. मुद्दा क्रमांक ९, ११ अंशतः . उर्वरित माहिती संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस या प्रकरणी देय ठरतात. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०१-२००९ रोजी दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या ब-याच मुद्दयांमध्ये "आपणास काही मुद्दयावरील माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, साक्षांकीत प्रत देण्यात येईल, छायांकीत प्रत देण्यात येईल" अशा अर्थाची अपिलार्थीस आश्वासित करणारी माहितीवजा उत्तरे दिली आहेत. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची आहे. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितल्यास ही माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती देणे हे मूळात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या माहितीमध्ये अपिलार्थीच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये, अशा प्रकारच्या प्रश्नोत्तराची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेली माहिती पाहता अपिलार्थीस त्यांनी संपूर्ण माहिती दिली असे म्हणता येणार नाही. ही माहिती देत असतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे असलेल्या ज्या कागदपत्रांचा आधार घेतला आहे त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना आता अपिलार्थीस द्याव्या लागतील. आज रोजी सुनावणीच्या वेळी अशा प्रकारच्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती

अधिकारी यांनी मान्य केले आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) अनुसार विनामूल्य द्यावी लागेल.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती जरी मोठ्या प्रमाणात होती तरी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यावर त्यावर ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात निर्णय घेणे, ही प्रक्रिया संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पार पाडली नाही, एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक २७-०८-२००७ रोजी निर्णय दिल्यानंतरही अंदाजे दोन महिने संबंधीत जन माहिती अधिकारी हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते, या कालावधीत देखील त्यांनी अपिलार्थीस मूळ अर्जासंदर्भात माहिती देण्यासंबंधी कोणतीही कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची अशा प्रकारे उपेक्षा करुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. सबब सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. सुरेश कांबळे, विशेष समाजकल्याण अधिकारी, लातूर या पदावर कार्यरत आहेत ) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्य माहिती आयोगाला उद्देशून लिहिलेले दिनांक १६-०१-२००९ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने हे अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे, मात्र त्यांच्या दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे (आयोगास दिनांक १७-०१-२००९ रोजी प्राप्त) त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगाकडे मागणी केली आहे. अपिलार्थीच्या या दोन्ही पत्रातील विसंगती लक्षात घेता, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळया प्रकारे माहितीची मागणी करुन एक प्रकारे आयोगाच्या कार्यालयीन कामकाजामध्ये अनावश्यक अडथळे आणत आहेत असे म्हटल्यास येथे वावगे होणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. सुरेश कांबळे, सध्या विशेष समाजकल्याण अधिकारी, लातूर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २०-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चौधरी महंमद मोईनोद्दीन गौस मणियार, नेहरु चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५२

निर्णय दिनांक २०-०१-२००९

१ श्री. चौधरी महमंद मोईनोद्दीन गौस मणियार, नेहरु चौक, उस्मानाबाद — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्रमांक ३, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर — प्रतिवादी

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्रमांक २, लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. एस. एल. मुंढे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही यासंदर्भात त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचा दिनांक २०-०१-२००९ रोजीचा अर्ज दिनांक १७-०१-२००९ रोजी दाखल केला असून या अर्जामध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना

माहिती न दिल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींतर्गत योग्य तो दंड आकारण्यात यावा व त्यांच्याविरुध्द आवश्यक ती कारवाई करावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने विचाराधीन व्दितीय अपिलाशी संबंधीत प्रथम अर्जामध्ये मागणी केलेली हीच माहिती शासकीय माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग यांच्याकडे मागितली होती. यासंदर्भातील व्दितीय अपिलावर राज्य माहिती आयोगाने दिनांक ०५-०८-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले आहेत. अपिलार्थीने औरंगाबाद व लातूर विभाग यांच्याकडे मागणी केलेली माहिती, श्री. एस. एल. मुंढे, पोलीस निरीक्षक, दक्षता पथक जाती पडताळणी यांच्या संदर्भातील असून औरंगाबाद व लातूर विभागातील दोन वेगवेगळ्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकाच कालावधीकरिता व एकच माहिती दोन स्वतंत्र अर्जाव्दारे मागितल्याचे दिसून येते.

आज रोजी उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, राज्य माहिती आयोगाच्या आदेशाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस ते जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग म्हणून कार्यरत असतांना त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. त्यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या लेखी युक्तिवादात असेही अवगत करुन दिले की, अपिलार्थीचे दिनांक १६-०१-२००९ चे पत्र त्यांना प्राप्त झाले असून हे पत्र अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाला उद्देशून लिहिले असून या पत्रामध्ये त्यांनी विचाराधीन अपील, त्यांना माहिती मिळाल्याने निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे अशी त्यांनी आपल्या युक्तिवादात विनंती केली आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने एकच माहिती दोन वेगवेगळ्या जन माहिती अधिका-यांकडे मागितली आहे. त्यापैकी औरंगाबादकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संदर्भातील व्दितीय अपिलावर आयोगाने दिनांक ०५-०८-२००८ रोजी निर्णय दिला आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत निर्णयाच्या अनुषंगाने अपिलार्थीस त्यांनी स्वत: औरंगाबाद विभागाचे जन माहिती अधिकारी या नात्याने पत्र क्रमांक ३५६७, दिनांक १८-०५-२००७ अन्वये माहिती दिल्याचे ते आयोगासमोर कबूल करत आहेत हे पाहता, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाला उद्देशून लिहिलेले व जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेले दिनांक १६-०१-२००९ रोजीचे पत्र व दिनांक १७-०१-

२००९ रोजी त्यांचा आयोगास (२०-०१-२००९ दिनांकाचा) प्राप्त झालेला लेखी युक्तिवाद यातील विसंगती लक्षात घेता व जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थीची आयोगासमोरील अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चौधरी महमंद मोईनोद्दीन गौस मणियार, नेहरु चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५३

निर्णय दिनांक २०-०१-२००९

१ श्री. सतिशकुमार शेषराव साळवे, अपिलार्थी
घर नं. ५-५-३४, साळवे निवास, ज्युबिली पार्क,
भडकलगेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उद्योग सह संचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांचा निकाल बेकायदेशीर असल्याचे नमूद केले आहे तसेच या अपील अर्जासोबत आपल्या माहितीचा अर्ज जोडला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली

माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर प्रथमतः दिनांक ३१-०७-२००७ रोजी व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाल्यानंतर दिनांक ३०-०८-२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी या दोन टप्प्यामध्ये दिलेली माहिती सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. या माहितीवर अपिलार्थी यांचा निश्चितपणे कोणता आक्षेप आहे, हे आयोगास सांगण्याकरिता अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दोन टप्प्यामध्ये आवश्यक ती माहिती दिल्याचे दिसून येत असल्याने, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास दिसून येत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय बेकायदेशीर असल्याचे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णयाचे अवलोकन केले असता, या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारे ठोस निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. इतःपर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या प्रक्रियेंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना एकत्रित बोलावून, त्यांचे म्हणणे नोंदवून त्यावर आपला विशिष्ट स्वरुपाचा निर्णय, उपलब्ध कागदपत्राच्या आधारे घ्यावा, असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सतिशकुमार शेषराव साळवे, घर नं. ५-५-३४, साळवे निवास, ज्युबिली पार्क, भडकलगेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, हॉलीडे कॅम्प रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उद्योग सह संचालक, विकास भवन, जालना रोड, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५४

निर्णय दिनांक २०-०१-२००९

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, अपिलार्थी
गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे आदेश पारित केले नसल्याचे म्हटले आहे. त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नसल्याने त्यांच्यावर कायद्यातील तरतुदीप्रमाणे योग्य ती कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. तसेच ही माहिती त्यांना विनामूल्य द्यावी असे आयोगाने आदेशित करण्याचीही विनंती त्यांनी आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषदेंतर्गत दिनांक ०१-०५-२००७ ते ३०-०६-२००७ या कालावधीशी संबंधीत, सर्व विभागातील बदल्यांची माहिती एकूण सहा मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मे/जून २००७ मध्ये करण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या बदल्यांची विभागनिहाय संख्या, बदल्या करण्यात आलेल्या परंतु अद्याप कार्यमुक्त न झालेल्या कर्मचा-यांची विभागनिहाय नांवे, कर्मचा-यांना अद्यापही कार्यमुक्त न करण्याची कारणे, कार्यमुक्त न केलेल्या कर्मचा-यांच्या विभागप्रमुखांवर प्रशासनाने केलेली कारवाई, विभाग प्रमुखावर कोणतीही कारवाई केली नसल्यास त्याची कारणे विभागनिहाय दुरुस्तीचे आदेश व दुरुस्ती करण्याची कारणे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन त्यांच्या विभागाशी संबंधीत कर्मचा-यांच्या बदल्यासंदर्भातील माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे व ही माहिती शुल्क रुपये २ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरुन हस्तगत करण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचित केले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीने सुनावणीमध्ये आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०९-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २६-०९-२००७ रोजी पारित केले. या टप्प्यावर देखिल अपिलार्थी यांना सुनावणीची नोटीस व जन अपिलीय अधिकारी यांचा सुनावणी संदर्भातील निर्णय प्राप्त झाला नाही, असे आयोगास सांगितले. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र पाठविल्यासंदर्भात आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी जिल्हा परिषदेंतर्गत सर्व विभाग प्रमुखांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, १५ दिवसाच्या आत देण्याचे

सूचित केल्याचे दिसून येते. हे आदेश अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने, संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २०-०७-२००७ रोजीचे पत्र व जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या त्यांच्या अपिलावरील दिलेला निर्णय त्यांना अद्यापही प्राप्त नाही. राज्य माहिती आयोगाचे सुनावणीचे पत्र गेल्यानंतर त्यांना जिल्हा परिषदेच्या काही विभागांकडून माहिती प्राप्त झाली आहे. अद्यापही त्यांना बांधकाम, समाजकल्याण व पाणीपुरवठा विभागाकडून माहिती अप्राप्त आहे. त्यांना माहिती प्राप्त होण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत संबंधितांवर आवश्यक ती कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा परिषदेतील सामान्य प्रशासन विभागाप्रमाणे इतर विभागांशीही संबंधीत असल्याने त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस प्रत्येक विभागाकडे स्वतंत्र अर्ज करुन माहिती घेण्यासाठी सूचित केले. अपिलार्थीस दिनांक २०-०७-२००७ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपिलावरील सुनावणीचे पत्र पाठविले असून यातील संदर्भातील आवश्यक तो पुरावा त्यांनी सादर केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सहा मुद्दयांव्दारे माहिती मागविली होती. त्यातील मुद्दा क्रमांक ३ व ५ शी संबंधीत माहिती व मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत अंशतः माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निर्णयाची कारणे विचारली आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देण्यासंदर्भात व देण्याचा निर्णय झाल्यानंतर अपिलार्थीस विशिष्ट मुदतीत पुरविणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. "माहिती" या शब्दाच्या व्याख्येमध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबाबत अथवा निर्णयाबाबत कारणे विचारणे अथवा त्यांचा खुलासा अपेक्षित करणे, या प्रक्रियांचा समावेश नाही. मात्र

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ४ या मुद्दयांशी संबधीत माहिती, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देणे भाग आहे. यातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना विभाग प्रमुखावर केलेल्या प्रशासकीय कारवाईसंदर्भामध्ये माहिती मागितली आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, मूळात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही विभाग प्रमुखावर कारवाई करण्यास सक्षम नाहीत, मात्र ते संबंधीत प्राधिकरणाकडे विभाग प्रमुखावर कारवाई प्रस्तावित करु शकतात. अशा प्रकारची कोणतीही कारवाई औरंगाबाद जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली नाही, अशी माहिती उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी समक्ष आयोगास दिली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबधीत माहिती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना, अद्याप जिल्हा परिषदेच्या बांधकाम, समाजकल्याण व पाणीपुरवठा विभागाकडून माहिती अप्राप्त असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. तथापि पाणीपुरवठा व समाजकल्याण विभागातील कर्मचा-यांच्या बदल्या करण्याचे अधिकार त्यांच्या जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुखास नाहीत. संबंधीत कर्मचा-यांच्या आस्थापनेचे संनियंत्रण जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत केले जाते, त्यामुळे या विभागाशी संबंधीत माहिती, सामान्य प्रशासन विभागाने अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये समाविष्ट आहे. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त बांधकाम विभागाशी संबंधीत माहिती देणे बाकी आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय असल्याने असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात प्रत्यक्षत: उपलब्ध नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा परिषदेंतर्गत इतर कार्यालयामध्ये उपलब्ध होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या वेगवेगळया विभागाच्या माहिती अधिका-यांकडे उपलब्ध आहे, त्यामुळे या प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाच्या जन माहिती अधिका-याने अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची प्रत संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीचे पालन न करुन त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये विलंब निर्माण केला आहे, असे आयोगाचे

मत आहे. उपरोक्त प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अपील निर्णयानंतरही ज्या विभागांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती दिली आहे त्या सर्व जन माहिती अधिका-यांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, बांधकाम विभागाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच, ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जबाबदार असलेल्या सर्व संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५५

निर्णय दिनांक  २०-०१-२००९

१ श्री. नंदकिशोर भाऊसाहेब पाटील जाधव, अपिलार्थी
मु. पो. पालखेड, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये दिनांक ०१-०१-२००४ ते २९-०८-२००७ या कालावधीशी संबंधीत, सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैजापूर यांच्याबाबत आलेल्या तक्रारींची यादी, काम तपासणी केलेला अहवाल, या तक्रारींच्या वरील कामांची यादी, अशी माहिती जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. या अर्जामध्ये त्यांनी ते स्वतः दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली. तथापि सदर माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-१०-२००७ रोजी अंतीम सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेला चौकशी अहवाल त्यांना पाहण्यासाठी ठरवून दिलेल्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी नियमातील तरतुदीस अनुसरुन फक्त निरीक्षणास उपलब्ध करुन द्यावा व विभागीय चौकशीची कारवाई पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थीस सदरहू प्राथमिक चौकशी अहवाल देखील उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील अद्यापपावेतो ३ प्रकरणातील प्रारंभिक चौकशी अहवालांच्या प्रतींची आवश्यकता आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती एकूण १५ प्रकरणांशी संबंधीत असून यातील १४ प्रकरणापैकी ९ प्रकरणासंबंधी चौकशी सुरु असल्याने या प्रकरणांची माहिती त्यांच्याकडे अद्यापपर्यंत उपलब्ध झालेली नाही. शिल्लक ५ प्रकरणापैकी २ प्रकरणात तथ्य आढळून न आल्याने त्याची माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली, एका प्रकरणी चौकशी झाली नाही मात्र तथ्य आढळलेल्या ३ प्रकरणी चौकशी अहवाल उपलब्ध करुन दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर अहवाल अपिलार्थीस उपलब्ध करुन दिल्याने त्याचा विपरीत परिणाम कामासंदर्भात भविष्यात केल्या जाणा-या विभागीय चौकशीवर होईल. हा परिणाम अपिलार्थीस माहिती दिल्यास विभागीय चौकशीवर कसा होईल असे विचारल्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी असे सागितले की, अपिलार्थी हे त्यांना माहिती प्राप्त झाल्यावर, ही माहिती ते अपचारी अधिका-यांना पुरवू शकतील जेणेकरुन या अहवालातील मुद्दे अपचारी अधिका-यांना ज्ञात होतील व

ते विभागीय चौकशीची कारवाई पुढे ढकलू शकतील व परिणामी अपचारी कर्मचा-यांना वेळेत शिक्षा देता येणार नाही. त्यामुळेच ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील बहुतांश माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. आयोगाकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या ३ प्रकरणांच्या प्रारंभिक अहवालाच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी राज्य माहिती आयोगासमोर उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीस संबंधित प्रकरणातील प्रारंभिक चौकशी अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन दिल्यास, अपिलार्थी सदर माहिती कदाचित अपचारी अधिका-यांना दाखवतील व त्यातील काही मुद्दयांचा आधार घेऊन अपचारी हे विभागीय चौकशी लांबणीवर टाकू शकतील. जन अपिलीय अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही, कारण विभागीय चौकशीच्या प्रकरणी करण्यात येणा-या कारवाईमध्ये शासनाकडून विभागीय चौकशी अधिका-याकडे दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती, ज्या अधिका-यांच्याविरुध्द विभागीय चौकशी चालू केली आहे त्या अधिका-यांना / कर्मचा-यांना देण्यात येतात. त्यावर त्यानंतर दोनही पक्षांचा युक्तिवाद होऊन अंतीम निर्णय संबंधित प्राधिकरणाकडून घेतला जातो, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेला प्रारंभिक चौकशी अहवाल अपचारी कर्मचारी / अधिका-यांना एवीतेवी प्राप्त होणार आहेच. त्याचबरोबर दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना या निर्णयाव्दारे संबंधीत प्रारंभिक अहवाल हा अपिलार्थीस निरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिला आहे, फक्त त्याच्या प्रती अपिलार्थीस देण्याची त्यांची तयारी नाही. आयोगाच्या मते जन अपिलीय अधिकारी यांची प्रथम अपिलावर निर्णय देतांना त्यांनी घेतलेली भूमिका ही त्यांच्या वरील युक्तिवादाशी पूर्णपणे विसंगत आहे. अपिलार्थीस उर्वरित ३ प्रकरणातील प्रारंभिक चौकशी अहवालाच्या प्रती दिल्यास माहिती अधिकार अधिनियमातील कोणत्याही तरतुदींचा भंग होतो, असे आयोगास वाटत नाही. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून उपलब्ध करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नंदकिशोर भाऊसाहेब पाटील जाधव, मु. पो. पालखेड, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, तथा कार्यकारी अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५६

निर्णय दिनांक २०-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सरदार हरजीतसिंग तीरथसिंग सहानी,<br>५-१-५५/१, उस्मानपुरा,<br>औरंगाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक संचालक,<br>नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : सहाय्यक संचालक नगर रचना तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपर्यंत दिनांक २७-०२-२००७ रोजी मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही, तसेच त्यांनी यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०४-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना मोफत

मिळावी व संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) प्रमाणे आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी इनवर्ड नं. २४३ या आवक क्रमांकाव्दारे केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय चौकशी / कारवाई केली त्याची माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, म्हणून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये माहिती अधिकार अधिनियमाव्दारे मागणी केलेली माहिती कधीही वेळेवर प्राप्त होत नाही. मागील तारीख टाकून अर्जदाराच्या अर्जासंदर्भात त्यांना उत्तर दिले जाते. उपरोक्त प्रकरणी त्यांनी दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे अशी तक्रार केली होती की, एका व्यक्तीने बनावट कागदपत्रे दाखल करुन महानगरपालिकेकडून टेलीफोन बुथसाठी नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले आहे. या प्रकरणी संबंधीत व्यक्तीने महानगरपालिकेकडे दाखल केलेली कागदपत्रे बनावट असल्याचे सिध्द झाल्याने त्यांनी महानगरपालिकेत तक्रार दाखल केली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडील जानेवारी २००७ ते आजपर्यंतच्या नाहरकत प्रमाणपत्रांच्या अभिलेख्याची त्यांना पाहणी करावयाची आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ११-०५-२००७ रोजी विनामूल्य पुरविण्यात आली असून ही माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोचसही त्यांच्याकडील दिनांक ११-०५-२००७ च्या पत्राच्या मूळ प्रतीवर उपलब्ध आहे. ही सही त्यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास, अपिलार्थीस दाखविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित होती. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जास जन

माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविण्यासाठी कोणतीही अडचण असण्याचे कारण दिसून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०५-२००७ रोजी म्हणजे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर माहिती दिली आहे. अपिलार्थीस अशा प्रकारे जी माहिती दिनांक २९-०३-२००७ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे क्रमप्राप्त होते ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी ४३ दिवसाच्या विलंबाने दिली आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती देण्यासाठी, माहितीचे स्वरुप सरळ व सोपे असतांना, जन माहिती अधिकारी यांनी लावलेल्या ४३ दिवसांच्या विलंबाचे कोणतेही समर्थन असू शकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याच्या कृतीव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य-परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याची आयोगाची खात्री झाली असल्याने आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्याबाबत आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नाहरकत प्रमाणपत्राचे अभिलेखे तपासणीची मागणी केली आहे. तथापि ही मागणी त्यांनी त्यांच्या दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये केलेली नाही त्यामुळे यासंदर्भात त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांना आवश्यक असलेल्या अभिलेख्याच्या तपासणीसाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार स्वतंत्र अर्ज करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सरदार हरजीतसिंग तीरथसिंग सहानी, ५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३१२

निर्णय दिनांक २०-०१-२००९

१ श्री. शेख मोईन शेख इब्राहिम, अपिलार्थी

मु. पो. आष्टी, तालुका परतूर,

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर

जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती न मिळाल्याने केले असल्याचे या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक १९-०१-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी

यांच्याकडून त्यांना दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केले आहे व त्यांना प्राप्त झालेल्या माहितीबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-०६ व २००६-०७ या कालावधीशी संबंधीत, गांडूळखत बीज उत्पादन यादी, फळबाग अनुदान यादी, पुर्नजिवित योजनेंतर्गत अनुदान वाटप झाल्याबाबत यादी, पुष्प उत्पादन अनुदान वाटप यादी, रोजगार हमी योजनेची कामे, कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याची मजूरांची यादी, बी बियाणे व औषधी व खत वाटप झाल्याची यादी, ही माहिती मागितली होती. ही माहिती अपिलार्थीस आता अपिलार्थीच्या विचाराधीन व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या एक दिवस आधी, दिनांक १९-०१-२००९ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे व प्रत झ ालेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीची कोणतीही तक्रार नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता जरी माहिती प्राप्त झाली आहे तरी ती विलंबाने प्राप्त झाल्याची वस्तुस्थिती नजरेआड करण्यासारखी नाही असे आयोगास वाटते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडील मंडळ कृषि अधिकारी, परतूर व आष्टी यांच्याकडे उपलब्ध होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप अत्यंत मर्यादित होते. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांना मदत करणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबास मंडळ कृषि अधिकारी, आष्टी व परतूर हे जबाबदार असल्याचे दिसून येते. सबब, आयुक्त (कृषि) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे मंडळ कृषि अधिकारी यांच्यावर, त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आता प्राप्त झाली असल्याने, माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयुक्त (कृषि) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक, मंडळ कृषि अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख मोईन शेख इब्राहिम, मु. पो. आष्टी, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८५

निर्णय दिनांक २०-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. विश्वनाथ महिपती हरण,<br>मु. पो. सावरखेडा,<br>तालुका जिल्हा हिंगोली | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, हिंगोली, जिल्हा हिंगोली | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल),<br>हिंगोली, जिल्हा हिंगोली | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन अपिलीय अधिकारी | : | उपजिल्हाधिकारी, हिंगोली |
| | त्रयस्थ पक्ष | : | १. श्री. एस. एच. कांबळे,<br>२. श्री. दत्ताराव मुटकुळे,<br>३. मंडळ अधिकारी, कान्हेड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष श्री. एस. एच. कांबळे व श्री. दत्ताराव मुटकुळे हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर दिलेला निर्णय मान्य नसल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या अर्जासोबत मूळ माहितीच्या अर्जाची प्रत जोडून त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या मौजे सावरखेडा येथील गट नंबर २८ मधील ६० आर जमिनीचा बनावट फेरफार नंबर १४५ घेतल्याबाबत त्यांनी दिनांक १९-०५-१९९७ रोजी तहसीलदार, हिंगोली, जिल्हाधिकारी, परभणी, कमिशनर, औरंगाबाद यांना लेखी अर्जाव्दारे बनावट फेरफारासंदर्भात तक्रार केली होती. या अर्जावर झालेल्या कारवाईसंदर्भात माहिती मागितली होती. तसेच या अर्जामध्ये त्यांनी संदर्भिय जमिनीचा फेरफार नंबर १४५ रद्द केला की नाही असा प्रश्नही विचारला होता, आणि फेरफार रद्द करेपर्यंत त्यांना दरवर्षी ३५०० रुपये इतकी नुकसानभरपाई देण्याच्या या अर्जामध्ये केलेल्या विनंतीबरोबर यासंदर्भात तलाठी श्री. कांबळे, मुटकुळे व मंडळ अधिकारी कान्हेड यांच्याविरुध्द केलेली कारवाई, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागितली असल्याने व ही माहिती खुलासे अपेक्षित करणारी असल्याने अशा प्रकारची माहिती, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत देणे बंधनकारक नसल्यामुळे, अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झ ाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०९-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दिनांक २८-०९-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे असे कारण दर्शवून अपिलार्थीची विनंती अमान्य केली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये संदर्भित केलेला फेरफार क्रमांक १४५ हा २००७ साली उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांनी रद्द केला असून या प्रकरणाशी संबंधीत तलाठी श्री. एस. एच. कांबळे यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी थांबविली असून श्री. दत्ताराव मुटकुळे यांच्यावर ठपका ठेवण्याची

कारवाई केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची व त्यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी असल्याने अपिलार्थीच्या अर्जास त्यांनी दिनांक ०४-०९-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन जन माहिती अधिकारी यांनी व्यवस्थित केलेले नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे तलाठी श्री. एस. एच. कांबळे, श्री. दत्ताराव मुटकुळे व मंडळ अधिकारी कान्हेड यांच्यावर त्यांच्या जमिनीच्या फेरफार प्रकरणी काय कारवाई केली याची माहिती मागितली होती व फेरफार नंबर १४५ हा रद्द केला की नाही ही माहिती त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपात मागितली होती. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती प्रश्नार्थक स्वरुपात नसून यातील जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यावर केलेली कारवाई ही माहिती, अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) व ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे देय ठरते. अपिलार्थीने मूळात प्रश्नार्थक माहिती विचारली नाही. ती माहिती जन माहिती अधिकारी यांना प्रश्नार्थक स्वरुपात वाटण्याचे त्यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हे एकच कारण असावे, अपिलार्थीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांनी नीट वाचला नसावा. फेरफार रद्द केला की नाही ही माहिती मात्र प्रश्नार्थक स्वरुपात असल्याने ती अपिलार्थीस त्यावेळी देय नव्हती, मात्र आता संदर्भिय प्रकरणाची वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाने आयोगास स्पष्ट केली असून त्यामध्ये अपिलार्थीचा फेरफार क्रमांक १४५ आता २००७ साली रद्द केला आहे, या प्रकरणी संबंधीत तलाठी श्री. कांबळे यांची एक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करण्यात आली आहे, श्री. मुटकुळे यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे व मंडळ अधिकारी कान्हेड हे आता नियत वयोमानानुसार सेवेतून निवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही अशी तोंडी माहिती त्यांनी आयोगास आज दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी संबंधीतावर केली गेलेली कारवाई या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत तलाठी यांच्यावर महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकरणाने केलेल्या कारवाईच्या आदेशाच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. जेणेकरुन अपिलार्थीस आवश्यक माहिती प्राप्त होऊ शकेल.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेतांना अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाचे त्यांनी स्वतः नीट अवलोकन केल्याचे आढळून येत नाही. त्यांनी

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे काळजीपूर्वक अवलोकन न केल्याने त्यांच्याकडून अपिलार्थीच्या दिनांक ०६-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर दिलेला निर्णय हा सदोष ठरतो. इत:पर अपिलार्थीच्या अपिलांवर निर्णय घेतांना त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून हेतुतः दडविल्याचे अथवा त्यांना ती माहिती देण्याचे टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, संबंधीत तलाठी यांच्यावर महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकरणाने केलेल्या कारवाईच्या आदेशाच्या प्रती व अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०१-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विश्वनाथ महिपती हरण, मु. पो. सावरखेडा, तालुका जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४१३
निर्णय दिनांक २१-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शब्बीर अहमद अब्दुल जब्बार,<br>रा.मालेगाव,जि. नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>इमारत पर्यवेक्षक,<br>मालेगाव महानगरपालिका,<br>मालेगाव जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>नगर रचनाकार,<br>मालेगाव महानगरपालिका,<br>मालेगाव जि.नाशिक. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे २०.०४.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, शासकीय माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी उत्तरे देऊन माहिती दडविली आहे. वस्तुनिष्ठ माहिती देण्याचे नाकारले.दिलेली उत्तरे समाधानकारक नाही, त्यांची दिशाभूल केली गेली, याबाबत त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील सुनावणीच्या वेळी त्यांच्या निदर्शनास आणले असता, त्यांनी

अपिलार्थीचे म्हणणे ऐकून घेतले नाही व जन माहिती अधिकारी यांच्या हिताचे रक्षण करुन त्यांची बाजू उचलून धरली व अर्जाशी संबंधित सर्व मुद्याचा विचार अपीलाच्या सुनावणीमध्ये केला गेला नाही, मालेगाव शहरातील स.नं.२९८,३५२/१-२ फायनल प्लॉट नं.९४ मधील जागा, जाणता राजा मित्र मंडळा या संस्थेस शैक्षणिक व सामाजिक कार्यालयासाठी देणेस तत्कालीन नगरपालिकेच्या जनरल बोर्ड ठराव क्र.१५९, दि. २९.१.०१ अन्वये मंजूरी देण्यात आली. मात्र जागेचा वापर ठरलेल्या कारणास्तव व तरतुदीनुसार केली जात नाही. याचाच अर्थ नियमांचा भंग करण्यात आला, असा होत नाही का? याचा स्पष्ट खुलासा होत नसल्याने त्यांचे समाधान झालेले नाही. संबंधित संस्थेने मंजूर नकाशाव्यतिरिक्त जास्तीचे बांधकाम केलेले आहे. तथापि बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्याविरुध्द कायदेशीर कारवाई काय करण्यात आली वा येणार आहे, याबाबत कुठलेच सुतोवाच या माहितीमध्ये नाही, बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र संबंधितांनी घेतलेले नाही, असेही संबंधित जन माहिती अधिकाऱ्यानी म्हटले आहे,यासंदर्भात कार्यवाहीचा उल्लेख नाही अथवा स्पष्टीकरण नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने त्यांचे समाधान झालेले नाही. " या सर्व कारणास्तव अधिनियमाप्रमाणे संबंधितांविरुध्द कारवाई करावी, या संदर्भात माहिती मिळणे आवश्यक असल्याचे नमूद करुन अपिलार्थीने त्यांना सविस्तर माहिती मिळण्याची आयोगाकडे विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि. १४.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मालेगाव शहरातील वरील परिच्छेदात निर्देशित केलेल्या सर्व्हेनंबरमधील बांधकामाबाबत सन २००१ ते २००२ या कालावधीशी संबंधित एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्लॉट नं.९४ मधील जागा जनरल बोर्ड ठराव क्र.१५९ दि. २१.१२.२००१ अन्वये एका संस्थेस हस्तांतरित केली काय ? त्या जागेवर नियमानुसार किती क्षेत्रावर बांधकाम करता येते, संबंधित संस्थेचे बांधकामासाठी परवानगी देण्यात आली आहे का ? परवानगी दिलेली असल्यास परवानगी पत्राची प्रत, ज्या स्वरुपात बांधकाम करण्याची

परवानगी देण्यात आली त्याप्रमाणे बांधकाम केले आहे, याची पडताळणी करण्यात आली आहे काय ? संबंधित बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्राची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दि. १६.३.२००७ रोजी पारित करुन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे विनापरवानगी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचा दि.१४.१२.२००६ रोजीचा मूळ अर्ज त्यांना दि. ३.१.२००७ रोजी प्राप्त झाला असून, मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना त्यांच्याकडील दि. २४.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांची छाननी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १४.१२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असतानाही जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस आयोगाकडील द्वितीय अपील अर्जावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस संबंधित जागेच्या केल्या जाणाऱ्या गैरवापराबद्दल तसेच अनधिकृत बांधकामाबद्दल जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज करताना संबंधित बांधकामावर केलेल्या कार्यवाहीबाबत कोणत्याही मुद्याद्वारे माहिती अपेक्षिली नाही. तसेच जागेचा वापर नमूद केलेल्या कारणाशिवाय इतर कारणाकरिता केल्याबाबत देखील

अपिलार्थीने मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतीही माहिती मागितलेली नाही. अपिलार्थीने हे मुद्दे आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये प्रथमतः उपस्थित केले आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील मुद्यांचा परामर्ष घेण्याची आयोगास अधिकारिता नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत पुरविली आहे, हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शब्बीर अहमद अब्दुल जब्बार,११२६,इस्लामपूरा, लुल्ले दूध डेअरीजवळ,मालेगाव, जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगाव महानगरपालिका,मालेगाव जि.नाशिक. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका,मालेगाव जि.नाशिक. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४२१
निर्णय दिनांक २१-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जे.एन.लगड,<br>रा.नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, शहर मंडळ कार्यालय<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.<br>नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, शहर मंडळ कार्यालय<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.<br>नाशिक | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी वकीलासह हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि.४.४.२००७ रोजी नोंदविलेले दि. २१.०३.२००७ रोजीचे द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये, 'अपीलाची कारणे'या सदरापुढे, "अनधिकृत वीज खंडीत ६.३० तासाची ग्राहकास भरपाई हवी असल्याने " असे नमूद केले आहे व 'आवश्यक असलेली माहिती' या सदरापुढे, "दि. ५.११.०६ रोजी संध्या. १७.४५ वा. ते रात्री ०.१५ वा. (२४.१५ तास) वीज खंडीत होती." असे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथमतः दि. १०.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित भार नियमन व दि. ५.११.२०६ रोजी खंडीत झालेल्या वीज प्रवाहाबद्दल ग्राहकास भरपाई मिळण्याबाबत, त्यांनी विनंती केल्याची, माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दि.५.११.२००६ रोजी वीज पुरवठा खंडीत झाल्याबाबतची कारणे अवगत करुन, तांत्रिक बिघाड/नैसर्गिक आपत्तीमुळे खंडीत होणाऱ्या वीज पुरवठयाबाबत कंपनीतर्फे कोणत्याही प्रकारची भरपाई देण्याची तरतुद नाही, असे म्हटले आहे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.१.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २०.२.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे युक्तिवाद करणारे त्यांचे कायदेशीर सल्लागार श्री. ए.जी. देशपांडे हे त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेताना हजर नव्हते. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये माहिती अधिकाऱ्यास प्रतिकात्मक दंड सूचविला तथापि या संदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार केला असता, त्यांच्या पत्रास जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०.११.२००६ रोजी केलेला अर्ज बेकायदेशीर आहे. नवीन विद्युत जोडणी मंजूर करण्यापूर्वी, प्रत्येक विद्युत ग्राहक व महावितरण कंपनी या दोघांमध्ये एक करारनामा करणे अनिवार्य आहे, या करारनाम्यातील कलम १७ नुसार नैसर्गिक आपत्तीमध्ये होणाऱ्या नुकसानीस महावितरण कंपनी जबाबदार असू शकत नाही. अपिलार्थीने संदर्भित केलेला कथित खंडीत विद्युत पुरवठा नैसर्गिक आपत्तीमुळे झालेला असल्यामुळे अपिलार्थीस कोणतीही नुकसान भरपाई मूळात देय असू शकत नाही. या प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीशी ते स्वतः कोणत्याही प्रकारे संबंधित अथवा विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने बाधीत झाले नव्हते, त्यामुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा गैरवापर केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांची छाननी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि. १०.११.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना वीज पुरवठा खंडीत झाल्याबद्दल नुकसान भरपाई हवी असल्याचे स्पष्ट केले आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास, ती माहिती अर्जदारास विहित मुदतीत पुरविण्यासाठीची प्रक्रिया नमूद केली आहे. अपिलार्थीच्या विचाराधीन अर्जामध्ये अपिलार्थीने नुकसान भरपाईची विनंती केली आहे. अशाप्रकारे अपिलार्थीने स्वतःच्या वैयक्तिक कामाची विनंती जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अशाप्रकारच्या विनंतीसाठी दुसरे सक्षम प्राधिकरण जिल्हास्तरावर (ग्राहक तक्रार निवारण मंच)अस्तित्त्वात आहे व माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे अशाप्रकारच्या अपिलार्थीच्या वैयक्तिक विनंतीवर आदेश देण्याची अधिकारिता नाही.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कायदेशीर सल्लागाराच्या उपस्थितीविषयी प्रश्न उपस्थित केला, याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे कायदेशीर सल्लागार आयोगाकडील सुनावणीस हजर राहण्यासाठी आयोगाची कोणतीही हरकत नाही. याकरिता त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीसाठी त्यांनी हजर राहणे हे त्यांना अनिवार्य नाही.

तसेच जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे केलेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी या माहितीशी कोणत्याही प्रकारे संबंधित नसल्याने, त्यांना सदर माहितीकरिता मागणी करता येईल किंवा कसे, याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने काही शंका व्यक्त करुन आपले आक्षेप युक्तिवादामध्ये उपस्थित केले आहेत, त्याबाबत त्यांना असे ज्ञात करुन देण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ च्या तरतुदीनुसार कोणत्याही भारतीय नागरिकास कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची मागणी करण्याचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे त्यांचे अपिलार्थीच्या संबंधित अर्जाबाबतच्या त्यांच्या माहिती मिळण्याच्या अनुज्ञेयतेविषयीचे जन माहिती अधिकारी यांचे आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना जन माहिती अधिकारी यांना प्रतिकात्मक दंड रु.२५०/- व ताकीद देण्याबाबत सूचविले आहे, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेला हा आदेश देताना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केले आहे. अशाप्रकारची, त्यांची अधिकारिता नसलेल्या बाबीसंबंधी सूचित करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी इतःपर टाळावे, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्यासंदर्भात, त्यांना आयोगातर्फे, ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामधील विनंतीवर आदेश देण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगाला नसल्याने, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयरामपंत नामदेवराव लगड, पाटील प्राईड,अे-१-दिपालीनगर,नाशिक-४२२ ००९ मु.पो.ता.जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, शहर मंडळ कार्यालय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, शहर मंडळ कार्यालय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५०
निर्णय दिनांक २१-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. तांबोळी निसार अहमद शेर महंमद, धुळे | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,धुळे | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,धुळे | | |

त्रयस्थ पक्षः १.श्री. अन्सारी नवाब माजिद,मुख्याध्यापक,
एल.एल.सरदार ऊर्दू हायस्कूल,धुळे
२.श्रीमती फैजाना मुख्तार अहमद, आबेदा अब्दुल मुग्नी गर्ल्स हायस्कुल, आझाद नगर, धुळे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. ०६.१०.२००६ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दि. १.७.२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना आवश्यक असलेली माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून दि. ३१.७.२००६ रोजी पर्यंत माहिती उपलब्ध होणे अथवा माहिती अर्ज नाकारणे किंवा दि. ६.७.२००६ पर्यंत संबंधित प्राधिकरणाकडे त्यांच्या अर्ज वर्ग करणे आवश्यक होते. तथापि अधिनियमातील तरतुदीनुसार विहित केलेल्या मुदतीत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या संदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ४.९.२००६ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी ४५ दिवसांचा विलंब लावल्याचे मान्य केले आहे. अपिलीय अधिकारी यांनी, झालेल्या विलंबाबाबतची जबाबदारी सहायक माहिती अधिकारी यांच्यावर टाकली होती. या ठिकाणी सहायक माहिती अधिकारी यांचा कुठलाही संबंध आला नाही. जन अपिलीय अधिकारी यांना विलंबाबाबत दंड प्रक्रियाची अधिकारिता कायद्यामध्ये नसल्याने, हे अपील त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. १.७.२००६ रोजीच्या त्यांच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण ७ महिन्याच्या कालावधीतील (निश्चित कालावधी अपिलार्थीने या मध्ये नमूद केला नाही) शिक्षकांच्या पदमान्यता ठरावासंदर्भात ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एल.एम.सरदार ऊर्दू हायस्कूल धुळे, अँग्लो उर्दु हायस्कुल, धुळे व आबेदा अब्दुल मुग्नी गर्ल्स हायस्कूल, धुळे या शाळांशी संबंधित होती. अपिलार्थीने ही माहिती 'लोकल टपालाद्वार'अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ४.९.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.९.२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. २०.९.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थी यांनी मान्य केले आहे. या अपील निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास ४५ दिवसांचा विलंब झाल्याचे मान्य केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर त्यांच्या प्रतिनिधीमार्फत सादर केला असून यामध्ये अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, प्रथम अपिलाच्या निर्णयाप्रमाणे सहायक जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एल.एम.सरदार ऊर्दू हायस्कूल यांच्यावर रु.२५०/- प्रमाणे एकूण ४५ दिवसांच्या विलंबाकरिता रु.११,२५०/- इतकी शास्ती लावण्यात यावी, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज विहित मुदतीत संबंधितांकडे हस्तांतरित न केल्याने त्यांच्याविरुध्द शास्ती लावण्याचे आदेश व्हावेत व कलम १९(ख) प्रमाणे वकील फीस रु.५००/- व जा-ये -खर्च रु.५००/- संबंधितांनी अपिलार्थीस देण्याचे आदेशित व्हावे. जन माहिती अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाने यापूर्वी रु. २५०००/- इतकी त्यांच्या दि. ४.१.२००७ रोजीच्या आदेशाप्रमाणे शास्ती लावण्यात आली आहे, यावरुन त्यांनी सातत्याचे कायद्याचे पालन केले नाही त्यामुळे त्यांच्यावर कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश व्हावेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण ४१७ शाळांचा समावेश होतो. त्यांच्याकडे या शाळेच्या विषयी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दररोज अनेक अर्ज प्राप्त होत असतात. या प्रकरणी अपिलार्थीचा दि. १.७.२००६ रोजीचा अर्ज त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यासाठी विलंब लागल्याचे त्यांनी मान्य केले. हा विलंब त्यांना, त्यांच्याकडे असलेले अपूरे मनुष्यबळ व कामाचा व्याप यामुळे लागला असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज पाठविल्यानंतर अपिलार्थीस अँग्लो उर्दु हायस्कुल, धुळे व आबेदा अब्दुल मुग्नी गर्ल्स हायस्कूल, धुळे यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली आहे, मात्र एल.एम. सरदार ऊर्दू हायस्कूल, धुळे यांच्याकडून अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब झाला.

मुख्याध्यापक, एल.एम.सरदार हायस्कूल,धुळे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १२.९.२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कारण त्यांनी आयोगास असे अवगत केले की, ही माहिती देण्यासाठी त्यांना त्यांच्या संस्थेच्या अध्यक्षांची परवानगी घेणे आवश्यक होते. अपिलार्थीशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता ही माहिती अपिलार्थीने सरळ घेण्यास नकार दिला व ही माहिती ते जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडूनच प्राप्त करुन घेतील, असे सांगितले. त्यामुळे त्यांनी ही माहिती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे दि. १२.९.२००७ रोजी पाठविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १.७.२००६ रोजीचा मूळ अर्ज ज्या प्राधिकरणाशी संबंधित होता, त्या प्राधिकरणाकडे जन माहिती अधिकारी यांनी तो, दि. ६.७.२००६ रोजी अगर तत्पूर्वी पाठविण्याऐवजी तो त्यांनी दि.१३.७.२००६ रोजी पाठविला आहे. या विलंबाचे कारण त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. हे कारण कितीही वास्तववादी असले तरी, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांनी मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात होती, त्या प्राधिकरणाकडे पाठविण्यासाठी एकूण ७ दिवसांचा विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये या विलंबाचे समर्थन करण्यासाठी केलेला युक्तिवाद लक्षात घेऊन त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यास विलंब लावून अधिनियमातील कलम ६(३) चा भंग केल्यामुळे आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदींप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

त्रयस्थ पक्षासंबंधीची माहिती अपिलार्थीस सुनावणीपूर्वीच दिली गेली असल्याने या प्रकरणी त्रयस्थ पक्षाची काही हरकत नसल्याचे त्रयस्थ पक्षाने आज सुनावणीमध्ये आयोगास अवगत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून संबंधित प्राधिकरणास दि. १३.७.२००६ रोजी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यापैकी अँलो उर्दु हायस्कूल,धुळे यांनी दि. २५.७.२००६, आबेदा अब्दुल मुग्नी गर्ल्स हायस्कूल,धुळे यांनी दि. १४.८.२००६ रोजी असे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस माहिती दिली आहे. मात्र एम.एल.सरदार हायस्कूल,धुळे यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा ६ दिवस विलंबाने अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे दिसून येते, संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एल.एम. सरदार हायस्कूल,धुळे यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस ६ दिवस विलंबाने पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने, अध्यक्ष, सरदार शिक्षण संस्था,धुळे यांना संबंधितावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची, शिफारस करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी हे वारंवार एकाच प्रकारची माहिती मागवून त्यांच्या कार्यालयास वेठीस धरत असल्याचे आयोगास अवगत केले. आयोगातर्फे अपिलार्थीस, अशाप्रकारे त्यांनी एकच माहिती वेळोवेळी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे विनाकारण मागू नये, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अध्यक्ष, सरदार शिक्षण संस्था, धुळे यांना शाळेच्या संबंधित मुख्याध्यापकावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तांबोळी निसार अहमद शेर महंमद, ३५,अविष्कार कॉलनी, चाळीसगाव रोड,धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष, सरदार शिक्षण संस्था,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५४
निर्णय दिनांक २१-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अरुण विनायक पाटील,<br>रा.अमळनेर,जि.जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपकार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अमळनेर, जि.जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अमळनेर जि.जळगाव | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे २८.०५.२००६ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, राज्य जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. दिलेली माहिती असंदिग्ध आहे

व जन अपिलीय अधिकारी यांनी अपील प्रकरणी त्यांचे काहीही ऐकून न घेता चुकीची कारणे देऊन पक्षपातीपणाने निर्णय घेतला असल्याने, त्यांनी हे अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः दि. १८.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-२००६ या कालावधीशी संबंधित " पावसाळयात व नगरपालिका निवडणूक आचारसंहितेत शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रत्यालगत अतिक्रमणे उठविता येत नाहीत, याबाबत कायदा, नियम,शासकीय धोरण किंवा तरतुद, जे असतील ते संदर्भासहीत लेखी स्वरुपात किंवा झेरॉक्स सत्य प्रमाणित प्रती मिळाव्यात, तसे नसल्यास स्पष्ट खुलासा व्हावा", अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्का रु.५४/- इतके त्यांच्या कार्यालयात पत्र मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत भरण्याचे सूचित करुन अपिलार्थीने या मुदतीत शुल्काचा भरणा न केल्यास, अपिलार्थीस माहितीची आवश्यकता नसल्याचे गृहीत धरुन त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येईल", असे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने दि. ८.२.२००७ रोजी शुल्क रु.५४/- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.२.२००७ रोजी व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.३.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.४.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी सुनावणीस गैरहजर राहिले,मात्र त्यांनी आपला युक्तिवाद जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात लेखी स्वरुपात सादर केला. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दि. २.२.२००७ रोजीचे पत्र व अपिलार्थीचे लेखी निवेदन लक्षात घेऊन त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.४.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी त्यांच्याकडे प्रथम अर्जाद्वारे केली होती, अशाप्रकारची कोणतीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. कारण पावसाळयात व नगर पालिका निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यालगतच्या व हद्दीतील अतिक्रमणे उठविण्यात येत नसल्यसाचे कोणत्याही सूचना अथा परिपत्रके शासनाने पारित केले नाहीत. (सन २००५-२००६ या कालावधीमध्ये) व तसे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. अपिलार्थीस, पावसाळयात व नगरपालिका निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यालगतची व हद्दीतील अतिक्रमण काढण्यासंदर्भात शासकीय नियम/परिपत्रके यासंबंधीच्या, त्यांनी मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीस अनुसरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी कागदपत्रे उपलब्ध होती, ती त्यांनी रु.५४/- इतके शुल्क आकारुन पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांची छाननी केली असता अपिलार्थीने त्यांच्या दि. १८.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-०६ यसा कालावधीशी संबंधित, पावसाळयात व नगरपालिका निवडणूक आचारसंहितेच्या

कालावधीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागातील रस्त्यालगतची व हद्दीतील अतिक्रमणे काढण्यात/उठविण्यात येत नसल्याबाबतचे कायदा/नियम/शासकीय धोरण किंवा तरतुद याविषयी माहिती मागितली होती. तथापि सार्वजनिक बांधकाम विभागाने या कालावधीमध्ये किंवा कधीही आचारसंहितेच्या कालावधीत आणि पावसाळयात अतिक्रमणे उठवू नयेत, अशा अर्थाचे कोणतेही परिपत्रक काढलेले नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत करुन दिले आहे. ही वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जास प्रतिसाद देताना अशाप्रकारची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, एवढी माहिती जरी दिली असली तरी अपिलार्थीचा कार्यभाग साधला असता. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये "तसे नसल्यास स्पष्ट खुलासा व्हावा." अशाप्रकारची माहिती मागितली आहे. येथे सर्व संबंधितांना असे अवगत करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्यानुसार माहिती अधिकाऱ्यास त्यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत कोणताही खुलासा मागण्याची तरतुद या नियमामध्ये नाही व अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द त्यांच्या कृतीबाबतचा कोणताही खुलासा देय होऊ शकत नाही, हे लक्षात घेता, माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणाही अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारस देण्यासंदर्भात प्रथमतः निर्णय घेणे व माहिती देण्याचा निर्णय झाल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार त्यावर कार्यवाही करणे, एवढीच मर्यादित प्रक्रिया अभिप्रेत आहे, हे पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या खुलाशाची मागणी त्यांना देय होत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे विहित मुदतीत कळविले असल्याने व तसेच अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी सुनावणीसाठी

आयोगासमोर विनापरवानगी गैरहजर आहेत. अपिलार्थीने त्यांचे द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी 'असंदिग्ध' माहिती दिली आहे, असे म्हटले आहे. 'असंदिग्ध' या शब्दाद्वारे अपिलार्थीस काय सूचवावयाचे आहे, याचा बोध आयोगास होत नाही. याच अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे ऐकून न घेता, चुकीचे कारण देऊन पक्षपातीपणे निर्णय घेतला आहे, असे म्हटले आहे. तथापि अपिलार्थीचा हा आक्षेप/आरोप अपिलार्थी आज रोजी सुनावणीस आयोगासमोर विनापरवानगी गैरहजर असल्याने सिध्द होत नाही.

अपिलार्थीस खुलासा देय नसतानाही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शासकीय नियमासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या आहेत, ही बाब येथे लक्षात घेण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण विनायक पाटील,रा.मराठा मंगल कार्यालय, शॉपिंग अमळनेर, जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०६०
निर्णय दिनांक २१-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विभोर दिलीप बारला,<br>रा.नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,<br>नाशिक | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: सहायक निबंधक, सहकारी संस्था-२, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक यांचे कार्यालय,नाशिक

जन अपिलीय अधिकारी: जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १५.०१.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीने, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही नाशिक जिल्हयातील नाशिक जिल्हा महिला विकास सहकारी

बँक व नाशिक पिपल्स को-ऑपरेटीव्ह बँक या दोन बँकांसंदर्भात होती. सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी, या दोन्ही बँकेस नागरी सहकारी बँक म्हणून रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेली आहे, असे आयोगास अवगत केले. गेल्या आठवडयात मा. मुंबई उच्च न्यायालयाने नागरी सहकारी बँकांच्यासंबंधाने काही आदेश दिले आहेत. या आदेशाचे अवलोकन करुन, नंतर विचाराधीन प्रकरणी निर्णय देणे आयोगास योग्य वाटते, त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

पुढील तारीख अपिलार्थीस व संबंधितांना नंतर कळविण्यात येईल, याची संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विभोर दिलीप बारला, १५, मुक्ती,९,समर्थनगर,नाशिक-४२२००५

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था-२,जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक यांचे कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०६४
निर्णय दिनांक २१-०१-२००९

१ श्री. मोहंमद. मुस्तफा पिता मोहंमद गुफरान, : अपिलार्थी
रा.मालेगाव, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
रुरल सब डिव्हिजन,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
ग्रामीण उपविभाग, मालेगाव जि. नाशिक.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
यु.सी.आर.(एम.एस.ई.बी.)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
ग्रामीण उपविभाग, मालेगाव जि. नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
शहर तथा ग्रामीण विभाग, मालेगाव जि. नाशिक.

जन अपिलीय अधिकारी: उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
शहर तथा ग्रामीण विभाग, मालेगाव जि. नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१०.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने दि. २५.१२.२००८ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे जो अपील अर्ज दाखल केला आहे, त्या अपिलाबद्दल त्यांना काहीही कल्पना नाही. त्यांची दिशाभूल करुन आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावर त्यांची सही घेतली गेली आहे. त्यामुळे आयोगाकडे केलेला अपील अर्ज रद्द करण्याची विनंती त्यांनी आयोगाकडे या पत्रामध्ये केली आहे.

अपिलार्थीने सदर पत्र आयोगाकडे न पाठविता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिले असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत करुन दिले व तसे जन माहिती अधिकारी यांनी या पत्रावर लेखी अभिप्राय दिले आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेला अपील अर्ज रद्द करण्यासाठी केलेली विनंती मान्य करण्यात येत असून अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्र.२०६४/०७,दि.१०.१०.२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अपील क्र.२०६४/०७,दि.१०.१०.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहंमद मुस्तफा पिता मोहंमद गुफरान, स.नं.२२४/२,प्लॉट नं.६ इजहार, अश्रफनगर,दयाने, मालेगाव ता.मालेगाव जि.मालेगाव

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.ग्रामीण उपविभाग,आनंद भवन मालेगाव जि. नाशिक. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. शतग्रा विभाग, मालेगाव जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०२
निर्णय दिनांक २१-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. छगन गोविंद ढोणे,<br>रा. नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुद्रांक जिल्हाधिकारी तथा जिल्हा सहनिबंधक वर्ग-१, पुणे. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर,पुणे. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०४.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, "जन माहिती अधिकारी यांनी दि. ९.१.२००७ रोजी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर दिलेल्या आदेशाविरोधात अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ७.२.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपील दाखल केले होते. तथापि त्यावरील आदेश किंवा उत्तर त्यांना संबंधितांकडून प्राप्त झाले नाहीत, या अभिप्रायाबरोबरच त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः दि. ०९.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित मुद्रांक तिकीट विक्रीबाबत एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षतः दि. २८.१२.२००६ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ७.२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.३.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हे हजर राहू शकत नसल्याचे, त्यांनी फॅक्सद्वारे जन अपिलीय अधिकारी यांना दि. १२.३.२००७ रोजी कळविले. तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. २२.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीची पुढील तारीख देण्याची विनंती केली. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील दाखल केले आहे

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे विनापरवानगी गैरहजर आहेत. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जासोबत जोडलेल्या निवेदनातील अभिप्राय विचारात घेऊन, त्यांचे द्वितीय अपिलावर निर्णय घेण्यात येत आहे. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मोघम स्वरुपाची माहिती मिळाली आहे. मुद्रांक तिकीट विक्रीबाबत नेमकी कोणती माहिती ठेवणे आवश्यक व बंधनकारक आहे. ही माहिती त्यांना अपेक्षेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली नाही, तसेच या संदर्भातील कायदेशीर तरतुदी त्यांना अवगत झाल्या नाहीत. तसेच त्यांनी मुद्रांक तिकीट विक्रेत्यांच्या शिक्क्याबाबत आपल्या काही शंका व्यक्त करुन या शंकांचे

स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.३.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात कोर्ट फी तिकीट विक्रीबाबत साठा नोंदवहीमध्ये रोज नोंद घेणे आवश्यक आहे, असे म्हटले आहे, असे म्हणण्याऐवजी जर जन माहिती अधिकारी यांनी शासनाने अथवा  जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणत्याही परिपत्रकाद्वारे अथवा कायद्यातील एखाद्या कलमाद्वारे, तिकीट विक्रीबाबत जर निश्चित स्वरुपाचे प्रपत्र/परिपत्रक साठा नोंदवहीसाठी विहित केले असेल तर त्या प्रपत्राची/परिपत्रकाची अथवा साठा नोंदवहीच्या नमुन्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्यास त्यांचे काम भागू शकेल, असे आयोगास वाटते. त्याचबरोबर अपिलार्थीने मुद्रांक विक्रेत्यांच्या नावाचा शिक्का कसा असावा, याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. यासंदर्भात देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासनाने अथवा त्यांच्या वरिष्ठ प्राधिकरणाने यासंदर्भात दिलेल्या लेखी स्वरुपातील सूचना अथवा कायद्यामध्ये या संदर्भाने केलेली तरतुद याची प्रत अपिलार्थीस पाठविल्यास अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती त्यांना मिळू शकेल, असे आयोगास वाटते.

आज रोजी सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी आयोगाच्या कार्यालयातून दि.२.१२.२००८ रोजीच्या सूचनापत्राद्वारे व दि.१५.१.२००९ रोजी ठीक १२.३० वा जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री. पट्टणकुडे यांच्यामार्फत दूरध्वनीद्वारे सूचित करुनही जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस दि. ७.२.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीचा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे

मत आहे. सबब सचिव (महसूल) यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्य नोंद घेण्याचे आयोगाकडून सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. छगन गोविंद ढोणे,एन-४२-ए/बी-१/७/६, ना.म.को.बँकेच्या पवननगर शाखेजवळ, लोकमान्यनगर, चौथी स्किम,सिडको,नाशिक-८

२. जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी तथा जिल्हा सहनिबंधक, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०६
निर्णय दिनांक २१-०१-२००९

१ श्री. कैलास देवराम पाटील, : अपिलार्थी
रा.जळगाव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालय
(श्रम साधना बॉम्बे ट्रस्ट), बांभोरी,ता.धरणगाव
जि.जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मॅनेजिंग ट्रस्टी, अभियांत्रिकी महाविद्यालय
(श्रम साधना बॉम्बे ट्रस्ट), बांभोरी,ता.धरणगाव
जि.जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी त्यांच्या वकीलासह उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १९.०५.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, २ वर्षांपासून श्रम साधना बॉम्बे ट्रस्ट संचलित तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयाची माहिती मागितली होती, तथापि त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.४.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. त्यासंबंधाने जन माहिती व अपिलीय अधिकारी

यांनी प्रतिसाद न दिल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे व त्याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमत: दि. ०७.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी श्री. भास्कर अहिरराव या माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ५.८.२००५ व दि.२४.०६.२००६ रोजी विहित प्रपत्रात अर्ज करुन मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सत्वर पुरवावी, अशी विनंती केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.४.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.६.२००८ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात दि. १८.८.२००८ रोजी आपले निर्णय पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस दि. ६.८.२००८ पासून १५ दिवसांच्या आत सशुल्क माहिती देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस काही माहिती देऊ केली, तथापि ही माहिती अस्पष्ट असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. त्यामुळे सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नंतर दि.३.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले होते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर असे निष्पन्न झाले आहे की, अपिलार्थीच्या दि. ५.८.२००५ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २१.८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेली माहिती, दि. ३.१०.२००८ रोजी प्राप्त झाली आहे. ही माहिती अपूर्ण असल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर प्रतिपादन केले. अपिलार्थीच्या दि. ५.८.२००५ रोजीच्या

अर्जातील मुद्देनिहाय बाबींवर दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांच्या दि. ५.८.२००५ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्र. 'अ' संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपर्यंत माहिती पुरविलेली नाही. मुद्दा क्र. 'फ' संदर्भात अपिलार्थीस त्यांनी चुकीची माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने श्री. प्रकाश महाजन व श्री. जी.एन.पाटील या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर महाविद्यालयाने सोपविलेल्या कामाच्या/जबाबदारांच्या संदर्भात माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त त्यांच्या जबाबदारीबाबत माहिती दिल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जातील मुद्दा क्र. 'फ' या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्पष्ट माहिती देणे भाग आहे. अपिलार्थीच्या दि. २४.६.२००६ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्र. 'अ' च्या संदर्भात अपिलार्थीने संबंधित महाविद्यालयाच्या कॅशबुकची तपासणी केल्यास त्यांना या माहितीसंदर्भात अपेक्षित माहिती प्राप्त होऊ शकेल. या अर्जातील मुद्दा क्र. 'इ' च्या संदर्भात अपिलार्थीने आयोगासमोर असे स्पष्ट केले की, त्यांना प्राप्त झालेली माहिती अत्यंत अस्पष्ट आहे, यावर जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस पुरविली आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेले ऑडीट रिपोर्ट प्रत्यक्ष तपासणीसाठी त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत, जेणेकरुन अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती या कागदपत्रांवरुन स्वत:साठी उपलब्ध करुन घेऊ शकतील. या अर्जातील मुद्दा क्र. 'ई'संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर चुकीचे आहे, या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अचूक व स्पष्टपणे माहिती पुरवावी लागेल.ही माहिती वर नमूद केलेल्या कालावधीमध्ये त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. या अर्जातील मुद्दा क्र. 'ग' द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना श्रम साधना बॉम्बे ट्रस्टचे सचिव पदावर त्यांची नेमणूक ज्या ठरावाद्वारे किंवा आदेशाप्रमाणे झाली त्या दस्तऐवजाची मागणी केली होती, तथापि त्यांनी अपिलार्थी यांना मा. उच्च न्यायालयाकडे शपथपत्र सादर करण्यासाठी संस्थेने दिलेल्या

अधिकारपत्राची प्रत दिली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असल्याने त्यांना असे सूचित करण्यात येते की, या माहितीसह, वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या संदर्भिय दि.५.८.२००५ व २५.६.२००६ च्या मूळ अर्जातील सर्व उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच त्यांच्या संस्थेचे ऑडीट रिपोर्ट व कॅशबुक अपिलार्थीस तपासणीसाठी त्यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीबाबत निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे माहितीशी संबंधित कागदपत्रे अपिलार्थीस तपासणीसाठी याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कैलास देवराम पाटील,रा.७, ब, भूषण कॉलनी, जळगाव.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालय (श्रम साधना बॉम्बे ट्रस्ट), बांभोरी, पत्र पेटी क्र.१४, ता.धरणगाव जि.जळगाव-४२५ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मॅनेजिंग ट्रस्टी, अभियांत्रिकी महाविद्यालय (श्रम साधना बॉम्बे ट्रस्ट), बांभोरी, पत्र पेटी क्र.१४,ता.धरणगाव जि.जळगाव-४२५ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५९

निर्णय दिनांक २२-०१-२००९

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, अपिलार्थी
रा. मेन रोड, बोदवड, तालुका बोदवड,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १७-०२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी अधीक्षक अभियंता यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्रजिमा १६ अ बाबत माहिती मागितली होती, सदर रस्ता महाराष्ट्राच्या अधिकृत नकाशात दाखविलेला आहे. परंतु प्रत्यक्षात रस्ताच उपलब्ध नसून त्यावर शासनाचे कागदोपत्री लाखो रुपये खर्च झाले आहेत व त्यासंदर्भात कोणतीही चौकशी न करता त्यांनी सदर अर्ज जळगांव येथे वर्ग केला. ज्यांनी

चुका केल्या आहेत ते खरी माहिती कशी देतील तरी आपण चौकशी करुन खरी व अचूक माहिती द्यावी, अशी आयोगास त्यांनी अंतिमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-१०-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८६ ते २००६ पर्यंतच्या कालावधीशी संबंधीत प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १६ बाबत एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या मागणी केलेल्या माहितीमध्ये - *बोदवड गावातून उजनीस जाणा-या रस्त्याचे सर्वोच्च नियंत्रण कोणत्या विभागाकडे आहे त्यांचे नांव, पत्ता, फोन नंबर, फॅक्स नंबर, सदर रस्त्यासाठी शासनाने वरील कालावधीत केव्हा केव्हा किती खर्च केला आहे याची नकाशासह माहिती, ते काम पूर्ण झाले आहे किंवा कसे हे पाहण्याचे कर्तव्य कोणाचे आहे त्याचे पदनाम व पोस्टाचा पत्ता, सदर रस्त्याचा नकाशा लांबी रुंदीसहीत कोठून कसा जातो याची माहिती, तो रस्ता भूमि अभिलेख यांच्याकडील गाव शिवाराच्या नकाशात दाखविल्याप्रमाणे आहे काय, सदर रस्त्याची तो रेकॉर्डप्रमाणे आहे काय याची खरी माहिती, आज रोजी सदर रस्ता वाहतुकीसाठी वास्तविक खुला आहे काय याची माहिती व वाहतुकीसाठी सुरक्षित आहे काय याची माहिती* - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर अर्ज सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांना उद्देशून केला आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी, अपिलार्थीच्या या अर्जास दिनांक १४-११-२००६ रोजी प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्यास्तव त्यांचा अर्ज मूळ स्वरुपात उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग, जळगांव यांच्याकडे पाठविला. सदर पत्र संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिले होते. नंतर परत दिनांक २०-११-२००६ रोजी अपिलार्थीचा अर्ज जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत असल्याचे त्यांना आढळल्याने त्यांनी दिनांक २०-११-२००६ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांचा अर्ज उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, जळगांव यांच्याकडे पाठविण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग,जळगांव यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१२-२००६ रोजी निर्णय घेऊन अपिलाथीचे प्रथम अपील कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, जळगांव यांच्याकडे मूळ स्वरुपात पाठविले. संबंधीत कार्यकारी

अभियंता यांनी सुनावणी घेतल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. यानंतर अपिलार्थीस उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, भुसावळ यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून त्यामध्ये त्यांनी त्यांच्या अपिलात माहिती अर्जाप्रमाणे मुद्देनिहाय माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी हे कागदोपत्री चुकीची पुर्तता करुन टाळाटाळ करत आहेत, शासकीय सार्वजनिक प्रॉपर्टी भाड्याने देता येत नाही. तरी माहिती अर्जाप्रमाणे खरी व वास्तविक माहिती त्यांना प्राप्त होण्यासाठी विनंती केली. या अर्जामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, माहिती अधिका-याने दिलेली माहिती खरी किंवा खोटी कशी ठरविण्यासाठी प्रामाणिक चौकशी केली असता जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे दिसून येईल. त्यांनी पूर्वी यासंदर्भात दिनांक २३-१०-२००७ रोजी तक्रार अर्ज केला होता तो सुध्दा चालून पूर्ण माहिती मिळाली नाही. अंतीमतः त्यांनी अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांची माहिती पडताळणी करुन ती आयोगाने सक्षम अधिका-याकडून तपासणी करुन घेऊन त्यांना द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मते त्यांच्या खाजगी मालमत्तेच्या समोरुन जाणारा रस्ता हाच बोदवड-उजनी प्रजिमा १६ अ असून, यासंदर्भात अपिलार्थीस अनेक वेळा प्रत्यक्षात समजावून सांगितले तरी अपिलार्थी हे मान्य करत नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभिलेखावर १६ अ हा रस्ता पहुर - जामनेर - मुक्ताईनगर या प्रमुख राज्य रस्ता क्रमांक ८ मार्गातील साखळी क्रमांक १५३/६०० पासून सुरु होतो. या रस्त्याचे मूळ बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने केले असून सध्या हा रस्ता देखरेखीसाठी जिल्हा परिषदेकडे आहे. अपिलार्थीस अभिप्रेत असलेला रस्ता व वास्तवात अस्तित्वात असलेला रस्ता यामध्ये अपिलार्थी हे स्वतःच्या कामाकरिता गल्लत करीत आहेत. अपिलार्थीच्या मते बोदवड - उजनी नावाचा रस्ता म्हणजे त्यांच्या खाजगी मालमत्तेसमोरुन जाणारा रस्ता, जो बोदवड ग्रामपंचायतीच्या मालकीचा आहे. या रस्त्यावर अपिलार्थीची मालमत्ता असून, त्यासमोर अतिक्रमणे झाली असून अपिलार्थीस ही अतिक्रमणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन हटवावयाची आहेत ही बाब अपिलार्थीस प्रत्यक्ष समजावून सांगण्यासाठी त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी भेटीकरिता रस्त्यावर

उपस्थित राहण्याचे कळविले असता अपिलार्थी या घटनास्थळावर भेटीस कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद उपविभाग भुसावळ यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २४-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती. उर्वरित माहितीकरिता त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीचा प्रथम माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविणे भाग होते, तथापि त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक २४-१०-२००६ रोजीच्या प्रथम अर्ज अंतीमत: दिनांक २०-११-२००६ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला. त्यांनी दिलेल्या सुचनेवरुन उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, भुसावळ यांनी अपिलार्थीस दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती पुरविली. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जी माहिती अपिलार्थीस दिनांक २८-११-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे आवश्यक होते ती माहिती अपिलार्थीस दिनांक २८-१२-२००६ रोजी म्हणजे ३० दिवसाच्या विलंबाने प्राप्त झाली आहे. हा विलंब प्रामुख्याने सहाय्यक अधीक्षक अभियंता तथा जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कारवाई न केल्यामुळे झाला असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, भुसावळ यांनी दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने संदर्भिय रस्त्यावर झालेल्या खर्चाची माहिती मागितली असता अपिलार्थीस त्यांनी ही माहिती त्यांच्याकडील दिनांक १३-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविली असल्याचे त्यांनी उत्तर दिले आहे. उपविभागीय अभियंता यांची ही कृती चुकीची आहे. मूळात या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या जन माहिती अधिका-याकडे माहितीसाठीचा अर्ज केला आहे व त्यांनी मागणी केलेली माहिती ज्या जन माहिती अधिका-याच्या ताब्यात आहे त्यांच्या सहीने आणि जन माहिती अधिकारी या पदनामाने ही माहिती अपिलार्थीस मिळणे आवश्यक असतांना देखील शासकीय कार्यालयामध्ये सामान्यपणे ज्याप्रमाणे पत्रव्यवहार केला जातो त्याप्रमाणे या प्रकरणी अपिलार्थीस संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील बोदवड - उजनी या रस्त्याची लांबी रुंदीसहीत कसा जातो तसेच तो रस्ता भूमि अभिलेख यांचेकडील

गावशिवाराच्या नकाशात दाखविल्याप्रमाणे आहे काय, यावरील माहिती त्यांना अपिलार्थीने मागितली आहे, या मुद्दयावरील माहितीचा समावेश जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीमध्ये नाही. सबब त्यांनी अपिलार्थीस उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, भुसावळ यांच्यामार्फत पुरविलेली माहिती अपूर्ण ठरत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेली गावशिवाराच्या नकाशातील रस्त्याच्या प्रतीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्यास ती असेल तेथून उपलब्ध करुन त्यांना माहिती देण्याविषयी विनंती केली आहे. या मुद्दयावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात जी माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस देण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये आहे. ती तरतूद माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता दिसून येईल. त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होणार नाही, मात्र अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर या मुद्दयाकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज, भूमि अभिलेख कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसाच्या आत हस्तांतरीत करणे व त्याची प्रत अपिलार्थीस देणे अभिप्रेत होते. तथापि या मुद्दयावर देखील संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कारवाई केलेली नाही. अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल अपिलामध्ये अपिलार्थीने 'अपिलाची' कारणे या मुद्दयाव्दारे काही मुद्दयावर वेगळी माहिती मागविली आहे. अपिलार्थीने आज रोजी आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादावरुन अपिलार्थीस प्रत्यक्षात जागेवर आणून या रस्त्याच्या वस्तुनिष्ठ स्थितीची कल्पना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी दिल्याने अपिलार्थीच्या शंकेचे निरसन होऊ शकेल, असे आयोगास वाटते. बोदवड - उजनी १६ अ हा रस्ता कोणता आहे हे ठरविण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग हे सक्षम प्राधिकरण असल्याने त्यांचे म्हणणे हे ग्राह्य धरणे उचित होईल, असे आयोगाचे मत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे आयोगासमोर गैरहजर आहेत. यासंदर्भात अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रश्नावर त्यांनी अपिलार्थी व सर्व संबंधित, यांची हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत बैठक घेऊन अपिलार्थीस वस्तुस्थिती समजावून सांगावी, जेणेकरुन त्यांच्या सर्व शंकांचे निरसन होईल.

वरील परिच्छेदाच्या तपशिलावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग केला आहे. अपिलार्थीस दिलेली माहिती अपूर्ण आहे. आपल्या

अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब, मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्यक करणारे त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांना देखील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना असेही सूचित करण्यात येते की, त्यांच्याकडे येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर ज्या जन माहिती अधिका-याच्या ताब्यात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती असेल त्यांच्या सहीने अर्जदारास ती माहिती पुरविली जाईल असे पहावे. माहितीच्या खाली सही करतांना त्यांनी आपले जन माहिती अधिकारी असे पदनाम स्पष्ट नमूद करावे. तसेच जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, जळगांव यांना अपिलार्थीने या प्रकरणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील बोदवड - उजनी या रस्त्यासंदर्भातील माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस पुरवावी, असे सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केल्याचे स्पष्ट होत आहे. आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा. मेन रोड, बोदवड, तालुका बोदवड, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२६०

निर्णय दिनांक २२-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल,<br>रा. मेन रोड, बोदवड, तालुका बोदवड,<br>जिल्हा जळगांव | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक अभियंता श्रेणी - १,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मलकापूर,<br>जिल्हा बुलढाणा | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव,<br>जिल्हा बुलढाणा | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मलकापूर, जिल्हा बुलढाणा

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १७-०२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अर्जात माहिती दिल्याप्रमाणे सदरचा रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित नसून साधी सायकल सुध्दा प्रस्तावित रस्त्यावरुन चालविणे शक्य नाही. रस्त्यावर कोणतेही काम सुरु नाही (गड्डे भरण्याचे) व पूर्ण झालेला रस्ता (काम केलेला रस्ता) व्यवस्थितरित्या झालेला नाही. तरी माहिती अर्जाप्रमाणे खरी, अचूक व पूर्ण माहिती द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०९-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बोदवड - मलकापूर या रस्त्याची सन २००० ते २००६ या कालावधीशी संबंधीत एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर अर्ज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा यांच्याकडे केला होता. अपिलार्थीने बोदवड - मलकापूर रस्त्याच्या ज्या भागाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती तो भाग सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मलकापूर यांच्या कार्यक्षेत्रात असल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मलकापूर यांच्याकडे पाठविला तो त्यांना दिनांक २७-०९-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मलकापूर यांनी त्यांच्या दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने हा अपील अर्ज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांना उद्देशून केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांनी दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे योग्य तो खुलासा अपिलार्थीस केला. तथापि सदर खुलासा समाधानकारक न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्याकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली असून आज रोजी अपिलार्थीने रस्त्याच्या ज्या लांबीसंदर्भात माहिती मागितली आहे ती लांबी सुस्थितीत आहे. अपिलार्थीपासून हेतुपुरःस्सर माहिती दडविण्याचा त्यांनी कोणताही प्रयत्न केला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचे आयोगाकडील व्दितीय अपील अर्जामध्ये केलेले म्हणणे लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः हा अर्ज बोदवड

- मलकापूर या रस्त्याची कथित खराब स्थिती असतांना केला असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली आहे. यापैकी अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २ मध्ये, "सदर रस्त्याचे साईडपट्टी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पूर्ण सुरक्षित आहे काय" अशी माहिती मागविली आहे. येथे असे नमूद करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशा प्रकारचा खुलासा अथवा स्पष्टीकरण मागणे देय नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्थितीत माहिती उपलब्ध आहे त्या स्थितीत त्यांनी ती अर्जदारास पुरवावयाची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाच्या स्पष्ट केलेल्या व्याख्येचे अवलोकन करता ही बाब स्पष्ट होते. त्यामुळे अपिलार्थीस मूळात त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील फक्त अंशतः माहिती देय आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये देखील अपिलार्थीने सदर रस्त्याची वास्तविक स्थिती काय आहे व सदर रस्ता पूर्ण सुरक्षित आहे काय, अशा प्रकारची जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा व त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. ती वर म्हटल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असणार नाही त्यामुळे मुद्दा क्रमांक ३ शी संबंधीत माहिती देखील त्यांना अंशतः देय होते.

"माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या प्रथम अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या पत्राने पाठविली आहे. तसेच यासंदर्भातील रस्त्याच्या स्थितीबाबत कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक तो खुलासाही केला आहे हे पाहता, अपिलार्थीच्या राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर निर्णय देण्यासाठी कोणताही मुद्दा शिल्लक न राहिल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात या प्रकरणात असे आढळून आले आहे की, कार्यकारी अभियंता यांनी, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत असतांना त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांचे अखत्यारीतील मलकापूर उपविभागाकडे पाठविला व संबंधीत उप अभियंत्यास अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित करुन त्याची एक प्रत अपिलार्थीस पाठविली. संबंधीत उप अभियंता यांची सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्येक अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्या सहीने, त्यांच्या पदनामाचा स्पष्ट उल्लेख करुन माहिती देणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांची अपिलार्थीस सहाय्यक जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत माहिती

देण्याची ही कृती चुकीची असून इतःपर अशा प्रकारच्या चूका त्यांनी टाळाव्यात व अर्जदारास माहिती देतांना सहीखाली आपल्या पदनामाचा उल्लेख करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने रस्त्याच्या तत्कालीन स्थितीबाबतचे त्यांचे अभिप्राय आयोगास केलेल्या व्दितीय अपिलात विषद केले आहेत. अशा प्रकरणामध्ये अपिलार्थीच्या तक्रारीचा निपटारा करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग हे सक्षम प्राधिकरण आहे व राज्य माहिती आयोगाला कोणत्याही प्रकारचे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना खड्डे भरण्यासाठी अथवा तत्सम सूचना देण्याची अधिकारिता नाही हे अपिलार्थीच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०१-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा. मेन रोड, बोदवड, तालुका बोदवड, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव, जिल्हा बुलढाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२६१

निर्णय दिनांक २२-०१-२००९

१ श्री. जाधव सुधाकर पुंडलीक, अपिलार्थी
"श्री" निवास, गोसावीनगर, कॅनल रोड,
नाशिक रोड, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कुलसचिव,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कुलसचिव,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०५-०८-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये अपिलार्थीने सदर अपील अर्ज राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात १०-११-२००६ या दिनांकान्वये फेरसादर केल्याचे दिसून येत आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करणे भाग पडले. तसेच आरोग्य विज्ञान विद्यापीठाने त्यांच्या दिनांक २९ एप्रिल २००६ रोजीच्या पत्रावर टाकलेली तारीख

चुकीची आहे, कारण त्यांना ही माहिती उशिराने प्राप्त झाली. तसेच त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये विद्यापिठाने वापरलेली भाषा खडबडीत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दिनांक १२-०४-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत सन २००० ते दिनांक १२-०४-२००६ या कालावधीशी संबंधीत काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५६ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन वेळा मनीऑर्डर करुन भरले आहे. पहिली मनीऑर्डर रुपये २५ इतकी त्यांनी दिनांक ०६-०५-२००६ रोजी केल्याचे दिसून येते तर रुपये ३१ ची दुसरी मनीऑर्डर त्यांनी दिनांक २३-०५-२००६ रोजी केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०७-०६-२००६ रोजी स्पीड पोस्टाव्दारे पाठविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या या अपील अर्जावर त्यांनी वीस रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प चिकटविले नसल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नाही (फक्त दहा रुपयाचे स्टॅम्प चिकटविले आहे). जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या अपील अर्जावर सुनावणी घेतली नसल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतील सहा मुद्दयापैकी पाच मुद्दयावरील माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे मत अपेक्षित करणारी असल्याची दिसून येते. या पाचपैकी एका मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती ही माहितीचा विषय होऊ शकत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येवरुन असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देतांना जन

माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत त्यांनी ती अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे. या प्रक्रियेमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना प्रश्नार्थक स्वरुपात त्यांचा खुलासा, स्पष्टीकरण अथवा अभिप्राय मागण्याची तरतूद यामध्ये नाही. एवढे असूनही अपिलार्थीच्या या प्रश्नाच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०६-२००६ रोजी सशुल्क माहिती पुरविली आहे. या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस त्यांच्या अर्जाप्रमाणे आवश्यक ती सुसंगत माहिती मिळाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अर्जाबरोबर दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या झ ोरॉक्स प्रतीवर दिनांक ०२-०६-२००६ अशी तारीख दर्शविली असून या अपील अर्जावर वीस रुपये इतक्या कोर्ट फीसचे स्टॅम्प चिकटविल्याचे दिसून येत आहे. मात्र त्यांनी जन अपिलीय अधिकारी याच्याकडे केलेल्या मूळ प्रथम अपील अर्जावर दिनांक १५-०६-२००६ अशा तारखेचा उल्लेख असून या अर्जावर फक्त दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प चिकटविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने आवश्यक त्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प प्रथम अपिलावर न चिकटविल्याचे आढळून आल्याने त्यांच्या अपील अर्जाचा विचार न करण्याची जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. मूळात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे चुकीची कागदपत्रे दाखल करुन आयोगाची देखील दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असे येथे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे त्यांना माहितीपोटी लावलेल्या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून दिलेल्या दिनांक २९-०४-२००६ रोजीच्या पत्रामध्ये कळविला होता. त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी ६ रुपये स्टेशनरी + ५० रुपये स्पीड पोस्ट किंवा स्वहस्ते माहिती मागविल्यास ६ रुपये स्टेशनरी + २५ रुपये स्पीड पोस्ट असे ३१ रुपये भरण्याची अपिलार्थीस सूचना केली. अपिलार्थीस स्वहस्ते माहिती देता असतांना त्यामध्ये स्पीड पोस्टाचे शुल्क लावण्याची जन माहिती अधिकारी यांना कोणतीही गरज नव्हती, तथापि व्यक्तिशः माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पोस्टाचा खर्च लावल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी ५६ रुपये शुल्कापोटी त्यांच्याकडे प्राप्त झाल्याचे मान्य केले व तसेच अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती एकूण ३ पृष्ठांची असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरवितांना ५० रुपये इतके शुल्क जादा आकारले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असतांना अपिलार्थीस पोस्टाचा खर्च कळविण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांना माहिती

देण्यापोटी स्वीकृत केलेले ५० रुपये इतके जादा शुल्क त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देय नसतांना देखील त्यांच्या प्रश्नांना जन माहिती अधिकारी यांनी सुसंगत अशी उत्तरे देऊन माहिती दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता कोणतेही आदेश नाहीत. तसेच ही भाषा अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे खडबडीत नसल्याचे आयोगास आढळले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना माहिती देण्यापोटी आकारलेले शुल्क रुपये ५० इतके त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जाधव सुधाकर पुंडलीक, "श्री" निवास, गोसावीनगर, कॅनल रोड, नाशिक रोड, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, दिंडोरी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, दिंडोरी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२६२

निर्णय दिनांक २२-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. सुशीलाबाई वसंतराव पाटील,<br>मु. पो. पाटण, तालुका शिंदखेडा,<br>जिल्हा धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, शिंदखेडा, जिल्हा धुळे | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल),<br>शिरपूर, जिल्हा धुळे | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : कोषागार अव्वल कारकून, तहसील कार्यालय, शिंदखेडा, जिल्हा धुळे |
| | जन अपिलीय अधिकारी | : तहसीलदार, शिंदखेडा, जिल्हा धुळे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व उपविभागीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २२-०३-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०२-११-२००६ रोजीच्या पत्राने व्यथित होऊन केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे पाटण तालुका शिंदखेडा येथील हक्कपत्रक नोंद क्रमांक १९८६, दिनांक ०९-१२-१९६०, हक्कपत्रक नोंद क्रमांक ३७८, दिनांक २१-०७-१९७६ या नोटीशीच्या प्रती, कबुलायतीच्या नकला जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितल्या होत्या. अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००६ रोजी प्रत्यक्ष प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन फेर नोंद नंबर १९८६ ची कबुलायत तुर्त आढळ होत नाही व फेर नोंद नंबर ३७८ ची वर्दी कालबाह्य झाली असल्याने अपिलार्थीस माहिती पुरविता येत नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांच्याकडे केल्याचे दिसून येते. या प्रकरणाशी संबंधीत जन अपिलीय अधिकारी तहसीलदार, शिंदखेडा हे आहेत. त्यांच्याकडे उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांच्याकडून सदर अपील प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने तहसील कार्यालयातील संबंधीत कर्मचारी त्यांना सन्मानाने वागणूक देत नसल्याची त्यांनी आयोगाकडे तक्रार केली. आपले लेखी निवेदन आयोगास सादर केले. या निवेदनामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घेण्याचे काम संबंधीत कार्यालयात चालू आहे. शोध घेऊन सदरचे कागदपत्र उपलब्ध करुन देण्याचे संबंधीत कार्यालयाने कबूल केल्यामुळे त्यांचे अपील तुर्त निकाली काढण्यात यावे.

तहसीलदार शिंदखेडा यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील हक्कपत्रक नोंद क्रमांक १९८६ व ३७८ च्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०१-२००९ रोजी दिल्या आहेत व या हक्क नोंदपत्राची कबुलायतीची नकला अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत शोधून देण्याचे व शोधून न सापडल्यास त्या नव्याने तयार करुन देण्याचे कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी निम्मी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०१-२००९ रोजी पुरविली आहे

व कबुलायत प्रत अपिलार्थीस तहसीलदार, शिंदखेडा यांनी अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत शोधून देण्याचे व शोधून न सापडल्यास त्या नव्याने तयार करुन देण्याचे कबूल केले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन शेवटच्या परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे जेष्ठ नागरिक असून त्यांनी राज्य माहिती आयोगाला असे अवगत करुन दिले की, त्यांनी ४० वर्षे ग्रामसेवक या पदावर नोकरी केली आहे. सध्या ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झ ाले आहेत. अभ्यागतांना तहसील कार्यालयातील कर्मचा-यांकडून देण्यात येणा-या वागणुकीबाबत तहसीलदार, शिंदखेडा यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचा-यांना अभ्यागताशी नम्रतेने वागण्याच्या सूचना द्याव्यात, जेणेकरुन अशा प्रकारच्या तक्रारींना वाव राहणार नाही.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. सुशीलाबाई वसंतराव पाटील, मु. पो. पाटण, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा कोषागार अव्वल कारकून, तहसील कार्यालय, शिंदखेडा, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, शिंदखेडा, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपविभागीय अधिकारी, शिरपूर, विभाग, शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२६३

निर्णय दिनांक २२-०१-२००९

१ श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर, अपिलार्थी

"शांताई", रामनगर, पिंपळनेर, तालुका साक्री,

जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय

(महसूल शाखा), धुळे, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा निवासी उपजिल्हाधिकारी,

जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे, जिल्हा धुळे

त्रयस्थ पक्ष : श्री. शेख हुसेन

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १२-०१-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही कारवाई न केल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे दिनांक ०४-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्यामुळे व्यथित होऊन त्यांनी हे विचाराधीन व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १४-११-२००६ रोजी प्राप्त झालेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता सर्व कागदपत्रे दिनांक ०३-११-२००६ रोजीची असल्याचे स्पष्ट झाले असून माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील मागितलेली माहिती द्यावयाची असून ही माहिती उपलब्ध नसेल तर तयार करुन पुरविण्याची प्रक्रिया यामध्ये अंतर्भूत नाही. त्यांनी मागितलेली माहिती दिनांक २०-०८-२००१ ते २५-०९-२००६ या कालावधीशी संबंधीत असतांना त्यांना ती माहिती देण्यात आली नाही. मात्र, त्यांना देण्यात आलेली माहिती दिनांक ०३-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून तयार करण्यात आल्याचे त्यांना आढळून आले म्हणजेच ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागणी केलेल्या कालावधीशी संबंधीत नाही. तसेच ही माहिती खोटी व लबाडीची असल्याचे त्यांना आढळून आले असून पंचनामा, अतिक्रमणाची मोजमापे ही देखील प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन त्यांनी केली नसून ती कार्यालयात बसून टेबलवर्क केले आहे. या सर्व बाबी पाहता, त्यांनी आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्यात यावी अशी मागणी केली आहे. तसेच अंतिमत: जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सरकारी बखळ जागेवरील अतिक्रमणासंदर्भात दिनांक २०-०३-२००० ते २५-०९-२००६ या कालावधीशी संबंधीत - "अपिलार्थीने दिनांक ०२ जुलै २००१ रोजी जिल्हाधिकारी, धुळे यांना केलेल्या अर्जासंदर्भात त्यांनी उपविभागीय अधिकारी, धुळे यांना व तहसीलदार, धुळे यांना दिनांक २०-०८-२००१ रोजी दिलेल्या सुचनेवर केलेली कारवाई, संबंधीतांचा अहवाल, त्यांनी घेतलले जाबजबाब, पंचनामे वगैरे कागदपत्रासह व त्यावर जिल्हाधिकारी, धुळे यांनी केलेल्या कारवाईसंदर्भातील कागदपत्रांच्या नकला" या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तहसीलदार साक्री यांच्याशी संबंधीत असल्याने अपिलार्थीने तहसीलदार साक्री यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००६ रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दोन टप्प्यात, प्रथमतः दिनांक १९-०१-२००७ व तद्नंतर दिनांक ०६-०२-२००७ रोजी पुरविल्याचे दिसून येते. तथापि तत्पूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या कालावधीशी संबंधीत नाही. दिनांक १९-०१-२००७ व दिनांक ०६-०२-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती मिळाली. ही माहिती त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केल्यानंतर त्यांना नव्याने करुन देण्यात आलेली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-११-२००६ रोजीच्या अपिलावर ४५ दिवसाच्या आत निर्णय घेतला नाही, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीसाठी बोलाविले नाही व त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीचे आदेश त्यांना प्राप्त झाले नाहीत. खुद्द जिल्हाधिका-यांनी आदेश देऊनही त्या आदेशावर सहा वर्षे कारवाई न झाल्याने जिल्हाधिका-याचे आदेश न पाळणा-या संबधितांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे कारवाई होणे गरजेचे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५-०९-२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती दिनांक १९-०१-२००७ व ०६-०२-२००७ रोजी पुरविण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांच्या दिनांक २०-०८-२००१ रोजीच्या आदेशावर उपविभागीय अधिकारी धुळे यांनी, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे करेपर्यंत, कोणतीही कारवाई केली नव्हती. अपिलार्थीच्या अर्जावर कारवाई करण्यासंदर्भात त्यांनी उपविभागीय अधिकारी, धुळे यांना जिल्हाधिकारी यांनी दिनांक २४-०९-२००१ ते २९-०७-२००५ या कालावधीमध्ये एकूण ९ स्मरणपत्रे दिली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक १९-०१-२००७ व दिनांक ०६-०२-२००७ रोजी पूर्णतः विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००७ व ०६-

०२-२००७ रोजी पुरविली आहे. या प्रकरणी असे आढळून येते की, जिल्हाधिकारी यांनी अपिलार्थीच्या ०२ जुलै २००१ रोजीच्या अर्जावर दिनांक २०-०८-२००१ रोजी उपविभागीय अधिकारी धुळे व तहसीलदार, धुळे यांना दिलेल्या सुचनेवर त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अर्ज करेपर्यंत म्हणजेच दिनांक २५-०९-२००६ रोजीपर्यंत जिल्हाधिकारी, धुळे यांनी उपविभागीय अधिकारी, धुळे यांना दिनांक २०-०८-२००१ रोजी दिलेल्या सुचनांच्या अनुपालनासंदर्भात संबंधितांनी कोणतीही कारवाई केली नव्हती, हे सप्रमाण सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या आजच्या युक्तिवादावरुन उपविभागीय अधिकारी, धुळे यांनी उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिका-यांच्या सुचनांच्या अनुपालनाविरुध्द लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याची त्यांनी आयोगाकडून अपेक्षा केली आहे, तथापि अशा प्रकारची प्रशासकीय कारवाई करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने या मुद्दयासंदर्भात आयोगाचे कोणतेही भाष्य नाही, मात्र या प्रकरणी महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी लक्ष घालून जिल्हाधिकारी, धुळे यांच्या सुचनांच्या अनुपालनासंदर्भात उपविभागीय अधिकारी, धुळे यांनी लावलेल्या विलंबाची कारणे शोधून काढून त्यांना आवश्यक वाटल्यास संबधितांवर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याबाबत त्यांनी विचार करावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांचा आयोगाकडे दुसरा आक्षेप असा नोंदविला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती तयार करुन पुरविली आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये माहिती तयार करुन ती अर्जदारास देणे अपेक्षित नाही. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, मूळात अपिलार्थीची मागणी ज्या कालावधीशी संबंधित आहे त्या कालावधीमध्ये जिल्हाधिकारी, धुळे यांच्या दिनांक २०-०८-२००१ रोजीच्या पत्रावर कोणतीही कारवाई संबधितांकडून केली गेली नव्हती. त्यामुळे या कालावधीतील माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात उपलब्धच होऊ शकत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जिल्हाधिकारी, धुळे यांच्या दिनांक २०-०८-२००१ रोजीच्या पत्रावर उपविभागीय अधिकारी, धुळे यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचे उत्तर अपिलार्थीस देणे योग्य ठरले असते. परंतु त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२००१ रोजीच्या पत्रातील आशय लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांच्या सुचनांचे अनुपालन तदनंतर करुन घेतले व त्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती पुरविली आहे, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचा दोष असल्याचे अथवा त्यांनी अपिलार्थी यांच्यापासून हेतुतः माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी विलंबाने अपील सुनावणीस ठेवले, सुनावणीची नोटीस त्यांना प्राप्त झाली नाही, निर्णयाची प्रत प्राप्त झाली नाही, असे आज आयोगास सांगितले, तथापि यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी

जिल्हाधिकारी, धुळे यांच्या दिनांक ३०-१२-२००६ च्या (६ च्या ऐवजी चुकीने ३ हा आकडा टंकलिखित झ ााल्याचे दिसून येते) च्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांच्या निर्णयाची प्रत पूर्वीच पाठविल्याचे नमूद केले आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांनी निर्णयाची प्रत पाठविली आहे असे अनुमान काढण्यास हरकत नाही. जन अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द कारवाई आदेशित करण्याची अपिलार्थीने केलेली विनंती, जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०१-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर, "शांताई", रामनगर, पिंपळनेर, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल शाखा), धुळे, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २२६४/०७ व २२६५/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२६४ व २२६५

निर्णय दिनांक २२-०१-२००९

१ श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर, अपिलार्थी
"शांताई", रामनगर, पिंपळनेर, तालुका साक्री,
जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ अपील क्रमांक २२६४/०७
जन माहिती अधिकारी
तथा मंडळ निरीक्षक (महसूल), पिंपळनेर मंडळ, पिंपळनेर,
तालुका साक्री, जिल्हा धुळे

२ अपील क्रमांक २२६५/०७
जन माहिती अधिकारी
तथा निवासी नायब तहसीलदार, साक्री,
जिल्हा धुळे

३ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, साक्री, जिल्हा धुळे

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २२-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस दोनही प्रकरणाशी संबधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दिनांक १२-०१-२००७ रोजी नोंदविलेली व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून (एकाच माहितीकरिता संदर्भिय दोन व्दितीय अपीले दाखल केली आहेत) अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०९-२००६ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले सादर करुनही त्यांना आजातागायत तहसीलदार, साक्री यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आपले कर्तव्य पार पाडण्यात कसूर केला व त्याचा परिणाम म्हणजे ते माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले. त्यामुळे सर्व संबंधितांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी या अपील अर्जांमध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०८-२००७ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाव्दारे मंडळ अधिकारी, साक्री व नायब तहसीलदार, साक्री यांच्याकडे एकाच माहितीसाठी दोन वेगवेगळे अर्ज केले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी तहसीलदार, साक्री यांच्याकडे दिनांक २७-०९-२००६ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, साक्री यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. या टप्प्यावर आयोगास, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होणे गरजेचे वाटते. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांना, असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस तहसीलदार, साक्री यांचे आदेश मान्य न झाल्यास ते अधिनियामातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, प्रथम अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमाक २२६४/०७ व क्रमांक २२६५/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपिल अर्जांवर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर, "शांताई", रामनगर, पिंपळनेर, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ निरीक्षक (महसूल), पिंपळनेर मंडळ, पिंपळनेर, तालुका साक्री, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, साक्री, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, साक्री, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७९

निर्णय दिनांक २२-०१-२००९

१ श्री. विठ्ठल बुधो तायडे, अपिलार्थी
८/४०२ अमृतधाम, योगीधाम जवळ,
मुरबाड रोड,
कल्याण (पश्चिम) - ४२१ ३०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, भुसावळ, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जानुसार सुनावणी घेतली नाही, माहिती देण्यास टाळाटाळ केली, चुकीची व अपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते २००७ या कालावधीशी संबंधीत १५ टक्के पंचायत समिती मागासवर्गीय निधी व केंद्रीय दलित वस्ती सुधार योजना निधीबाबत या विषयावर एकूण सात मुद्यांव्दारे माहिती विचारली होती. अपिलार्थीचा दिनांक २५-०९-२००६ रोजीचा अर्ज हा जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक २९-०९-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती वेगवेगळ्या विभागाकडून प्राप्त करुन संकलीत करावयाची असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आणले व तद्नंतर दिनांक ०४-११-२००६ रोजी अपिलार्थीस माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये ४९ इतके शुल्काच्या हिशोबासह अपिलार्थीस रोखीने भरण्याचे कळविले व तद्नंतर अंतीमतः अपिलार्थीस द्यावयाच्या पृष्ठांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याने अपिलार्थीस दिनांक १६-११-२००६ रोजी ही माहिती व्यक्तिशः व सशुल्क उपलब्ध करुन दिली आहे. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०३-२००७ रोजी निर्णय दिला. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस परिपूर्ण व स्वच्छ (वाचता) येईल अशी प्रत उपलब्ध करुन द्यावी व त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांना याविषयी सक्त ताकीद देण्याचे आदेश दिले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आयोगाची सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीची सदर विनंती अमान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी टाळाटाळ केली नसून अपिलार्थीने शुल्क जमा केल्याबरोबर अपिलार्थीस दिनांक १६-११-२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती चुकीची व बरोबर असून याबाबत त्यांनी त्यांच्या कार्यालयाची उपलब्ध कागदपत्रांची नस्ती आयोगासमोर सादर केली आहे. याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीवर, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या झालेल्या ऑडिट तपासणीची कागदपत्रे देखील आयोगास सादर केली आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सात मुद्दयांव्दारे माहिती विचारली आहे. त्यापैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १, २, ३, ५ व ७ शी संबंधीत माहिती दिली आहे. मुद्दा क्रमांक ४ व्दारे त्यांनी विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असून, या माहितीचे स्वरुप निश्चित किंवा कायम स्वरुपाचे नाही. अपिलार्थीने या मुद्दयावर "सामुदायिक विकासाची वा वैयक्तीक लाभाची कार्ययोजना राबवितांना १५ टक्के पंचायत समिती मागासवर्गीय निधीतून अग्रक्रम दिला आहे का" अशा प्रकारची विचारणा जन माहिती अधिकारी यांना केली आहे. या प्रश्नांस जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थितीदर्शक उत्तर दिले आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे त्यांना अपेक्षित असलेल्या परिपत्रकाचा अथवा मार्गदर्शक तत्त्वे, शासनाचे धोरण यासंदर्भात परिपत्रकाची अथवा कोणताही संदर्भ किंवा यादी दिलेली नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व माहिती इतर स्त्रोताकडून घेऊन उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती आयोगासमोर सादर केली त्यावेळी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अर्जातील सर्व मुद्दयांना उद्देशून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थीस चुकीची अथवा अपूर्ण वाटण्याचे निश्चित कारण अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे समजणे शक्य नाही. अपिलार्थीस आज रोजी सुनावणीस हजर राहण्यासाठीचे पत्र राज्य माहिती आयोगाने दिनांक २०-१२-२००८ रोजी म्हणजे एक महिन्यापूर्वीच अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले होते. सदर पत्र जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २४-१२-२००८ रोजी प्राप्त झालेले आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे अथवा माहिती दडविल्याचे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या घटनाक्रमाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर खालील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे सकारात्मक प्रतिसाद दिल्याने निःसंशयपणे सिध्द होत नाही. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कारवाई न करता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्त्रोतांकडे उपलब्ध आहे त्यांच्याकडून ती प्राप्त करुन घेण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले आहेत. मात्र अपिलार्थीस त्यांना आवश्यक

असलेली माहिती अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने प्राप्त झाल्याने तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रथमतः दिनांक ०४-११-२००६ रोजी म्हणजे अधिनियमातील सशुल्क माहिती देण्याची विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर कळविले असल्याने, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये ३६ हे त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती एका विशिष्ट प्रपत्रात मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या प्रपत्रात देण्यासाठीचे बंधन त्यांच्यावर नाही. तरीही जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस त्यांनी तयार करुन दिलेल्या प्रपत्रात दिलेली आहे. तसेच त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ही लिखित स्वरुपातील होती, ही माहिती अपिलार्थीने टंकलिखित करुन मागितल्यानंतर त्यांनी ती अपिलार्थीस टंकलिखित करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे त्यांच्या या विधानाचा पुरावा दाखल केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे अथवा ती अपिलार्थीपासून दडविल्याचे सिध्द होत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विठ्ठल बुधो तायडे, ८/४०२ अमृतधाम, योगीधाम जवळ, मुरबाड रोड, कल्याण (पश्चिम) -

४२१ ३०१.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुसावळ, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८४

निर्णय दिनांक २२-०१-२००९

१ श्री. गफ्फारखा कलंदरखा, अपिलार्थी

इस्लामपुरा, सुर्यवंशी बिल्डींगचे मागे, अमळनेर, तालुका

अमळनेर, जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,

अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमि अभिलेख,

जळगांव

त्रयस्थ पक्ष : श्री. अजीमोद्दीन महंमद हनिफ,

अ. मजिद म. हनिफ

अब्दुल रशिद म. हनिफ

अमिरोद्दीन महंमद हनिफ

जब्बारखा कलंदरखा

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दिनांक ११-१०-२००६ रोजी नोंदविलेले व

औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००६ रोजी दिलेले उत्तर चुकीचे आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीचे उत्तर प्राप्त झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निणय सदोष आहे कारण जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशासाठी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने निर्णय दिला आहे. त्या निर्णयामध्ये निर्णयाचा दिनांक घातला नाही. कसूर करणा-या अधिका-यांवर शास्ती लादली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सदोष आदेश देऊनही त्यांना ४५ दिवस पूर्ण होऊनही अपिलाच्या निकालाची नक्कल प्राप्त झाली नाही. अशा प्रकारच्या निर्देशाबरोबर अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती एकूण चार मुद्दयांव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सदरचा एस. आर. (अ.नं.) दुय्यम निबंधक अमळनेर यांच्याकडून आपणास प्राप्त झाला किंवा कसे आणि आपल्या कार्यालयास तो प्राप्त झाला असेल तर कधी प्राप्त झाला, दुय्यम निबंधक यांच्याकडून एस. आर. प्राप्त झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी किती दिवसात करावयाची याबद्दल अस्तित्वात असलेले नियम, अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे योग्य कारवाई करुन किती दिवसात त्याचे उत्तर द्यावयाचे याबाबत अस्तित्वात असलेले नियम व अर्जदारास त्यांच्या अर्जाच्या अनुक्रमाप्रमाणे उत्तर देतात किंवा कसे याबाबत नियम - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक १५-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या चार मुद्दयांपैकी तीन मुद्दयांवर अपिलार्थीस माहिती दिली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दिनांक १७-०८-२००६ रोजी आदेश पारित केले. या आदेशामध्ये अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून त्यांनी, या प्रकरणी जबाबदार असलेल्या कर्मचा-यांची नावे त्यांच्या कार्यालयाकडे कळविण्याचे तालुका

निरीक्षक भूमि अभिलेख यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांनी त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ आयोगाकडे त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचे, खरेदीखताचे एस. आर. आढळून येत नसल्याचे सांगणे, अधीक्षक भूमि अभिलेख, जळगांव यांनी मान्य करुन घेणे चुकीचे होते. तसेच तालुका निरीक्षक भूमि अभिलेख अमळनेर यांनी सर्वे नंबर ३३ मध्ये पोट हिस्सा मोजणी झाला असतांना पोट हिस्सा मोजणी झालेलीच नसल्याचे सांगितले. त्यांनी या युक्तिवादामध्ये, राज्य माहिती आयोगाने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या संबंधात दिनांक ११-०२-२००८ व दिनांक १९-०६-२००८ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे संबंधितांकडून कोणतीही कारवाई झाली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे असलेल्या दस्तऐवजा संदर्भातील काम आता झाले आहे. त्यांचा आक्षेप जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथमतः खोटी माहिती पुरविली त्याबद्दल त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही शिक्षा केली नाही हा होता.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १५-०५-२००६ रोजीच्या पत्राप्रमाणे आवश्यक ती माहिती दिली असून या माहितीतील काही माहिती खोटी आढळल्याने संबंधीत कर्मचा-यांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे कारवाई करण्याचे काम प्रगतीपथावर होते. या प्रकरणाशी संबंधीत श्री. पी. आर. चव्हाण, कनिष्ठ लिपीक व श्री. व्ही. बी. जाधव, पर्यवेक्षक भूमापक, यांना कारणे दाखवा नोटीस त्यांच्या कार्यालयाकडील दिनांक १६-०१-२००९ च्या पत्राव्दारे पाठविली गेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०५-२००६ रोजीच्या पत्राप्रमाणे अपिलार्थीस सदरचा एस. आर. अमळनेर यांच्याकडून इकडील कार्यालयास प्राप्त झालेला दिसून येत नाही, अशी माहिती अपिलार्थीस पहिल्या मुद्दयासंदर्भात दिली आहे. वास्तवात सदरचा अर्ज तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयात प्राप्त झ ाला होता. अपिलार्थीस खोटी माहिती दिल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपिलामध्ये सिध्द झाले आहे. अपिलार्थीचा अनुक्रम ३९३० दिनांक २२-११-२००५ हा अनुक्रमांक भूमापन अमळनेर

कार्यालयाकडे दिनांक १४-१२-२००५ रोजी प्राप्त झाला असतांनाही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे त्यांचा अर्ज प्राप्त झाला नसल्याचे कळविले असल्याचे दिसून येते. यावरुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खोटी माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे असे आयोगाचे मत आहे. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस खोटी माहिती पूरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने सचिव (महसूल) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासंदर्भात अपिलार्थीच्या मूळ माहितीतील मुद्दा क्रमांक ४ - "अर्जदारास त्यांच्या अर्जाप्रमाणे त्यांच्या अर्जाच्या अनुक्रमाप्रमाणे उत्तर देतात किंवा कसे त्याबद्दल काही नियम असतील", ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थीस अधिनियमानुसार देय आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये जन अपिलीय अधिकारी यांचा अपील निर्णय सदोष असल्याचे म्हटले आहे. निर्णय सदोष असल्याचे कारण त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने घेतला, कसूर करणा-या अधिका-यांवर शास्ती लावली नाही, असे दिले आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीनुसार ४५ दिवसापेक्षा जास्त विलंबाने निर्णय घेतल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे कोणतेही अधिकार नाहीत. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याबाबत कोणतेही भाष्य केलेले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ अपिलाचा निर्णय उशिराने दिला म्हणून हा निर्णय सदोष असल्याचे सिध्द होऊ शकत नाही. मात्र हा आदेश अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहीत केलेल्या मुदतीमध्ये न देऊन या कलमाचा भंग केला असल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यकक्षेच्या अखत्यारिमध्ये हा निर्णय दिला असून तो निर्णय त्यांनी अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने दिला असल्याने इत:पर अशा प्रकारचे निर्णय देण्यासाठी अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीपेक्षा विलंब लागणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गफ्फारखा कलंदरखा, इस्लामपुरा, सुर्यवंशी बिल्डींगचे मागे, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२६६
निर्णय दिनांक २३-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जयरामपंत नामदेवराव लगड,<br>रा.नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),<br>यांचे कार्यालय,नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),<br>नाशिक. | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः सहायक पोलीस आयुक्त,वाहतुक विभाग, नाशिक

त्रयस्थ पक्षः १. श्री. ए. बी. घुगे,सहा.पोलीस उपनिरीक्षक.
२. श्री. एन.बी. जाधव,पोलीस हवालदार.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १६.४.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयास दि. २३.०४.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ६० दिवसांच्या विलंबाने अपूर्ण, असत्य व दिशाभूल करणारी माहिती दिली. त्यामुळे त्यांनी सदर अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने दि. १०.११.२००६ रोजीच्या त्यांच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नाशिक शहरामध्ये दि.२८.६.२००६ रोजी १६.४५ वा.मुंबई नाक्याजवळ झालेल्या मोटार अपघातासंदर्भात व रु. १६,१६०/- ची नुकसान भरपाई मिळण्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "दि. २८.६.२००६ रोजी मोटार अपघाताबाबतचा सत्य पंचनामा, एफ.आय.आर व इतर माहितीचे दस्तऐवज द्यावे, अर्जाप्रमाणे १ ते ९ बाबतची नुकसान भरपाईसह खुलासा केव्हा मिळेल, श्री. घुगे व जाधव यांच्यावर काय कारवाई केली ? नसेल तर का ? नाही, दि. २८.६.२००६ रोजीच्या अपघाताबाबत मा.श्री.रॉय सा‍ो नी दि. ६.७.२००६ रोजी अन्याय होऊ देणार नाही असे मला व शिष्टमंडळ ग्राहक पंचायत, इंदिरानगर, नाशिक यांना आश्वासन दिले आहे, पूर्ण करावे." - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त विभाग-१, नाशिक शहर यांनी त्यांच्याकडील दि.८.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१४/- इतके मनिऑर्डरने पाठविण्याचे अथवा शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने याच दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्काचा भरणा केल्यानंतर त्या पत्रावर, "क्र. ६५११२२९ दि. ८.१.२००७ रोजी माहिती मिळाली", असे अपिलार्थी यांनी लिहून दिले आहे. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय

अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २७.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जामध्ये संदर्भित केलेल्या अर्जास उद्देशून अपिलार्थीस तत्कालीन स्थितीची माहिती दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी, त्यांच्या प्रथम अर्जामध्ये संदर्भित केलेल्या अपघातातील वाहनचालकास स्वतः पकडून दिले. तथापि त्यांच्या नावाचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांनी पंचनाम्यामध्ये व इतर कुठेही केलेला नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली ही माहिती पूर्णतः असत्य असून ती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व असत्य माहिती दिल्याने, त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास शेवटी विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते वाहतुक शाखेचे अधिकारी असून रस्त्यावर होणाऱ्या अपघातांची नोंद त्यांच्या विभागाकडून केली जात नाही. अपघात स्थळीचा पंचनामा, साक्षीदारांचे जाबजबाब वगैरे सोपस्कार सदर अपघात ज्या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात घडतो, त्या पोलीस ठाण्यामार्फत पार पाडले जातात, त्यामुळे अपिलार्थीने मूळात मागणी केलेली माहिती प्रत्यक्षतः त्यांच्या ताब्यात नव्हती. सदरची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त विभाग-१,नाशिक यांच्या ताब्यात होती. अपघात स्थळाचा पंचनामा करणे हे वाहतुक शाखेचे काम नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सहायक पोलीस आयुक्त,विभाग-१,नाशिक यांनी अपिलार्थीस दि. ८.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिली आहे.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०.११.२००६ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यापैकी

अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.६.२००६ रोजी झालेल्या अपघाताच्या पंचनाम्याची व एफ.आय.आर.च्या प्रतींची मागणी केली आहे. या माहितीमध्ये अपिलार्थीने 'इतर माहितीचे दस्तऐवज' असे म्हटले आहे. तथापि इतर माहितीचे दस्तऐवज म्हणजे नेमके कोणते दस्तऐवज यांचा विशिष्ट असा उल्लेख या माहितीमध्ये केला नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ मधील "इतर माहितीचे दस्तऐवज" या उपमुद्याची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र पंचनाम्याची व एफ.आय.आर.च्या प्रती ही अपिलार्थीची मागणी, अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस देय ठरत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे -'अर्जाप्रमाणे १ ते ९ बाबींचा भरपाईसह खुलासा केव्हा मिळेल',अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही भविष्यकाळातील असल्याने, तसेच माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ द्वारे अपिलार्थीने - 'श्री. घुगे व जाधव यांच्यावर काय कारवाई केली ? केली नसेल तर का नाही ?' या मुद्याची तपासणी केली असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. घुगे व श्री. जाधव यांच्यावर केलेल्या कारवाईची माहिती देय ठरते, मात्र कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे अपिलार्थीस देण्याचे, जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाची व्याख्या पाहता, माहिती अधिकार अधिनियमातील अंमलबजावणीमध्ये, जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदींचे पालन करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करणे एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबद्दल अथवा एखाद्या निर्णयाबद्दल खुलासा, स्पष्टीकरण, वैयक्तिक अभिप्राय अथवा कारणे अपेक्षित करणारी माहिती विचारणे, या प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये समाविष्ट नाहीत, हे

विवेचन पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ मधील अंशतः माहिती देय ठरत आहे.

उपरोक्त कागदपत्रांवरुन असेही दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १०.११.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दि. ९.१२.२००६ पर्यंत प्रथम प्रतिसाद देणे आवश्यक होते, तथापि या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी दिलेला नाही. अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून देखील त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडून रु.१४/- इतके शुल्क दि. ८.१.२००७ रोजी प्राप्त करुन घेतले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त विभाग-१,नाशिक यांच्याकडून त्यांच्याकडील दि. ८.१.२००७ रोजीच्या पत्राबरोबर पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे सहायक पोलीस आयुक्त यांना उद्देशून लिहिलेले दि. २.१२.२००६ रोजीचे पत्र, सहायक पोलीस आयुक्त,विभाग-१,नाशिक शहर यांनी दि.२७.११.२००६ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भद्रकाली पोलीस स्टेशन यांना उद्देशून लिहिलेले एक पत्र, अशी दोन पत्रे त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहितीपोटी दिली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तिशः माहिती दिली आहे. अपिलार्थीस व्यक्तिशः तीन पृष्ठांची माहिती देऊन, अपिलार्थीकडून रु. १४/- इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन घेतले आहे.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती देऊनही सशुल्क माहिती पुरविणे, अपिलार्थीकडून चुकीचे शुल्क आकारणे, अशाप्रकारची कार्यशैली वापरल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एफ.आय.आर व पंचनाम्याची प्रत मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी सहायक पोलीस आयुक्त व पोलीस निरीक्षक,भद्रकाली पोलीस स्टेशन यांच्यातील परस्परांशी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या. मात्र या पत्रासोबत त्यांनी एफ.आय.आर. व पंचनाम्याच्या प्रती, ज्या अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे अपेक्षित केल्या आहेत, त्या पुरविल्या नाहीत. अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.६.२००६ रोजी झालेल्या अपघाताचा पंचनामा व एफ.आय.आर.यांच्या प्रती अपिलार्थीस दि. १०.११.२००६ रोजीपर्यंत म्हणजेच अंदाजे ५ महिन्याचा कालावधी उलटून गेल्यानंतरही दिल्या नाहीत. दि. २८.६.२००६ रोजी अपघात झाला असताना, दि. १०.११.२००६ पर्यंत सदर अपघाताचा एफ.आय.आर. अथवा पंचनाम्याच्या प्रती सहायक पोलीस आयुक्त विभाग-१,नाशिक यांच्याकडे उपलब्ध नसणे ही शक्यता कोणत्याही परिस्थितीत या प्रकरणी संभवत असल्याचे कायद्यातील तरतूद व या विषयावर मा. उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय पाहता,आयोगास वाटत नाही. एफ.आय.आर.च्या प्रती देण्यासंदर्भात कोणीही दखलपात्र गुन्हयाची तक्रार केल्यास ती, नोंदवून घेणे गरजेचे असून, पोलीसांवर बंधनकारक असल्याचा महत्त्वपूर्ण निर्वाळा मा. मुंबई उच्च न्यायालयाने माहे ऑक्टोबर, २००८ मध्ये दिलेला आहे. हे पाहता, अपिलार्थीने दि. १०.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, दि. २८.६.२००६ रोजीच्या अपघाताच्या पंचनाम्याची प्रत, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील माहिती देण्याच्या अनुज्ञेय कालावधीमध्ये (कलम ७ (१)) उपलब्ध नसण्याची कोणतीही शक्यता आयोगास दिसून येत नाही. याचाच अर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून हेतूतः माहिती दडविली असून त्यांनी दि. ८.१.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ज्या जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात होती, त्यांनीच ती अपिलार्थीस दि.८.१.२००७ रोजी दिलेली आहे, मात्र अपिलार्थीस दिलेली ही माहिती दिशाभूल करणारी व अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने दिली असल्याने, ती अपिलार्थीस विनामूल्य देय ठरते, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु.१४/- हे त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ व ३ अंशतः ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ७ दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे,मुद्दा क्र.१ व ३ अंशतः ही, माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१४/- त्यांना परत करावे.

उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतून दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेचा अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (गृह) यांना करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यावर ते आज सुनावणीस हजर न राहिल्याबद्दल कारवाई करण्याची अपिलार्थीने आयोगाकडे विनंती केली, तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची अथवा कारवाईची शिफारस करण्याची अधिकारिता, राज्य माहिती आयोगाला नसल्याने, अपिलार्थी यांच्या या मुद्याची दखल आयोग घेत नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी आज रोजी सुनावणीस हजर न राहिल्याने आयोगातर्फे तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.१ व ३ या मुद्यांची अंशतः माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (गृह) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयरामपंत नामदेवराव लगड,जनरल सेक्रेटरी, ग्राहकपंचायत, पाटील प्राईड,ए-१, दिपालीनगर, नाशिक, ता.जि.नाशिक- ४२२ ००९

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,वाहतुक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),नाशिक शहर,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२६७
निर्णय दिनांक २३-०१-२००९

१ श्री. गौतम संतोष पारेराव, : अपिलार्थी
रा.धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,धुळे
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, धुळे.
जन अपिलीय अधिकारीः तहसीलदार, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २३.१.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले अपील क्र.२२६७/०७ हे, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली असल्याने व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याने, निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. या पत्रामध्ये केलेल्या विनंतीनुसार अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील क्र.२२६७/०७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२२६७/०७, दि. ५.६.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गौतम संतोष पारेराव, दै. युगपरिवर्तन एक्सप्रेस कार्यालय, भिमनगर,गुरुकूल हायस्कूलजवळ, साक्री रोड, धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, साक्री, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२६८
निर्णय दिनांक    २३-०१-२००९

१ श्री. दिनेश बाबूलालजी माळी, : अपिलार्थी
रा. अजंग ता.जि.धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,अजंग
ता.जि.धुळे

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,धुळे
जि.धुळे.

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),
पंचायत समिती, धुळे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. ३०.०५.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.४.२००७ रोजी आदेश देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने दि. ०३.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २.२.२००७ रोजीच्या ग्रामसभेच्या प्रोसिडींगच्या ठरावाच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ४.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस विनाविलंब माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व्यक्तिशः मागितलेली होती व ही माहिती घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे वारंवार उपस्थित राहत होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस त्याचवेळी पुरविली आहे. या माहितीपृष्ठ्यर्थ अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे कोणतेही शुल्क भरलेले नाही. त्यांना सतत विनंती करुनही अपिलार्थीने, माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम दिली नाही तसेच त्यांना दिलेल्या माहितीची पोचही दिली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर, जन माहिती अधिकारी यांना दि. १०.४.२००७ रोजी असे लिहून दिले आहे की, त्यांनी अर्जात नमूद केलेली माहिती मिळाली असून अपिलार्थीचे समाधान झालेले आहे व त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची सदर दि.१०.४.२००७ रोजीची पोच आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम,तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०२.२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती व सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी उपस्थित राहिले असल्याची कबूली खुद्द तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दिली असल्याचे स्पष्ट केले आहे. तथापि अपिलार्थीस निश्चितपणे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी केव्हा दिली, याचा खुलासा अथवा या संदर्भातील कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला नाही. मात्र त्यांनी या संदर्भात अपिलार्थीचे त्यांना प्राप्त झालेले दि. १०.४.२००७ रोजीचे पत्र आयोगास दाखविले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाल्याचे कबूल केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती दिली हे विचारले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती आयोगास दाखविली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सुसंगत असल्याचे दिसून येते. तथापि हीच माहिती अपिलार्थीस मिळाली किंवा कसे हे आयोगास, अपिलार्थी यांच्या आजच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त झाल्याचे दि. १०.४.२००७ रोजी लिहून दिले आहे, तथापि या नंतर त्यांनी दि. ३०.५.२००७ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याने, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती खरोखरीच प्राप्त झाली आहे किंवा कसे, याबाबत आयोगाचे मनात संदेह निर्माण होत आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवावी व अपिलार्थी हे माहिती मागण्यासाठी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः

उपस्थित झाल्यास, त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य दोन साक्षीदारांच्या समक्ष उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिनेश बाबूलाल माळी,(उपसरपंच),मु.पो.अजंग, ता.जि.धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, अजंग, ता.जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्राम पंचायत), पंचायत समिती, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२६९
निर्णय दिनांक २३-०१-२००९

१ श्री. सुरेंद्रकुमार शांतीलाल कोठारी, : अपिलार्थी
रा.लोणी, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संगमनेर जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
मंडळ कार्यालय,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, अहमदनगर
जि.अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संगमनेर जि.अहमदनगर.

जन अपिलीय अधिकारीः कार्यकारी अभियंता,
विभागीय कार्यालय,महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, संगमनेर
जि.अहमदनगर.

त्रयस्थ पक्षः श्री. विनायक बोधक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थीने त्यांचे, द्वितीय अपील क्र. २२६९/०७ संदर्भात दि. २३.१.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.६.२००७ रोजी संपूर्ण माहिती दिल्याने व त्यांना आता अधिक माहितीची गरज नसल्याने, त्यांनी सादर केलेले विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या विनंतीनुसार अपिलार्थीचे विचाराधीन क्र.२२६९/०७ दि.१३.६.२००७ हे द्वितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२२६९/०७, दि.१३.६.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेंद्रकुमार शांतीलाल कोठारी, इंद्रायणी बंगल्याशेजारी, मुसळेवस्ती, मु.पो.लोणी ता. राहता, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७०
निर्णय दिनांक २३-०१-२००९

१ सौ. छाया चंद्रकांत कुलकर्णी, : अपिलार्थी
रा. शिरपूर जि.धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर,शिरपूर जि.धुळे
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष/सचिव,
श्री. हनुमान व्यायाम मंदिर ट्रस्ट, शिरपूर,
जि.धुळे

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, धुळे

त्रयस्थ पक्ष: श्री. नाना साहेबराव मंगळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हे त्यांच्या व जन अपिलीय अधिकारी , यांच्या प्रतिनिधीसह (वकील) उपस्थित आहेत, तर त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०६.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ६.३.२००७ रोजीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज दिला असता, त्या

अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेल्या पाकीटामध्ये त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे नव्हती, हे, पाकीट उघडल्यावर त्यांच्या लक्षात आले. तद्नंतर त्यांनी दि. २१.३.२००७ रोजी परत माहितीसाठीचा अर्ज केला व त्यामध्ये त्यांनी हस्तपोच माहिती मागितली असता,त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दोन शिपायांच्या हस्ते प्रत्यक्षपणे पाठवून फसवणूक करण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारचे अभिप्राय नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने दि. ०६.०३.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पदवीधर प्राथमिक शिक्षकांची पदमान्यता व नेमणूकीसंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.१०.२००५ रोजी प्रस्ताव क्रमांक ७२६ नुसार पदमान्यतेसाठी नगरपालिकेकडे नाना साहेबराव मंगळे यांचा प्रस्ताव कोणत्या जी.आर.नुसार पाठविला व त्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रत, माझ्या नावाचा प्रस्ताव आपण का टाळला, यास नेमके मुख्याध्यापक की अध्यक्ष जबाबदार याविषयी लेखी उत्तर, या शिक्षकाची नेमणूक जाहीरात देऊन केली असल्यास त्या जाहीरातीच्या कात्रणाची झेरॉक्स प्रत, अशापध्दतीने नेमणूक केली नसल्यास स्पष्टपणे कळवावे व नगरपालिका, शिरपूर कडून पदवीधर प्राथमिक शिक्षक नाना साहेबराव मंगळे या शिक्षकाच्या पदास मान्यता मिळाली असल्यास त्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील विनादिनाकांच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात काही माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांचे उपस्थित वकील श्री.योगेश अग्रवाल यांनी सदर पत्र अपिलार्थीस दि. १७.३.२००७ रोजी पाठविल्याचे आयोगास सांगितले व त्यांच्या म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांनी पोस्टाची पावती आयोगास दाखविली तथापि या पावतीवरील दिनांक अस्पष्ट असल्याने, वाचता येण्याजोगा नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी (वकील) यांनी आयोगास अवगत केले. जन अपिलीय अधिकारी यांना पोस्टाने अपील अर्ज पाठविल्यासंदर्भात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे पोस्टाची दि. २१.४.२००७ रोजीची ३५ क्रमांकाची पावती सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास या टप्प्यावर असे अवगत केले की, त्यांच्या अपिलावर सुनावणीसाठी त्यांनी अपिलार्थीस पत्र पाठविले असता, अपिलार्थी यांनी सदर पत्र स्वीकारले नाही. ही वस्तुस्थिती व शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक:संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ कं. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्याचे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, धुळे यांना असे आदेशित करण्यात येत की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २१.४.२००७ रोजीच्या अध्यक्ष/सचिव श्री. हनुमान व्यायाम मंदिर ट्रस्ट, शिरपूर, जि.धुळे यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, पंचेचाळीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश अपिलार्थीस मान्य नसल्यास, हे आदेश निर्गमित झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत त्या राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथ.)जिल्हा परिषद, धुळे यांनी अपिलार्थी यांच्या दि.२१.४.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. छाया चंद्रकांत कुलकर्णी,"श्री.सुलक्षणा", ५ अ, शारदानगर,रा. शिरपूर जि.धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरस्वती प्राथमिक विद्या मंदिर, शिरपूर जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, श्री. हनुमान व्यायाम मंदिर ट्रस्ट, बाबुराव वैद्य मार्केट,शिरपूर, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ),जिल्हा परिषद, धुळे यांना अपिलार्थी यांच्या दि. २१.४.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०७०

निर्णय दिनांक २७-०१-२००९

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, अपिलार्थी

६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड,

जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

महसूल आयुक्त, नागपूर प्रभाग यांचे कार्यालय, नागपूर - ४४० ००१

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी

महसूल आयुक्त, नागपूर प्रभाग यांचे कार्यालय, नागपूर - ४४० ००१

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याबाबत आजतागायत काही कळविले नसल्याचे म्हटले असून या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटना, नागपूर यांनी दिनांक ०१-०१-२००८ रोजी महाराष्ट्रातील भारतीय वन सेवेतील अधिका-यांनी बंधनकारक असलेले कर, स्वामित्व शुल्क, मुद्रांक शुल्क इत्यादी प्रकरणी न केलेली वसुली होण्याबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये राजपत्रित वन अधिकारी संघटनेने दिनांक ०१-०१-२००८ रोजी दिलेल्या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात लिहिण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीच्या व इतर सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती, संबंधीत भारतीय वन सेवेच्या अधिका-यांविरुध्द ज्या नियमान्वये तात्काळ कारवाई करणे शक्य आहे त्या नियमांची व कायद्यांच्या कलमांची माहिती व वसुल न झालेला महसूल वसुल करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज दाखल केल्यासंदर्भात कोणताही पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील अर्ज खाजगी कुरिअर सेवेमार्फत संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविल्याचे अपिलार्थी आयोगास सांगत आहेत. तथापि त्यांच्याकडे यासंदर्भात कोणताही पुरावा उपलब्ध नाही हे पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ०२ मे २००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेश करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावे. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश मान्य नसल्यास हे आदेश अपिलार्थीस प्राप्त झालेल्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत ते अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने त्यांचा दिनांक ०२-०५-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथमतः प्राप्त होईल याची स्वतः खात्री करुन घ्यावी. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत, सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

औरंगाबाद

दिनांक २७-०१-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, ६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी, महसूल आयुक्त नागपूर प्रभाग यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, जी. पी. ओ. चौक, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, महसूल आयुक्त नागपूर प्रभाग यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, जी. पी. ओ. चौक, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०७१

निर्णय दिनांक   २७-०१-२००९

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, अपिलार्थी
६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड,
जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महसूल आयुक्त, अमरावती प्रभाग यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, अमरावती - ४४४ ६०३

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
महसूल आयुक्त, अमरावती प्रभाग यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, अमरावती - ४४४ ६०३

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याबाबत आजतागायत काही कळविले नसल्याचे म्हटले असून या अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटना, नागपूर यांनी दिनांक ०१-०१-२००८ रोजी महाराष्ट्रातील भारतीय वन सेवेतील अधिका-यांनी बंधनकारक असलेले कर, स्वामित्व शुल्क, मुद्रांक शुल्क इत्यादी प्रकरणी न केलेली वसुली होण्याबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये राजपत्रित वन अधिकारी संघटनेने दिनांक ०१-०१-२००८ रोजी दिलेल्या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात लिहिण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीच्या व इतर सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती, संबंधीत भारतीय वन सेवेच्या अधिका-यांविरुध्द ज्या नियमान्वये तात्काळ कारवाई करणे शक्य आहे त्या नियमांची व कायद्यांच्या कलमांची माहिती व वसुल न झालेला महसूल वसुल करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज दाखल केल्यासंदर्भात कोणताही पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील अर्ज खाजगी कुरिअर सेवेमार्फत संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविल्याचे अपिलार्थी आयोगास सांगत आहेत. तथापि त्यांच्याकडे यासंदर्भात कोणताही पुरावा उपलब्ध नाही हे पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ०२ मे २००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावे. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश मान्य नसल्यास हे आदेश अपिलार्थीस प्राप्त झालेल्या दिनांकापासून ते ९० दिवसाच्या आत अधिनियमातील कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत. अपिलार्थीने त्यांचा दिनांक ०२-०५-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथमतः प्राप्त होईल याची स्वतः खात्री करुन घ्यावी.

औरंगाबाद

दिनांक २७-०१-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, ६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी, महसूल आयुक्त, अमरावती प्रभाग यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, अमरावती - ४४४ ६०३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, महसूल आयुक्त, अमरावती प्रभाग यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, अमरावती - ४४४ ६०३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०७४

निर्णय दिनांक २७-०१-२००९

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, अपिलार्थी
६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड,
जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महसूल आयुक्त, कोकण प्रभाग यांचे कार्यालय,
सी. बी. डी. बेलापूर, ठाणे, जिल्हा ठाणे

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
महसूल आयुक्त, कोकण प्रभाग यांचे कार्यालय,
सी. बी. डी. बेलापूर, ठाणे, जिल्हा ठाणे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, सी. बी. डी. बेलापूर, जिल्हा ठाणे

जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, सी. बी. डी. बेलापूर, जिल्हा ठाणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याबाबत आजतागायत काही कळविले नसल्याचे म्हटले असून या अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटना, नागपूर यांनी दिनांक ०१-०१-२००८ रोजी महाराष्ट्रातील भारतीय वन सेवेतील अधिका-यांनी बंधनकारक असलेले कर, स्वामित्व शुल्क, मुद्रांक शुल्क इत्यादी प्रकरणी न केलेली वसुली होण्याबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये राजपत्रित वन अधिकारी संघटनेने दिनांक ०१-०१-२००८ रोजी दिलेल्या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात लिहिण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीच्या व इतर सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती, संबंधीत भारतीय वन सेवेच्या अधिका-यांविरुध्द ज्या नियमान्वये तात्काळ कारवाई करणे शक्य आहे त्या नियमांची व कायद्यांच्या कलमांची माहिती व वसुल न झालेला महसूल वसुल करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांना अपिलार्थीचा प्रथम अर्ज अपिलार्थीच्या दिनांक ०३-०५-२००८ रोजी दाखल केलेल्या अपील अर्जासोबत प्रथम प्राप्त झाला. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये, महाराष्ट्र राज्य राजपत्रित वनाधिकारी संघटनेने, त्यांच्या कार्यालयाकडे दिलेल्या दिनांक ०१-०१-२००८ रोजीच्या अर्जाची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी, वन संरक्षक, नागपूर यांच्या कार्यालयास दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या पत्रासोबत पाठविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये माहिती संदर्भात केलेला अर्ज त्यांच्या कार्यालयाच्या नोंदणी शाखेत प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. अपिलार्थीच्या दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी ३१-०५-२००८ सुनावणी ठेवली असता, अपिलार्थी या सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून सदर पत्र अपिलार्थीस त्यांच्या पत्यावर प्राप्त झाल्याचे दिसून येते, तथापि अपिलार्थी

यांचे म्हणणे असे आहे की, पोस्टाच्या पोच पावतीवरील सही त्यांची नाही. जन माहिती अधिकारी यांनी या अपील निर्णयाची प्रत अपिलार्थीस आयोगासमोर व्यक्तिशः आज हस्तांतरीत केली आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला होता त्या प्राधिकरणाने अपिलार्थीस कळविले असल्याने आता अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना वन संरक्षक नागपूर यांच्याकडून देय आहे. सबब वन संरक्षक, नागपूर यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे मागणी केलेली माहिती भविष्यातील असल्याने ही माहिती त्यांना देय होत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. वन संरक्षक, नागपूर यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, ६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, सी. बी. डी. बेलापूर, ठाणे, जिल्हा ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, सी. बी. डी. बेलापूर, ठाणे, जिल्हा ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ वन संरक्षक, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०७६

निर्णय दिनांक   २७-०१-२००९

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, — अपिलार्थी
६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड,
जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महसूल आयुक्त, पुणे प्रभाग यांचे कार्यालय,
कौन्सिल हॉल, पुणे - ४११ ००१

२ जन अपिलीय अधिकारी, — प्रतिवादी
महसूल आयुक्त, पुणे प्रभाग यांचे कार्यालय,
कौन्सिल हॉल, पुणे - ४११ ००१

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याबाबत आजतागायत काही कळविले नसल्याचे म्हटले असून या अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटना, नागपूर यांनी दिनांक ०१-०१-२००८ रोजी महाराष्ट्रातील भारतीय वन सेवेतील अधिका-यांनी बंधनकारक असलेले कर, स्वामित्व शुल्क, मुद्रांक शुल्क इत्यादी प्रकरणी न केलेली वसुली होण्याबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये राजपत्रित वन अधिकारी संघटनेने दिनांक ०१-०१-२००८ रोजी दिलेल्या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात लिहिण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीच्या व इतर सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती, संबंधीत भारतीय वन सेवेच्या अधिका-यांविरुध्द ज्या नियमान्वये तात्काळ कारवाई करणे शक्य आहे त्या नियमांची व कायद्यांच्या कलमांची माहिती व वसुल न झालेला महसूल वसुल करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक २४-०३-२००८ रोजीचा मूळ अर्ज व दिनांक ०२-०५-२००८ रोजीचा अपील अर्ज त्यांना प्राप्त झालेला नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या कथित अर्जावर व अपील अर्जावर त्यांच्याकडूनआजपर्यंत कोणतीही कारवाई झाली नाही. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही किंवा आज रोजी देखिल सदर पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकत नाहीत. हे पाहता अपिलार्थीस असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्या दिनांक २४-०३-२००८ व दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या अनुक्रमे प्रथम व अपील अर्जाची सत्यप्रत त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे द्यावी. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २७-०१-२००९ रोजी प्राप्त झाला असे गृहीत धरुन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी पुढील कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१.	अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	२७-०१-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, ६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड, जळगांव.

२	जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०७९

निर्णय दिनांक २७-०१-२००९

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, अपिलार्थी
६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड,
जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महसूल आयुक्त, नाशिक प्रभाग यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, नाशिक रोड, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
महसूल आयुक्त, नाशिक प्रभाग यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, नाशिक रोड, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी दाखल झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याबाबत आजतागायत काही कळविले नसल्याचे म्हटले असून या अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २४-०३-२००८ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटना, नागपूर यांनी दिनांक ०१-०१-२००८ रोजी महाराष्ट्रातील भारतीय वन सेवेतील अधिका-यांनी बंधनकारक असलेले कर, स्वामित्व शुल्क, मुद्रांक शुल्क इत्यादी प्रकरणी न केलेली वसुली होण्याबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये राजपत्रित वन अधिकारी संघटनेने दिनांक ०१-०१-२००८ रोजी दिलेल्या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात लिहिण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीच्या व इतर सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती, संबंधीत भारतीय वन सेवेच्या अधिका-यांविरुध्द ज्या नियमान्वये तात्काळ कारवाई करणे शक्य आहे त्या नियमांची व कायद्यांच्या कलमांची माहिती व वसुल न झालेला महसूल वसुल करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा दिनांक २४-०३-२००८ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३१-०३-२००८ रोजी प्राप्त झाला. हा अर्ज त्यांनी अपिलार्थीने ज्या विषयासंदर्भात माहिती मागितली आहे ती त्यांच्याशी संबंधीत नसल्याने तो दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे मुख्य वन संरक्षक, (प्रादेशिक) नाशिक यांच्याकडे पाठविला. मात्र अपिलार्थीने, महसूल आयुक्त, नाशिक यांच्या कार्यालयाकडे केलेल्या याच विषयावरील दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेऊन या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०६-२००८ रोजी आपले आदेश पारित केले आहेत व या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, अर्जदाराने ज्या दिनांक ०१-०१-२००८ रोजीच्या अर्जाविषयी त्यांच्याकडे माहिती मागितली होती तो अर्ज महसूल विभागाकडून वन विभागाचे माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पाठविला व त्याची एक प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. या प्रकरणी अपिलार्थीचा मूळ अर्ज महसूल विभागाच्या माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वन विभागाकडे पाठविला मात्र यासंदर्भातील अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात महसूल विभागाच्या जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन ते नामंजूर केले. महसूल विभागातील अधिका-याची ही कृती चुकीची असून, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाशी संबंधीत असणे अनिवार्य आहे, असे त्यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीचा प्रथम अर्ज वन विभाग नाशिक यांना प्राप्त झाला असल्याने व या प्रकरणी

मुख्य वन संरक्षक, नाशिक यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली असल्याने त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस सदर आदेश मान्य न झाल्यास ते अधिनियामातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य वन संरक्षक, नाशिक यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद
दिनांक २७-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, ६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वनसंरक्षक, वनवृत्त, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत)

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०८३

निर्णय दिनांक २७-०१-२००९

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, अपिलार्थी
६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड,
जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महसूल आयुक्त, औरंगाबाद प्रभाग यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, दिल्ली गेट जवळ, फाजलपुरा,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
महसूल आयुक्त, औरंगाबाद प्रभाग यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, दिल्ली गेट, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अपर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याबाबत आजतागायत काही कळविले नसल्याचे म्हटले असून या अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटना, नागपूर यांनी दिनांक ०१-०१-२००८ रोजी महाराष्ट्रातील भारतीय वन सेवेतील अधिका-यांनी बंधनकारक असलेले कर, स्वामित्व शुल्क, मुद्रांक शुल्क इत्यादी प्रकरणी न केलेली वसुली होण्याबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये राजपत्रित वन अधिकारी संघटनेने दिनांक ०१-०१-२००८ रोजी दिलेल्या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात लिहिण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीच्या व इतर सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती, संबंधीत भारतीय वन सेवेच्या अधिका-यांविरुध्द ज्या नियमान्वये तात्काळ कारवाई करणे शक्य आहे त्या नियमांची व कायद्यांच्या कलमांची माहिती व वसुल न झालेला महसूल वसुल करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ०७-०५-२००८ रोजी प्राप्त झाला. या अपील अर्जावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या आपल्या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा कथित दिनांक २४-०३-२००८ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही, मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना अपिलार्थीचा मूळ अर्ज अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज सादर केला नसल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या विधानातील ही विसंगती लक्षात घेता, तसेच अपिलार्थीकडे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केल्याबाबतचा कोणताही पुरावा नसल्याने अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुन्हा नव्याने अर्ज करुन मागावी. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार, आवश्यक ती कारवाई अधिनियमातील तरतुदीनसार करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत माणिकलाल छाजेड, ६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०९१

निर्णय दिनांक २७-०१-२००९

१ श्री. सुभाष प्रभाकर जोशी, अपिलार्थी
मु. पो. पहूर-पेठ, तालुका जामनेर,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
आर. टी. लेले हायस्कूल, पहूर, तालुका जामनेर, जिल्हा
जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव,
पहूर ग्रुप एज्युकेशन सोसायटी, पहूर,
तालुका जामनेर, जिल्हा जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी माहितीसाठीचा प्रथम अर्ज दिनांक ०२-०४-२००५ रोजी संबधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे,

महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ नुसार केला होता. आज रोजी जे अपील आयोगासमोर आहे त्या अपिलाच्या मूळ अर्जावर निर्णय देण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगाला नसल्याने, महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ निरसीत होऊन, माहिती अधिकार अधिनियम २००५ हा दिनांक १२ ऑक्टोबर २००५ पासून अस्तित्वात आल्याने, विचाराधीन अपिलावर सुनावणी घेण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २०९१/०७ दिनांक ०३-०९-०७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २७-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष प्रभाकर जोशी, मु. पो. पहूर-पेठ, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आर. टी. लेले हायस्कूल, पहूर, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, पहूर ग्रुप एज्युकेशन सोसायटी, पहूर, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक २०९२/०७, २०९३/०७ व २०९४/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०९२, २०९३ व २०९४

निर्णय दिनांक २७-०१-२००९

१ श्री. सुभाष प्रभाकर जोशी, अपिलार्थी
मु. पो. पहूर-पेठ, तालुका जामनेर,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, आर. टी. लेले हायस्कूल, पहूर, तालुका
जामनेर, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, पहूर ग्रुप एज्युकेशन सोसायटी, पहूर,
तालुका जामनेर, जिल्हा जळगांव

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २७-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी नोंदविलेली तीन व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी मुख्यध्यापक आर. टी. लेले हायस्कूल, पहूर तालुका जामनेर यांना तीन वेगवेगळया अर्जाव्दारे वेळोवेळी मागितलेली माहिती त्यांना संबंधीत

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याने, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे ही व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या तीनही प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या तीन वेगवेगळ्या अर्जाव्दारे सन २००० ते २००७ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या हायस्कूलमधील शिक्षक सेवकांची नियुक्ती, शिक्षक सेवकांचे पगार व लोकमत या दैनिक वृत्तपत्रामध्ये ०४ मे २००० साली मुख्याध्यापकाने दिलेल्या स्पष्टीकरणासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये अपील क्रमांक २०९२ व २०९३/०७ या संदर्भात दिनांक ३१-०५-२००७ रोजी व अपील क्रमांक २०९४/०७ यासंदर्भात दिनांक ०७-०६-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपिले त्यांनी संस्थेचे चेअरमन / सचिव यांना उद्देशून केली होती. तथापि संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जांवर कोणतीही सुनावणी घेतली नसल्याचे आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे तीन व्दितीय अपिले सादर केली आहेत.

संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलांची सुनावणी न घेण्याची कारणे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत. त्यांनी संस्थेच्या अध्यक्षांना व सचिवांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेण्यासाठी विनंती केली होती, तथापि त्यांनी सुनावणी घेतली नाही, एवढेच माफक स्पष्टीकरण त्यांनी आयोगास दिले.

या टप्प्यावर आयोगास अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी होणे आवश्यक आहे असे वाटते. तसेच आता शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ प्रमाणे शिक्षण संस्थेसंदर्भात संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०५-२००७ रोजीच्या दोन व दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या एका प्रथम अपिलाची सुनावणी हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्यास, अपिलार्थी प्रथम अपिलाचा निर्णय जन अपिलीय अधिकारी

यांनी निर्गमित केल्यापासून ९० दिवसांच्या आत अधिनियमातील कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली तीनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २०९२/०७, २०९३/०७ व २०९४/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांनी अपिलार्थीच्या सदरील तीनही प्रथम अपिलांवर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष प्रभाकर जोशी, मु. पो. पहूर-पेठ, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आर. टी. लेले हायस्कूल, पहूर, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, पहूर ग्रुप एज्युकेशन सोसायटी, पहूर, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक ३१-०५-२००७ रोजीच्या दोन व दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत)

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक २०९५/०७ व २०९६/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०९५ व २०९६

निर्णय दिनांक २७-०१-२००९

१ श्री. प्रविणकुमार सुभाष जोशी, अपिलार्थी

मु. पो. पहूर-पेठ, तालुका जामनेर,

जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक,

आर. टी. लेले हायस्कूल, पहूर, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सचिव,

पहूर ग्रुप एज्युकेशन सोसायटी, पहूर,

तालुका जामनेर, जिल्हा जळगांव

त्रयस्थ पक्ष : श्री. गिरीश हिरालाल भामरे (अपील क्रमांक २०९६/०७)

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २७-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०९-२००७ व दिनांक १०-०९-२००७ रोजी (अनुक्रमे

अपील क्रमांक २०९५/०७ व २०९६/०७) नोंदविलेली दोन व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपील क्रमांक २०९५/०७ च्या संदर्भात अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनीही अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. अपील क्रमांक २०९६/०७ च्या संदर्भात त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये जी माहिती प्राप्त झाली ती अपूर्ण आहे. त्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०४-२००७ रोजी समक्ष अर्ज देऊन पूर्ण माहिती देण्यासंदर्भात लिहिले होते. परंतु त्यांच्या या पत्रावर संबंधितांकडून त्यांना कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापही कोणताही निर्णय दिलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, विचाराधीन दोनही अपील प्रकरणांमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शिक्षण संस्थेशी संबंधीत काही माहिती मागविली होती. त्यापैकी अपिलार्थीच्या दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या अपील क्रमांक २०९५/०७ च्या संदर्भाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतेही उत्तर दिले नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या यासंदर्भातील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय दिलेला नाही. अपील क्रमांक २०९६/०७ च्या संदर्भात असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांच्याकडे प्रथमतः दिनांक १२-०३-२००७ रोजी केला होता. अपिलार्थीच्या या अर्जास शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन मुख्याध्यापक, आर. टी. लेले हायस्कूल, पहूर यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांच्या पत्रानुसार मुख्याध्यापक, आर. टी. लेले हायस्कूल, पहूर यांनी दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविली. परंतु ही माहिती अपूर्ण आहे असे वाटल्यावरुन त्यांनी संस्थेचे सचिव तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या याही अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून उपरोक्त प्रकरणात मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले केली आहेत.

उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन आयोगास असे आढळून आले आहे की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर अद्यापपावेतो सुनावणीच झाली नाही. या टप्प्यावर, ही सुनावणी होणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. तसेच आता शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ प्रमाणे शिक्षण संस्थेसंदर्भात संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०६-२००७ रोजी केलेल्या दोनही प्रथम अपिलांची सुनावणी हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्यास, अपिलार्थी प्रथम अपिलाचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी निर्गमित केल्यापासून ९० दिवसांच्या आत, अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २०९५/०७ व २०९६/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांनी अपिलार्थीच्या सदरील प्रकरणातील दोनही प्रथम अपिलांवर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

औरंगाबाद

दिनांक २७-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रविणकुमार सुभाष जोशी, मु. पो. पहूर-पेठ, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आर. टी. लेले हायस्कूल, पहूर, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, पहूर ग्रुप एज्युकेशन सोसायटी, पहूर, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपिलाच्या प्रती)

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७१
निर्णय दिनांक २८-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल,<br>रा.बोदवड मेनरोड, जि.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, बोदवड, जि.जळगाव. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत),<br>जिल्हा परिषद,जळगाव | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.३.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे दि. ११.०४.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जास त्यांनी द्वितीय अपील करेस्तोपर्यंत उत्तर न दिल्याचे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १७.१.२००७ रोजीच्या अपिलाच्या संदर्भात कोणतीही माहिती दिली नाही व कोणताही निर्णय दिला नाही, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे सन २००० ते २००६ या कालावधीतील बोदवड ग्रामपंचायतीचे ठराव व कामकाजाबाबत एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - बोदवड ग्रामपंचायत कमिटी यांनी केलेले ठराव हे कायदेशीर व नियमानुसार आहेत अथवा त्रूटीपूर्ण, चुकीचे आहेत, याची माहिती, त्रूटीपूर्ण व अपूर्ण असल्यास त्याबाबत कोणाच्या कर्तव्याची कसूर आहे, ग्राम पंचायतीने केस नं.३४/२००० मध्ये जळगाव न्यायालयात दिलेली यादी व वादी व प्रतिवादी तडजोड प्रोसेस प्रमाणे ग्राम पंचायतीने पालन केले अथवा नाही, याची माहिती, ग्राम पंचायतीची मासिक सभा दि. १७.१०.२००६ या विषयावरील ठराव क्रमांक व ठरावाबाबतची माहिती, सदरचा ठराव हा कायदेशीर आहे काय, तडजोड प्रोसेस प्रमाणे ग्रामपंचायतीने पालन केलेले काय आहे,याची माहिती, चुकीचा व नियमबाहय ठराव असल्यास व अपूर्ण हा ठराव पुढे कायदेशीर करता येतो का, ठरावाप्रमाणे ग्रामपंचायत कमिटी यांना कामकाज करता येते का ? व प्लॉटचे भाडे वसूल करता येते का, ठराव क्र.६ दि. २९.१२.२००१ चा कायदेशीर व नियमानुसार आहे का, व ग्रामपंचायतीचे चुकीचे व नियमबाहय ठराव असल्यास त्याची जबाबदारी व कर्तव्य कोणाचे व कसे होते, चुकीच्या व नियमबाहय ठराव बहुमताच्या आधाराने पारीत करता येतात काय, - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.१२.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी ५ मुद्यांसंदर्भात माहिती दिली.अपिलार्थीने ही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ३०.१२.२००६ रोजी व्यक्तिशः उपलब्ध करुन घेतली असल्याचे व त्याप्रित्यर्थ पोचसही केल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दि. २६.१२.२००६ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवरुन दिसून येते. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.३.२००७ रोजी आपले निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्याने,

अपिलार्थीचे सदर अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून त्यांनी आपला युक्तिवाद लेखी पत्राद्वारे राज्य माहिती आयोगाकडे पाठविला असून, यामध्ये त्यांनी खरी,पूर्ण व वास्तविक माहिती अपेक्षित केली आहे व पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस माहिती देण्याचे कर्तव्य असतानाही ते आपल्या कर्तव्यात कसूर करुन टाळाटाळ करीत आहेत, त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडून माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी योग्य रितीने होईल, अशी तजवीज करावी, जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावावी असे त्यांनी या युक्तिवादामध्ये म्हटले आहे. या लेखी युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी हे चुकीच्या कागदपत्रांची पूर्तता करुन माहिती देण्यास टाळाटाळ करतात,सोबत संपूर्ण पुराव्याचे कागदपत्रे जोडलेली आहेत, या प्रकरणात चौकशी केल्यास त्यांनी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे दिसून येईल. शासकीय सार्वजनिक वापराची जागा भाडयाने देता येत नाही, अनधिकृत ठरावाद्वारे अनधिकृतरित्या व्यवहार करतात, जे वरिष्ठ आहेत, ते नेमके कर्तव्य टाळतात व ज्या लोकांनी चुका केल्या आहेत,त्यांनाच मूळ अर्ज वर्ग करतात व चुकीची माहिती देतात, या प्रकरणात चौकशी केल्यास त्यांना दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे दिसून येईल.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २६.१२.२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये दिली असून, ही माहिती सत्य आहे व अपिलार्थीपासून त्यांनी कोणतीही माहिती हेतूतः दडवून ठेवलेली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या ग्रामपंचायतीच्या दि. १७.१०.२००६ रोजीच्या मासिक सभेतील ठरावाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दुसऱ्या एका संदर्भाने दिलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात या ठरावाची प्रत दिली नाही. अपिलार्थी हे एकाच विषयावर वारंवार माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागत असतात, व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते माहिती घेण्यासाठी व्यक्तिशः, त्यांच्या कार्यालयात कधीही हजर राहत नाहीत. वेगवेगळया स्तरावरील माहिती अधिकाऱ्यांकडे एकच माहिती वारंवार मागत असतात. त्यांच्या खाजगी मिळकतीसमोर झालेले अतिक्रमण त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा वापर करुन हटवावयाचे आहे. अपिलार्थीच्या खाजगी मालमत्तेसमोरील अतिक्रमणाचे हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने, त्यावर अपिलार्थीस अपेक्षित असलेली अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही ते करु शकत नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास थोडक्यात अशी विशद केली की, अपिलार्थी यांची बोदवड गावामध्ये ग.नं.१७४ येथे स्वतःच्या जिनिंग फॅक्टरीची इमारत आहे. या इमारतीऐवजी अपिलार्थीस तेथे दुसरे बांधकाम करावयाचे आहे, तथापि या इमारतीसमोर अनधिकृत बांधकाम झाल्याने अपिलार्थीस त्यांच्या प्रस्तावित बांधकामामध्ये अडथळे निर्माण होत आहेत. अपिलार्थीच्या खाजगी मिळकतीसमोर झालेले अतिक्रमण हे सार्वजनिक वापराच्या रस्त्यावर झालेले आहे. (ग्रामपंचायतीच्या मिळकतीच्या जागेवर) सदर अतिक्रमणाबाबत अतिक्रमणधारकाने भूसावळ येथील दिवाणी न्यायालयात दावा (रेव्हेन्यू आर.क्र.२६/०६) दाखल केला असून, हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. प्रकरणाच्या न्यायप्रविष्ट स्थितीमुळे अपिलार्थीने संदर्भित केलेले अतिक्रमण त्यांना काढता येत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २.१२.२००६ रोजीच्या अर्जास दि. २६.१२.२००६ रोजी म्हणजेच, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दि. २६.१२.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यांवरील प्रश्नांना जन माहिती अधिकारी यांनी उत्तरे दिली आहेत, असे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदारांनी प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्या प्रश्नांना

उत्तर देणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नसून अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात निर्णय घेणे व अर्जदारास माहिती देण्याचा निर्णय झाल्यास ती त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास उपलब्ध करुन देणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीच्या या विषयावर राज्य माहिती आयोगाकडे अनेक अपिले दाखल झाली असून त्यावर निर्णय देखील झाले आहेत. याच विषयावर अपिलार्थी हे वेगवेगळया स्तरावरील अधिकाऱ्यांना माहिती विचारत असतात, अपिलार्थीची अशी अपेक्षा आहे की, ते ज्या स्तरावरील अधिकाऱ्यांकडे माहितीसाठी अर्ज दाखल करतात, त्या अधिकाऱ्याच्या स्तरावरुनच त्यांना माहिती पुरविली जावी. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागितलेली माहिती, सार्वजनिक प्राधिकरणाच्या ज्या जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे, त्याच जन माहिती अधिकारी यांनी ती माहिती सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस, अधिनियमातील विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे.या सर्व प्रकारामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ करतात व कर्तव्यात कसूर करतात, असे वाटत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीची मूळ तक्रार बोदवड ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावाच्या वैधतेसंदर्भात असल्याचे दिसून येते. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या मिळकतीसमोर झालेले अतिक्रमण हे अनधिकृत आहे व सदर अतिक्रमणासंदर्भात ग्रामपंचायतीने संबंधित अतिक्रमणधारकास नोटीस दिली असून सदर अतिक्रमणधारक हे दिवाणी न्यायालयात गेले असून या अतिक्रमणासंदर्भात निर्णय घेण्याची प्रक्रिया न्यायालयामध्ये चालू असल्याचे आयोगास उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती जर असत्य असल्याचे वाटत असेल तर ते माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या विषयाशी संबंधित सर्व अभिलेख्यांची तपासणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन करु शकतात.

जन माहिती अधिकारी यांच्या दि. २६.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पूर्ण माहिती मिळाली असल्याने माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

सबब वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे,या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित अभिलेख्यांची तपासणीची मागणी केल्यास, त्यांच्या मनातील शंका दूर होण्यास मदत होईल, असे आयोगास वाटते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य असल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा.बोदवड मेनरोड,बोदवड जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बोदवड, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७२
निर्णय दिनांक २८-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल,<br>रा.बोदवड मेनरोड, जि.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी<br>पंचायत समिती,<br>बोदवड जि. जळगाव | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद,जळगाव | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बोदवड, जि.जळगाव.
जन अपिलीय अधिकारीः उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत),
जिल्हा परिषद,जळगाव

१. त्रयस्थ पक्षः श्री. एकनाथ शेळके

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.१.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दि. २४.०१.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दिली नाही. ग्राम पंचायत,बोदवड यांनी चुकीचे ठराव असताना,त्याबाबत कोर्टात खोटे शपथपत्र दिले आहे. ग्रामपंचायत,बोदवडच्या कामकाजात अनियमितता असून, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती पूर्ण व अचूक नाही, तरी याबाबत प्रत्यक्ष विभागीय चौकशी करुन बोदवड ग्रामपंचायत बाबतची खरी माहिती द्यावी. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केला असून आपले कर्तव्य पार पाडण्याबाबत ते उदासिन असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.१०.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७ मुद्दे व त्यावरील अनेक उपमुद्यांद्वारे सन १९८८ ते २००६ या कालावधीशी संबंधित ग्रामपंचायत बोदवड संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही मुद्यावरील माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.११.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ५.१२.२००६ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी गट विकास अधिकारी यांना, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.७ बाबत पूर्ण माहिती तात्काळ मिळेल, याची स्वतः खात्री करुन घेण्याचे सूचित केले. तसेच या आदेशामध्ये त्यांनी ग्रामपंचायतीच्या ठरावाबाबत व ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या रस्त्यावरील अतिक्रमणासंबंधी काही अभिप्राय व्यक्त केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून त्यांनी आपला युक्तिवाद लेखी स्वरुपात राज्य माहती आयोगाकडे पाठविला असून, यामध्ये असे नमूद केले आहे की, बोदवड गाव शिवाराच्या नकाशाप्रमाणे गट नं.१७४ लगत उजनी रस्ता जातो, सदर रस्ता प्रजिमा १६ अ च्या दर्जाचा आहे. त्या रस्त्यावर कोणाही अधिकाऱ्याची योग्य परवानगी न घेता, ग्रामीण रुग्णालय बांधले आहे व बाकी रस्ता भाडयाने देऊन ग्रामपंचायतीने सदर रस्त्याचे अस्तित्त्वच संपवून टाकले आहे. सदर रस्ता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांच्या ताब्यात आहे व त्याचे सर्वोच्च नियंत्रण कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे असून या रस्त्यावर आजपावेतो एक कोटी सदतीस लाख रुपये अंदाजे खर्च झाले असून, हा खर्च कागदोपत्री दाखविला आहे. अधिकृत रस्त्याची कागदपत्रे देण्यास सदर अधिकारी नाकारत आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असून, या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ०६.११.२००६ रोजी लेखी अर्ज दिला असून, या अर्जामध्ये त्यांनी, त्यांच्या दि. १३.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती दि. ६.११.२००६ रोजी प्राप्त झाली असल्याचे व या संदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे म्हटले आहे, तसेच या अर्जामध्ये त्यांचा अर्ज निकाली काढण्याची विनंती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१०.२००६ व ८.११.२००६ रोजी अशा दोन टप्प्यामध्ये पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी हे त्यांच्या मालमत्तेसमोरील अतिक्रमण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा वापर करुन काढू ईच्छित आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१०.२००६ व ८.११.२००६ रोजी दिलेली माहिती पाहता, अपिलार्थीच्या अनेक मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, "ही माहिती आपणास एका मुद्यावर यापूर्वीच देण्यात आली असल्याचे" म्हटले आहे. तसेच

अपिलार्थीच्या या अर्जातील काही प्रश्नांना उत्तर देण्याच्या स्वरुपात त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये बोदवड ग्रामपंचायतीवर कोणाचे सर्वोच्च नियंत्रण आहे,त्यांचे अधिकार व कर्तव्ये काय आहेत, जी शासनाने गट विकास अधिकारी यांच्याकडे प्रदान केली आहेत, याची माहिती मागितली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये अनेक ठिकाणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व मत अपेक्षिले आहे, अशाप्रकारची माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती, त्यांना प्रश्नोत्तराच्या स्वरुपात न देता ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहे, त्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत पुरवाव्यात, असे जन माहिती अधिकारी यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दि. ६.११.२००६ रोजीच्या त्यांच्या निवेदनाद्वारे असे लिहून दिले आहे की, विचाराधीन अपिलाशी संबंधित दि. १३.१०.२००६ रोजीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना पूर्णतः प्राप्त झाली असून, या संदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही. जन माहिती अधिकारी यांना असे लिहून दिल्यानंतर, अपिलार्थीने परत राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दि. २४.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे व या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे म्हटले आहे, अपिलार्थीच्या या प्रकरणातील या दोन्ही भूमिका परस्परांशी विसंगत असल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये कितपत स्वारस्य आहे, याबाबत आयोग साशंक आहे, त्यामुळे या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात

येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच त्यांना तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा.बोदवड मेनरोड,बोदवड जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, बोदवड, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७३
निर्णय दिनांक २८-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. राजू ओंकार शेवरे,<br>मु.वडाळे-वडाळी,<br>ता.चाळीसगाव,जि.जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत, वडाळे-वडाळी,<br>ता.चाळीसगाव, जि.जळगाव.<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (वर्ग-१),<br>पंचायत समिती, चाळीसगाव,<br>जि.चाळीसगाव | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १३.४.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे दि. २३.०४.२००७ रोजी नोंदणी झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी ग्रामपंचायतीच्या विकास कामाबाबत दि.२६.१२.२००६ रोजीच्या तीन अर्जाद्वारे मागितलेली माहिती, अद्यापपावेतो मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः, अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० सालापासून वडाळा ग्रामपंचायतीमध्ये केलेल्या विकास कामाबाबत काही माहिती मागितली होती. ही माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीमध्ये -"सन २००० पासून वडाळा ग्रा.प.मध्ये केलेल्या विकास कामाचा तपशिल,झालेला खर्च व केलेली कामे, केलेल्या विकास कामाविषयी दि.१०.२.२००६ रोजी मागितलेली माहिती आजपर्यंत का दिली नाही,याचे कारण काय?, गटार बांधकाम कोणत्या योजनेत होते, गटाराची लांबी किती आहे, हा खर्च, बांधकामावर कोणाची बैलजोडी होती व काय रोजंदारी दिली व किती दिली व केलेल्या संपूर्ण कामाचा, विहीर,गटार,अंगणवाडी प्रत्येकाला किती खर्च आला, याचा पूर्ण तपशील"- या मुद्यांचा समावेश होता. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे, त्यांनी एकच माहिती ग्रामसेवक व पंचायत समिती यांच्याकडे दोन स्वतंत्र अर्जाद्वारे मागितली असता, त्यांना एकाच ठिकाणाहून माहिती प्राप्त झाली. प्रत्येक सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे त्यांना सुनावणीस हजर राहण्यापासून परावृत्त करीत असल्यामुळे त्यांचे आता मानसिक संतुलन ढासळले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने, तीन वेगवेगळया स्वतंत्र अर्जाद्वारे, ग्राम पंचायत व पंचायत समितीकडे अर्ज केले असता, अपिलार्थीस

ही माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते स्वत: कधीही त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहत नाहीत.

अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण का वाटते, असे आयोगाने विचारले असता, अपिलार्थीने आयोगास असे सांगितले की, ते स्वत: वडाळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच असून त्यांनी स्वत:ची बैलजोडी ग्रामपंचायतीच्या कामावर लावली असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या बैलजोडीचे बील दुसऱ्याच्या नावावर काढले आहे व त्यांच्या मूळ अर्जातील,- "बांधकामावर बैलजोडी कोणाची होती" - या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी यावर असा युक्तिवाद केला की, त्यांनी ग्रामपंचायतीच्या कामावर कोणाच्याही बैलजोडीचा वापर केला नाही. संबंधिताने संदर्भित केलेले काम गवंडयामार्फत केले गेले आहे. या बांधकामासंदर्भातील साहित्य ग्राम पंचायत खरेदी करीत असते व नंतर हे काम रोजंदारीवरील मजूरांकडून गवंडयामार्फत करुन घेतले जाते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे विचारलेल्या कामाची ग्रामपंचायतीकडून पूर्तता झाली आहे. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही, त्यांनी अपिलार्थीस दि. २८.५.२००७ रोजी ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी "कोणाची बैलजोडी वापरली " या मुद्यावर अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने, अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण वाटत आहे. तथापि या माहितीवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये दिलेले उत्तर आयोगास योग्य वाटते. या प्रकरणी अपिलार्थीची अशी अपेक्षा असल्याचे दिसून येते की, त्यांनी एकच माहिती दोन वेगवेगळया स्तरावरील अधिकाऱ्याने मागितली असता, या दोनही स्तरावरील अधिकाऱ्यांनी

स्वतंत्रपणे त्यांच्या स्तरावरुन माहिती द्यावयास हवी, तथापि अपिलार्थीच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी हा माहिती पुरविण्याचा केंद्रबिंदू असून त्यांनी कोणत्याही स्तरावरील अधिकाऱ्याकडे जरी माहिती मागितली असली तरी अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी मागणी केलेली माहिती ही प्रत्यक्षतः ज्या अधिकाऱ्यास जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले आहे, त्यांनीच ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन देणे अभिप्रेत आहे, हे लक्षात घेता, अपिलार्थीस एकच माहिती दोन वेगवेगळया स्तरावरुन स्वतंत्ररित्या, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय असणार नाही, हे लक्षात येईल.

प्रसंगावशात्, या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२०.२.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर अधिनियमातील कलम १९(६) प्रमाणे कार्यवाही न करुन, आपल्या कार्यशैलीतून कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे.संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजू ओंकार शेवरे,मु.पो.वडाळे-वडाळी, ता.चाळीसगाव जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडाळे-वडाळी, ता.चाळीसगाव जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगाव, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७४
निर्णय दिनांक २८-०१-२००९

१. श्री. अब्दुल मजीद मुसा शहा, : अपिलार्थी
रा. मालेगाव, जि.नाशिक

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वरिष्ठ लिपीक,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगाव, जि.नाशिक.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रशासनाधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगाव, जि.नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.३०.४.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे दि. ०८.०५.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांना अद्यापही आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा मागणी अर्ज बेकादेशीर व नियमाविरुध्द फेटाळला असून त्यावर कायदेशीर कारवाई करावे

तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही अथवा त्यावर कोणताही निर्णय व आदेश दिला नाही, त्यामुळे त्यांचे प्रथम अपील हे उघड-उघडपणे फेटाळले आहे, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्यावर देखील कारवाईचे आदेश व्हावेत, अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०६.०१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मालेगाव महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या २००४-०५ च्या लेखा परिक्षणासंदर्भात दि. १.४.२००५ ते ६.१.२००७ या कालावधीशी संबंधित एकूण १२ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपमुख्य लेखा परीक्षक,स्थानिक निधी लेखा,नाशिक व आयुक्त, महानगर पालिका मालेगाव यांचेशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले.तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.१.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १३.१.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. सुनावणीचे पत्र अपिलार्थीस किमान एक आठवडा अगोदर प्राप्त

होईल,असे जन अपिलीय अधिकारी यांनी पहावे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१३.०१.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर,झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अब्दुल मजीद मुसा शाह,रा. किल्ला झोपडपट्टी, रविवार वॉर्ड, घर नं.१२२,गली नं.४, मालेगाव जि.नाशिक-४२३ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी, मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७५
निर्णय दिनांक २८-०१-२००९

१. श्री. संतोष मांगू चौधरी, : अपिलार्थी
रा.सिडको, नाशिक

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रशासनाधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगाव, जि.नाशिक.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रशासनाधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगाव, जि.नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः वरिष्ठ लिपीक,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगाव, जि.नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.३०.४.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे दि. ०८.०५.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांच्या अपील अर्जावर निश्चितपणे कोणतीही कार्यवाही केली नाही व शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या दि. ६.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आदेश प्राप्त होऊनही प्रशासन अधिकाऱ्याने कोणतीही कार्यवाही न केल्याने, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.०१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी वेळोवेळी केलेल्या दहा अर्ज व महानगरपालिका,शिक्षण मंडळ,मालेगाव यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र. ७६२/२००५,दि.२.१२.२००५ संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "उपरोक्त संदर्भिय पत्रात आपण कार्यवाही करण्यात येत आहे. या बाबत लेखी उत्तर मला वरील तारखेस दिलेले आहे. आपल्या कार्यालयीन लेखी उत्तरास तेरा महिने पूर्ण झालेले आहेत. तरी आपली उपरोक्त कार्यवाही किती अवधीत पूर्ण होईल याबाबत मला माहिती मिळावी.
>
> ३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील
>
> प्रश्न १ :- मुख्याध्यापक वेतन श्रेणी मंजूरीनुसार मुख्याध्यापक वेतन फरक १९०७ रुपये मिळणेबाबत"
>
> प्रश्न २:- प्रश्न १ मुख्याध्यापक वेतन श्रेणी मंजूरीनुसार सेवानिवृत्त वेतन व त्याचा फरक मिळणेबाबत.
>
> प्रश्न ३:- उपदान फरक १९१९ रुपये मिळणेबाबत.
>
> वरील माहीती विषयातील प्रश्न १ ते ३ मधील शासकिय आर्थिक लाभ (हक्क) आज अखेर मला का मिळाला नाही ? तसेच मला वंचित का ठेवण्यात आले ? या बाबत आपल्या निर्णयाची माहीती मला मिळावी."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा अर्ज विहित प्रपत्रात नसल्याने, अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती

अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली असल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

उपलब्ध कागदपत्रांची छाननी केली असता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २२.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जास उत्तर देताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.२.२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीच्या दि. १४.१.२००७ रोजीच्या अर्जाचा संदर्भ दिला आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दि. १४.१.२००७ रोजी अशाप्रकारचा कोणताही अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नव्हता. जन माहिती अधिकारी यांना या विसंगतीबाबत पृच्छा केली असता, त्यांनी आयोगास असे सांगितले की, त्यावेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ७.२.२००७ रोजी कळविल्याप्रमाणे हा अर्ज, राज्य शासनाच्या, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.आर.टीआय.२००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ अनुसार विहित केलेल्या नमुन्यात नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केली आहे, ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दल त्यांना कारणे, खुलासे अथवा स्पष्टीकरणे विचारणे अभिप्रेत नाही. अधिनियमानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच

स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात विहित कालावधीत निर्णय घेण्याची तरतुद आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना विचारलेली ही माहिती, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने व ती (उपरोक्त कार्यवाही किती कालावधीत पूर्ण होईल?) जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नसल्याने, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अशा स्वरुपाची मागणी केलेली माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या वेतननिश्चितीचे प्रकरण त्यांना, त्यांच्याकडील अपूऱ्या कर्मचारीवृंदामुळे वेळेत पूर्ण करता आले नसल्याचे प्रतिपादित केले व अपिलार्थीचे प्रकरण एक महिन्यात मार्गी लावण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष मांगू चौधरी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, रा.एन-३२/एन-७/२१/६,उमाग्रज निवास,स्वामी विवेकानंदनगर,सिडको-३,नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,महानगरपालिका शिक्षण मंडळ,मालेगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी,महानगरपालिका शिक्षण मंडळ,मालेगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७६
निर्णय दिनांक २८-०१-२००९

१. श्री. दिनेश बाबुलाल माळी, : अपिलार्थी
मु.पो.अजंग, ता.जि.धुळे.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, अजंग,
ता.जि.धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, धुळे.

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: विस्तार अधिकारी (ग्राम पंचायत),
पंचायत समिती, धुळे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १६.५.२००५ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयास दि. २२.०५.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, तसेच त्यांनी यासंदर्भात अपील केले असता, त्यांना जन अपिलीय

अधिकारी यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.०६.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जुलै,२००५ ते जून, २००६ च्या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये विकास कामाचा तपशील, बांधकाम साहित्य खरेदी,प्राप्त निधी व खर्च बीलाची प्रत, मजूरांची मजूरी, वेतनाचा खर्च यांचेशी संबंधित व्हाऊचर व कागदपत्रांच्या प्रती, प्राप्त झालेल्या निधीचे पुरावे, बँक स्टेटमेंट, मासिक सभेच्या अथवा ग्रामसभेच्या प्रोसिडींग, ठरावाच्या नकलांच्या सत्यप्रती व कामाचे पूर्णत्त्वाच्या दाखल्यांच्या साक्षांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे अधिनियमाद्वारे विहित केलेल्यास मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही, मात्र या संदर्भात आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांना अपिलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भाने दि. २९.९.२००६ रोजी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्राची प्रत सादर केली. या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कोणत्याही क्रमांकाची नोंद नाही. त्यामुळे पत्र आयोग अवैध ठरवित आहे. याच वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थीने याच माहितीच्या मूळ अर्जावर रक्कम रु.१०/- ऐवजी रु.५/- इतक्या कोर्ट-फी-स्टॅम्प चिकटविला आहे. त्यावेळी त्यांनी अपिलार्थीस अजून एक रु.५/- एवढया किमतीचा अतिरिक्त कोर्ट-फी-स्टॅम्प या अर्जावर लावावा, असे अपिलार्थीस तोंडी विनंती केली होती. तथापि अपिलार्थी यांनी त्यांचे म्हणणे ऐकले नाही. अपिलार्थीने या नंतर माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. २८.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. अशाप्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीचा अर्ज दाखल केला, त्यावेळी त्यांनी अपिलार्थीच्या त्यांच्या मूळ अर्जावर रु.५/- इतक्या किमतीचा अतिरिक्त कोर्ट-फी-स्टॅम्प चिकटविण्याच्या तोंडी सूचना दिल्या होत्या. अपिलार्थीचा अर्ज ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ठेवला असता, अपिलार्थीच्या मूळ अर्ज विहित नमुन्यात न केल्याने तो फेटाळण्यात यावा, असे ठरविले होते. तथापि या सभेस अपिलार्थी स्वतः उपस्थित असल्याने, अपिलार्थीस तसे कळविण्याची गरज नाही, असे उपस्थित ग्रामस्थांनी मान्य केले होते. त्यामुळे अपिलार्थीशी त्यांनी यासंदर्भात तसा कोणताही पत्रव्यवहार केला नाही व या नंतर त्यांनी दि २९.९.२००६ रोजी अपिलार्थीस रु.६२६/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात माहितीपोटी भरण्याचे सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रांची छाननी करता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास रक्कम रु.१०/ ऐवजी ५/- इतक्या किमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प चिकटविल्यामुळे, त्यांचा मूळ अर्ज अवैध ठरत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ च्या संदर्भात त्यांनी मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्यासने ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित ५ मुद्यांवरील अंशतः माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही. ही माहित अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचकडे प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार कोणत्याही अर्जदारास प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती प्राप्त होणे अनुज्ञेय नाही. मात्र या पाचही मुद्यांवरील उर्वरित भागासंदर्भातील माहिती अपिलार्थीस देय ठरते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या कथित दि. २३.९.२००६ रोजीचे पत्र त्यावर त्यांच्या कार्यालयाचा जावक क्रमांक नसल्याने अवैध ठरत आहे.तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर दाखल केलेल्या अजंग ग्राम पंचायतीच्या प्रोसिडिंग बुक पाहता, त्यामध्ये जन माहिती अधिकारी

यांनी केलेल्या नोंदी संशयास्पद आहेत. कारण जन माहिती अधिकारी यांनी प्रोसिडींग बुकमध्ये दि.२९.६.२००७ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त लिहिलेले असून त्यापुढील सर्व पृष्ठे आजतागायत कोरे असल्याचे व दि.२९.६.२००७ नंतर झालेल्या सभांचे इतिवृत्त लिहिण्यासाठी स्वतंत्र रजिस्टर वापरल्याचे आयोगास आढळून आले आहे. थोडक्यात, जन माहिती अधिकारी यांनी बनावट कागदपत्रे तयार करुन आयोगाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने आता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, देय असलेली ही संपूर्ण माहिती अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.२/- या दराप्रमाणे त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी, तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर रक्कम रु.५/-चा कोर्ट-फी-स्टॅम्प कमी लावल्याने, अपिलार्थीस आकारण्यात येणाऱ्या माहितीच्या शुल्कामध्ये या रु.५/-इतक्या जादा किमतीचा समावेश करुन, अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन द्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी, धुळे जिल्हा परिषदेचे संबंधित कर्मचारी आयोगाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य त्या प्रकारे देऊ शकले नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना असे आदेशित करण्यात येते की, येथून पुढे, त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यास/अधिकाऱ्यास सुनावणीशी संबंधित प्रकरणाची पुरेशी माहिती आहे, अशा कार्यक्षम कर्मचाऱ्यांना इतःपर आयोगाच्या सुनावणीसाठी पाठवावे, अन्यथा यापुढे आयोगास आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहण्याचे आदेश द्यावे लागतील, या सूचनांची त्यांनी गांभीर्यपूर्वक नोंद घेऊन अशाप्रकारच्या अकार्यक्षम कर्मचाऱ्यांना ते आयोगासमोर सुनावणीसाठी पाठविणार नाहीत, याची त्यांनी दक्षता घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना असेही सूचित करण्यात येते की, त्यांनी अजंग, ग्राम पंचायतीच्या सर्व प्रोसिडींग बुकाची तपासणी करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये नमूद केल्यासप्रमाणे त्यांच्याकडून आवश्यक ते शुल्क प्राप्त करुन घेऊन, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत सशुल्क माहिती पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिनेश बाबूलाल माळी, (उपसरपंच) मु.पो.अजंग, ता.जि.धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत अजंग ता. जि. धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्राम पंचायत), पंचायत समिती, धुळे,जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७७
निर्णय दिनांक २८-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अनुप केशवदेव पुजारी,<br>रा. नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,<br>नाशिक | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कुलसचिव,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः सहायक संपादक,ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १७.११.२००६ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. २१.११.२००६ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांनी मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नसल्याने जन

माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती नाकारण्यात आली, तसेच माहिती अधिकार अधिनियमाचा उपयोग करुन त्यांनी माहिती मागितल्याबद्दल त्यांच्यावर विद्यापीठाने आरोपपत्र दाखल केले आहे. आपल्या या अभिप्रायासोबत त्यांनी आपल्या मूळ माहितीसाठीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. १६.०६.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कुलसचिव, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी कायद्याचे पालन न करुन चुकीच्या वेतनवाढीच्या प्रकरणासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, कुलसचिवांनी अनेक अधिकाऱ्यांच्या संवर्गात बदल केल्याचे, त्यांना पदोन्नती दिल्याचे नमूद केले असून अद्यापपावेतो विद्यापीठाच्या नियमांना मा. कुलपती यांच्याकडून मान्यता प्राप्त न झाल्याने ते सर्व आदेश अवैध ठरत असल्याचे नमूद केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेगवेगळया मुद्यावर प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत नसल्याचे कारण दर्शवून माहिती देण्याचे नाकारल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २.८.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.८.२००६ रोजी आपले निर्णय पारित करुन या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे विनापरवानगी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला

की, यशवंतराव  चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे व्यवस्थापन व प्रशासकीय  कारभार काही बाबतीत अधिनियमाद्वारे विहित  केलेल्या तरतुदीनुसार चालतो तर काही बाबतीत अद्यापही अशाप्रकारचे नियम अंतिम न झाल्याने ते राज्य शासनाच्या निर्देशानुसार व ज्या प्रकरणाशी संबंधित बाबींना कायद्याने मान्यता नाही,  अशा प्रकरणी 'महाराष्ट्र राज्य अकृषि विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी प्रमाणसंहिता' यातील तरतुदीनुसार ते निर्णय घेत असतात. अपिलार्थी हे स्वत: विद्यापीठामध्ये 'नियोजन अधिकारी' या पदावर कार्यरत आहेत. हे पद शिक्षकेतर कर्मचारी या प्रवर्गात मोडत असल्याने त्यांनी अपिलार्थीची वेतननिश्चितीची कार्यवाही व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने व शासनाच्या अनुमतीने केली असून अपिलार्थीस ही वेतननिश्चिती मान्य नाही, त्यामुळे ते विद्यापीठातील संबंधित अधिकाऱ्यांवर आयोगाकडील द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले अशाप्रकारचे आरोप करीत असतात.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारलेली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये विशद केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय मागणे, त्यांच्या एखाद्या निर्णयासंदर्भात त्यांच्याकडून खुलासा,कारणे मागणे, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. यामध्ये माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी अर्जातील माहितीचे स्वरुप तपासून अर्जदारास माहिती देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे, अशा प्रकारची सीमित प्रक्रिया अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांचे म्हणणे असे दिसून येते की, संबंधित कुलसचिव यांनी विद्यापिठामध्ये बेकायदेशीररित्या वेतनवाढी दिल्या आहेत, कर्मचाऱ्यांचे संवर्ग बदलले आहेत.अशाप्रकारची संवर्ग

बदलाची व वेतनवाढी देण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी निश्चित कोणत्या कायदेशीर तरतुदीद्वारे केली आहे, याची माहिती अपिलार्थीस आवश्यक असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने संदर्भित केलेल्या अशा प्रकरणाची हाताळणी कुलसचिव यांनी कशाप्रकारे केली आहे, याचे विवेचन जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये वरीलप्रमाणे केलेले आहे, तेव्हा या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास प्रतिसाद म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस महाराष्ट्र अकृषि विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी निश्चित केलेली प्रमाणसंहितेची प्रत दिली असती, तर अपिलार्थीचे काम होऊ शकले असते किंबहुना अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यास मदत झाली असती, असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी कुलसचिव यांनी विद्यापीठाने घेतलेल्या आस्थापनाविषयक निर्णयावर अपिलार्थीने साशंकता दर्शविली आहे. त्यामुळे अपिलार्थीस कुलसचिव यांच्या या प्रकरणातील निर्णयावर जर काही आक्षेप असतील तर, अथवा कुलसचिवांनी कोणत्या पार्श्वभूमीवर निर्णय घेतले आहेत, याची माहिती हवी असेल तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, या प्रकरणाशी संबंधित सर्व प्रकरणांच्या अभिलेख्यांची तपासणीची मागणी वेगळया अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यास अपिलार्थीस कुलसचिव यांनी घेतलेल्या निर्णयाची पार्श्वभूमी ज्ञात होईल, सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रांची, अभिलेख्यांची तपासणीची मागणी त्यांच्याकडे केल्यास त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस तपासणीसाठी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य त्वरित उपलब्ध करुन द्यावेत.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा वापर केल्याबद्दल त्यांच्यावर विद्यापीठाने आरोपपत्र बजावल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे, येथे असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थी हे भारतीय नागरिक आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ च्या तरतुदीनुसार त्यांना विद्यापीठाकडे

माहिती मागण्याचा हक्क आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ हा इतर सर्व कायद्यांना अधिक्रमित करीत आहे, या पार्श्वभूमीवर कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांनी अपिलार्थीने केवळ माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करुन विद्यापीठाकडे माहिती मागितली म्हणून त्यांच्यावर आरोपपत्र दाखल केले असेल तर, ते आरोपपत्र आयोग अवैध ठरवित आहे. केवळ अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमाचा वापर केला, ही एकच बाब त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यासाठी कारण म्हणून विद्यापीठास दर्शविता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनुप केशवराव पुजारी, नियोजन अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,नाशिक-४२२ २२२

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संपादक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,नाशिक-४२२ २२२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,नाशिक-४२२ २२२यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७८
निर्णय दिनांक २८-०१-२००९

१. श्री. विभोर दिलीप बारला, नाशिक. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक तथा सहायक विक्रीकर आयुक्त, विक्रीकर सहआयुक्त कार्यालय,नाशिक : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (प्रशा), नाशिक

त्रयस्थ पक्षः मे. हिमांशू प्रिंट ओ-पॅक

मे.श्री.इलेक्ट्रीकल अँड इंजिनिअरीग

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १५.१२.२००६ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयामध्ये दि. १५.०१.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मे. हिमांशू प्रिंट ओ.पॅक व मे.श्री. इलेक्ट्रीकल अँड इंजिनिअरीग या दोन लघुउद्योजकांसंदर्भात काही माहिती मागितली असता, ती

माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी नाकारले, त्यावर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. त्यांनी मागणी केलेली माहिती ही त्यांना व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यांनी मागणी केलेली माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या वाणिज्य क्षेत्रातील व्यवसायविषयक गुपिते किंवा स्पर्धात्मक स्थानास कोणतीही बाधा येत आहे, असेच त्रयस्थ पक्षाच्या वाणिज्यविषयक स्पर्धात्मक स्थानावर ती उघड केल्याने परिणाम होणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार राज्याच्या विधी मंडळात जी माहिती नाकारणे शक्य नाही, ती माहिती अर्जदारासही प्राप्त होणे हा त्यांचा हक्क आहे. त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेले माहितीसंदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने माहिती देऊ नये, असे कळविले होते. तथापि त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी विक्रीकराशी संबंधितच आहे आणि त्रयस्थ पक्षाने नमूद केलेल्या कथित न्यायप्रविष्ट प्रकरण हे विक्रीकर न्यायाधिकरणाकडे प्रलंबित नाही. आपल्या अशाप्रकारच्या विविध अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १८.०९.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील त्रयस्थ पक्ष मे. हिमांशू प्रिंट ओ-पॅक व मे.श्री.इलेक्ट्रीकल अँड इंजिनिअरीग संबंधी एकूण १५ मुद्यांद्वारे काही माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने या माहितीतील सुमारे अर्धा भाग जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात विचारला असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.१०.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम 8(d) व कलम 8(j) मधील तरतुदींनुसार माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे दि. ३०.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.१२.२००६ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम ठेवून अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारुन, त्यांचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्याया निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी अधिनियमातील कलम 8(d) व कलम 8(j) मधील तरतुदींनुसार माहिती देण्याचे नाकारले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास व प्रथम अपील अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष मे. हिमांशू प्रिंट ओ-पॅक व मे.श्री.इलेक्ट्रीकल अँड इंजिनिअरीग या दोन युनिटस् संदर्भात त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. (i) शी संबंधित माहिती वगळता, उर्वरित माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देय ठरत आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाने त्यांच्याकडे सादर केलेल्या विवरणपत्राची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या मते या विवरणपत्रामध्ये त्रयस्थ पक्षाच्या वार्षिक उलाढालीच्या, त्यांच्या करदेयतेचा समावेश होता, ही माहिती त्रयस्थ पक्षाने त्यांना एका विशिष्ट विश्वासाने दिलेली असते. ही माहिती उघड केल्यास विक्रीकर विभाग व त्रयस्थ पक्ष यांच्यातील विश्वासार्हतेला तडा जाऊ शकतो. जन माहिती अधिकारी यांची या मुद्यावर विचार केला असता, जरी त्रयस्थ पक्षाने विक्रीकर विभागाकडे एका विशिष्ट विश्वासाने विवरणपत्राद्वारे काही माहिती सादर केली असली तरी, ही माहिती विक्रीकर विभागास सादर करणे हे त्रयस्थ पक्षास कायद्याच्या

तरतुदीनुसार अनिवार्य आहे, ही बाब येथे लक्षात घ्यावी लागेल. हा विश्वासार्हतेचा मुद्दा वादाच्या प्रयोजनार्थ जरी बाजू ठेवला तरी अधिनियमातील कलम 8(j) मधील तरतुदींनुसार ही माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप केला असे होईल, असे आयोगास वाटते, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. (i) शी संबंधित माहिती, जी उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत हस्तक्षेप होऊ शकतो, अशी माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. (i) शी संबंधित माहिती वगळता उर्वरित मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत. संबंधितांस जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत आयोगाकडील सुनावणीस उपस्थित राहण्याबाबतचे पत्र तामील करण्यात आले होते. त्रयस्थ पक्ष गैरहजर असल्याने त्यांना या प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे मांडावयाचे नाही, असे अनुमान काढून सुनावणी घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीवरुन अपिलार्थी व मे. हिमांशू प्रिंट ओ-पॅक यांच्यामध्ये न्यायालयात वाद चालू आहे, असे दिसून येते, त्यावरुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उघड केल्याने, व्यापक जनहित साध्य होऊ शकेल, असे आयोगास वाटत नाही.म्हणून मुद्दा क्र. मुद्दा क्र. (i) शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय असणार नाही. अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कोणतीही कारणे अपिलार्थीस देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात

येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. (i) शी संबंधित माहिती वगळता उर्वरित मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विभोर दिलीप बारला, १५, मुक्ती, ९ समर्थनगर, नाशिक-४२२ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक तथा सहायक विक्रीकर आयुक्त,विक्रीकर सहआयुक्त कार्यालय,नाशिक जि. धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन),विक्रीकर सहआयुक्त कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८०

निर्णय दिनांक २९-०१-२००९

१ श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ, अपिलार्थी

७३६, अन्सार रोड, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा

नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग,

नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्रीमती संजिदा बी शेख ईस्माईल

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०६-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व चुकीची असल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे केले आहे. याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे रावेर तालुका ऊर्दू एज्युकेशन सोसायटी संचलीत ऊर्दू गर्ल्स हायस्कूल रावेर या शाळेतील शिक्षकांच्या सेवासंदर्भात सन १९९५ ते अर्ज करण्यापर्यंतच्या कालावधीतील माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या शाळेत सध्या कार्यरत असलेल्या शिक्षकांची सन १९९७ पासूनची सूची, शिक्षकाची सेवाजेष्ठता यादी, शाळेतील उपशिक्षिका संजिदा बी शेख इस्माईल यांच्या तक्रारीनुसार दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या पत्रावर अध्यक्ष रावेर तालुका ऊर्दू एज्यु. सोसायटी यांनी दिलेल्या खुलाशाच्या प्रती व मायनॉरिटी सेल महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघ यांच्याकडील दिनांक ०८-११-२००६ रोजीच्या पत्रावर त्यांच्या कार्यालयाकडून करण्यात आलेली कारवाई - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत संस्थेकडून उपलब्ध करुन घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले व या पत्राची प्रत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांना देण्यात आली. यानंतर परत दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधीत माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कोणतीही कारवाई केली नाही, मात्र यासंदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून संस्था चालकांची नेमणूक केली असल्याने त्यांच्या कडून माहिती घेण्याचे सूचविले आहे. यानंतर परत दिनांक २७-०३-२००७ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत माहिती देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपरोक्त माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली नाही. त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती त्या त्रयस्थ

पक्षाचे मोठ्या प्रमाणात नुकसान व हानी झाली आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी दिनांक २४-०१-२००७ व दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविली आहे. यासंदर्भातील पुरावा आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला असता सदर पुरावा जन माहिती अधिकारी, आयोगासमोर, आयोगाने नोटीशीमध्ये सूचना देऊनही सादर करु शकले नाहीत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०१-२००९ रोजी माहिती पुरविल्याचे विधान, आयोग ग्राह्य धरत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नव्याने रुजू झाले असल्याने पूर्वीचे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी का घेतली नाही याचे स्पष्टीकरण ते आता देऊ शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांची पाहणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींशी सुसंगत होती, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात कारवाई करणे हे जन माहिती अधिकारी यांचे प्रथम कर्तव्य होते. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये म्हणजे दिनांक १९-०१-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला असला तरी या प्रतिसादाव्दारे त्यांनी अपिलार्थीस कोणतीच माहिती दिली नाही, मात्र अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्थेकडून घेण्यासाठी त्यांनी सूचित केले. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या चारही मुद्दयावरील माहिती प्रचलीत कार्यपध्दती पाहता जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असणे अपेक्षित आहे. कारण जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रा-मधील शाळेमधील शिक्षकाच्या नेमणूका, त्यांच्या सेवाजेष्ठता यादी या शिक्षण अधिका-याच्या मान्यतेनंतरच अंतीम होत असतात. त्यामुळे यामध्ये वरील माहिती घेण्यासाठी अपिलार्थीस संस्थेकडे जाण्याचे सूचित करणे ही जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ मध्ये संदर्भित केलेली दोनही पत्रे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेली असल्यामुळे या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी कोणती कारवाई केली हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडेच ही माहिती उपलब्ध

असणे अनिवार्य आहे. एवढे असूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०१-२००७ रोजी दिलेली माहिती अपूर्ण ठरते. कारण या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधीत माहिती दिली असल्याचे दर्शविले असले तरीही या पत्रामध्ये त्यांनी मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत दिलेली माहिती चुकीची आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मायनॉरिटी सेलने त्यांच्याकडे दिनांक ०८-११-२००६ रोजी केलेल्या तक्रारीवरील त्यांनी केलेल्या कारवाईची माहिती मागविली होती, मात्र अपिलार्थीस या मुद्दयावरील दिलेल्या माहितीमध्ये या पत्राच्या संदर्भात त्यांनी मायनॉरिटी सेल संदर्भात काहीही माहिती दिल्याचे आढळून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती अपूर्ण व चुकीची ठरत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या अर्धवट व चुकीच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले नाहीत, मात्र त्यांनी अपिलार्थीस परत संबंधीत संस्थाचालकाकडून माहिती घेण्यासाठी सूचित केले. गेल्या दोन वर्षात राज्य माहिती आयोगास असा अनुभव आहे की, शिक्षण खात्यातील एखादा दुसरा अपवाद वगळता सुनावणी घेऊन कोणत्याही जन अपिलीय अधिका-याने अपिलार्थीस आपले स्पष्ट आदेश दिले नाहीत तर प्रत्येक वेळी जरी अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधीत असली तरीही, अशा प्रकारची माहिती, शिक्षण खात्याचे अधिकारी प्रत्येक अपिलार्थीस संबंधीत संस्थेकडून माहिती घेण्याचे सूचित करतात. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निष्क्रीय वृत्तीची नोंद सचिव (शालेय शिक्षण) यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व यासंदर्भात त्यांनी त्यांच्या विभागातील शिक्षण अधिका-यांना व शिक्षण संचालनालयातील सर्व अधिका-यांना विशिष्ट मार्गदर्शनपर एखादे परिपत्रक निर्गमित केल्यास शिक्षण खात्याच्या क्षेत्रीय कार्यालयांना माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी अधिक परिणामकारक-रित्या करता येईल, असे आयोगास वाटते.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीबाबत मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याची नोंद आहे. आज रोजी अपिलार्थीने मायनॉरिटी सेलने दिनांक ०८-११-२००६ रोजी

केलेल्या अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत केली. या सर्व मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत देण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीस सदर माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती खुलाशाच्या स्वरुपात न देता मुद्दा क्रमांक ३ व ४ मध्ये अपिलार्थीने संदर्भित केलेल्या पत्रावर त्यांच्या कार्यालयाने केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस चुकीची व अपूर्ण माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांनी उपरोक्त प्रकरणी केलेल्या वर्तनामुळे ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाहीस पात्र ठरत आहेत. सबब, सचिव (शालेय शिक्षण) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत वाचनीय स्वरुपात व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ, अध्यक्ष मायनॉरिटी सेल, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघ, फेडरेशन, ७३६, अन्सार रोड, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८१

निर्णय दिनांक २९-०१-२००९

१ श्री. शेख निसार अहमद शेरमहंमद तांबोळी, अपिलार्थी
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, धुळे, तालुका जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धुळे,
तालुका जिल्हा धुळे

त्रयस्थ पक्ष : १. श्री. वकील अहमद लाल अहमद
२. श्री. शकील अहमद लाल अहमद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १३-०६-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०३-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेश दिल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना

अपेक्षित माहिती दिली नाही. त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील दस्तऐवज जपून ठेवणे हे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक आहे. संबंधीत दस्तऐवज जर जन माहिती अधिका-याने नष्ट केले असेल तर त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करणे त्यांना क्रमप्राप्त आहे, त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावावी व त्यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश व्हावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. वकील अहमद लाल अहमद यांच्या २०००-२००१, २००१-२००२ व २००२-२००३ या कालावधीतील उत्पन्नाच्या दाखल्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती, श्री. शकील अहमद लाल अहमद व श्री. वकील अहमद लाल अहमद यांना पिवळे रेशनकार्ड कोणत्या तारखेस देण्यात आले, कार्ड क्रमांक, रेशनकार्ड संलग्नीत असलेल्या दुकानाचे नांव व पत्ता व ज्या तारखेला संबंधीत पिवळे कार्ड इतर वर्गात मोडण्यात आले त्याचा दिनांक व नवीन कार्ड क्रमांक ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. तदनंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १६-०३-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. मात्र तदनंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी ठेवल्यानंतर त्यांना अपिलार्थीच्या अर्जाविषयी प्रथम माहिती झाली अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी दोन वेगवेगळे जन माहिती अधिकारी नियुक्त केले आहेत. त्यापैकी एक म्हणजे नायब तहसीलदार (पुरवठा), धुळे व दुसरे निवासी नायब तहसीलदार, धुळे हे होत. निवासी नायब तहसीलदार

उत्पन्नाच्या दाखल्यासंदर्भात तर नायब तहसीलदार (पुरवठा) हे धान्य पुरवठा संदर्भातील प्रकरणी हजर असतात. अपिलार्थीने श्री. वकील अहमद लाल अहमद व श्री. शकील अहमद लाल अहमद यांच्या उत्पन्नाच्या दाखल्यासंदर्भातील मागणी केलेली माहिती आढळ होत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक ०४-१२-२००६ रोजी त्रयस्थ पक्षाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्रयस्थ पक्षाच्या उत्पन्नाच्या दाखल्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती व त्यांच्या रेशनकार्डासंदर्भातील काही माहिती अपिलार्थीने दुस-या जन माहिती अधिका-याकडे अपेक्षिलेली दिसते. तथापि सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नसल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले आहे. या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०४-१२-२००६ रोजीचा अर्ज दाखल केल्याचा कोणताही पुरावा व्दितीय अपिलासोबत जोडलेला नसल्याने, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचा, अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचा त्यांचा, युक्तिवाद ग्राह्य धरण्यात येत आहे.

अपिलार्थीने दिनांक ०४-१२-२००६ रोजी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीने दिनांक ०८-०२-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दिलेल्या दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या आदेशानंतर अपिलार्थीस संबंधीत दोनही जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०३-२००७ रोजी व दिनांक २९-०३-२००७ रोजी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. माहिती देण्यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील रेशनकार्डाच्या मुद्दयावरील माहिती प्राप्त झाल्या-चे दिसून येते, मात्र त्रयस्थ पक्षाने त्यांच्या उत्पन्नाच्या दाखल्यासंदर्भात अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे शासकीय अभिलेख्याच्या "ड" वर्गात मोडत असल्याचे आयोगास सांगितले. अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे जर "ड" प्रवर्गात असतील तर यासंदर्भातील कोणते शासकीय आदेश आहेत किंवा कसे व ही कागदपत्रे जतन करण्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर ती कागदपत्रे नष्ट केल्याचा काही पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहे काय याची विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांचे

आयोगास नकारार्थी उत्तर होते, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे जर ही शासकीय अभिलेख्याच्या "ड" प्रवर्गाची असतील तर ती नष्ट केल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावा लागेल, अन्यथा ही कागदपत्रे जतन करण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर / अधिका-यावर होती, त्यांच्यावर तहसीलदार, धुळे यांना फौजदारी अथवा प्रशासकीय कारवाई करावी लागेल. या पार्श्वभूमीवर संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांचा त्यांनी आपल्या कार्यालयाच्या अभिलेख्यात कसोशीने शोध घ्यावा व जर ही कागदपत्रे नष्ट केली असतील तर त्यासंबंधीचा पुरावा अपिलार्थीस पाठवावा. अन्यथा संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्यावर आवश्यक ती प्रशासकीय अथवा इतर कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख निसार अहमद शेरमहंमद तांबोळी, ३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, धुळे तालुका जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धुळे, तालुका जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८२

निर्णय दिनांक २९-०१-२००९

१ श्री. बन्सीलाल रतनलालजी लोढा, अपिलार्थी
१५२५/१, गल्ली नं. ४, ओढेकर टी डेपो समोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
धुळे महानगरपालिका,
धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा आयुक्त, धुळे महानगरपालिका,
धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या तब्बेतीच्या कारणास्तव त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेत असल्याचे पत्र आयोगास पाठविले आहे.

खुद्द अपिलार्थीने आता त्यांच्या दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांचे अपील मागे घेतले असल्यामुळे त्यांच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगाला दिसत नाही. सबब त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील खारीज करण्यात येत असून खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२८२/२००७, दिनांक २८-०६-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बन्सीलाल रतनलालजी लोढा, गल्ली नं. ४, १५२५/१, ओढेकर टी डेपो समोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी, धुळे महानगरपालिका, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८३

निर्णय दिनांक २९-०१-२००९

१ श्री. प्रकाश मुरलीधर बागल, अपिलार्थी
मु. पो. निमगुळ, तालुका शिंदखेडा,
जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, धडगांव,
तालुका धडगांव, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा,
जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथम अपील सुनावणीसंदर्भात निर्णय प्राप्त झाल्याचे नमूद केले असून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी

यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण पाच रस्त्यांच्या कामांची माहिती मागविली होती. सदर माहितीशी संबंधीत कालावधी सन २००६-२००७ हा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाच्या अंदाजपत्रकाच्या झेरॉक्स प्रती, पुलाच्या कामाच्या झेरॉक्स प्रती, एम. बी. च्या झेरॉक्स प्रती, अलाईन टेस्ट रिपोर्ट, अलाइनमेंट प्लॅन सक्षम अधिका-याने पास केलेला, मिक्स डिझाईन, पुलाच्या बांधकामाची सद्यस्थिती व बांधकाम चालू असतांना पूल कसा पडला - या मुद्दयांचा समावेश होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत बी. पी. एल. प्रमाणपत्र ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा म्हणून जोडण्याचे अपिलार्थीच्या लक्षात आणून दिले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०५-२००७ रोजी आपला निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांना दिनांक २१-०५-२००७ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जासोबत ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्यासंदर्भात कोणताही पुरावा जोडला नव्हता, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०३-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सदर पुराव्याची मागणी केली आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा पुरावा दिनांक २२-०३-२००७ रोजी सादर केला. त्यांनी मागणी केलेली माहिती पुरावा देऊनही का दिली नाही असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, याबाबत अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याची कारणे स्पष्ट करतांना जन माहिती अधिकारी यांनी

आयोगास असे स्पष्टीकरण दिले की, अपिलार्थीने मार्च महिन्यामध्ये माहितीची मागणी केली होती. मार्च महिन्यामध्ये अर्थसंकल्पीय कामे प्रगतीपथावर असल्याने व कामाची गडबड असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लागला. अपिलार्थीने माहिती मागण्याच्या वेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर होते, तथापि तदनंतर त्यांना शासकीय सेवेतून दिनांक १८-०५-२००७ रोजी निलंबीत करण्यात आले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती इतकी मोठ्या प्रमाणात होती की, जी देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार होती अशी कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या फक्त झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी चालू स्थितीत बांधकाम चालू असतांना पूल कसा पडला, या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षिले असल्याचे दिसून येते, जे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आली आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली, अर्जदारास त्यांनी ही माहिती त्यांच्याकडे ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथमतः निर्णय घेणे व एकदा निर्णय झाल्यानंतर अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील प्रक्रिया पार पाडणे एवढीच मर्यादित प्रक्रिया या अधिनियमामधील माहिती देणे या प्रक्रीयमध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे अपिलार्थीस बांधकाम चालू असतांना पूल कसा पडला, या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही, मात्र उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय राहील. या प्रकरणी अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०३-२००७ रोजी सादर केला आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २२-०३-२००७ रोजी प्रथमतः प्राप्त झाला असे मानण्यात येत आहे. दिनांक २२-०३-२००७ रोजी अर्ज प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ही माहिती

अपिलार्थीस दिनांक २१-०४-२००७ रोजी अगर तत्पूर्वी देय ठरते, तथापि आजतागायत अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना देखील जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २१-०५-२००७ पर्यंत पूर्ण माहिती देण्याचे आदेशित केले होते, तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशास देखील कोणतीही दाद न देता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून त्यांना कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये वर स्पष्ट केली आहेत. जन माहिती अधिकारी यांची ही कारणे, म्हणजे मार्च महिन्यातील कामाची घाई, रोजगार हमी योजनेची कामे या कार्यबाहुल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही, असे नमूद केले आहे. या टप्प्यावर सर्व संबंधितांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, **माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करणे हा सार्वजनिक प्राधिकरणातील सर्व कर्मचा-यांच्या नियमित सेवेचा अविभाज्य भाग असून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कोणत्याही अर्जदाराने त्यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कारवाई करणे त्यांना अनिवार्य आहे.** त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाची कारणे आयोग अमान्य करीत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी हे आयोगास, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याबरोबर तयार करुन आणल्याचे सांगत आहेत. आता जन माहिती अधिकारी यांनी जरी माहिती तयार केली असली तरी मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी ज्या कालमर्यादेवर आधारित आहेत किंबहुना अर्जदारास माहिती देण्यासाठी अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी हा माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ पाया आहे, त्यास त्यांनी छेद दिला आहे असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद तर दिला नाहीच परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे देखील त्यांनी उघडपणे उल्लंघन केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत.

जन माहिती अधिकारी हे त्यांच्या पदावर कार्यरत असतांना दिनांक १८-०५-२००७ पासून निलंबीत झाले आहेत. अपिलार्थीस शास्ती लावण्याची मर्यादा, प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे, एकूण २५००० रुपयापर्यंत आहे हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी देय तारीख दिनांक २१-०४-२००७ पासून पुढे १०० दिवस जे अधिकारी जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते असे सर्व अधिकारी अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असे अवगत केले आहे की, ते या प्रकरणाशी संबंधीत प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून दिनांक २१-०४-२००७ ते १८-०५-२००७ या कालावधीत कार्यरत होते, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी २७ दिवसांचा विलंब लावला आहे. त्यांच्यानंतरचे श्री. जे. बी. पावरा, उप अभियंता (सध्या नवापूर राष्ट्रीय महामार्ग येथे कार्यरत) हे दिनांक १८-०५-२००७ ते ०६-०६-२००७ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते, त्यांनी १९ दिवसांचा विलंब लावल्याचे व श्री. डी. वाय. पाटील (सध्या धडगांव क्रमांक १ येथे कार्यरत) हे दिनांक ०६-०६-२००७ ते १७-०६-२००८ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते, त्यांनी ५४ दिवसांचा विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे उपस्थित जन माहिती अधिकारी श्री. सोनवणे यांना प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे २७ दिवसाकरिता एकूण ६७५० रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी श्री. जे. बी. पावरा व श्री. डी. वाय. पाटील हे उपस्थित नाहीत, त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीने त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अनुक्रमे १९ व ५४ दिवसांचा विलंब लावल्याबद्दल अनुक्रमे रुपये ४७५० व रुपये १३५०० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

या शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीचा संबंधित जन माहिती अधिकारी शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा करतील, असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांनी पहावे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना वरील निर्णयामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, वरील निर्णयामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. श्री. डी. एच. सोनवणे, तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या २७ दिवसांच्या विलंबासाठी त्यांना रुपये ६७५० (अक्षरी रुपये सहा हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

४. श्री. जे. बी. पावरा, तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण १९ दिवसांसाठी रुपये ४७५० (अक्षरी रुपये चार हजार सातशे पन्नास) इतक्या रकमेची शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

५. श्री. डी. वाय. पाटील, तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण ५४ दिवसांसाठी रुपये १३५०० (अक्षरी रुपये तेरा हजार पाचशे) इतक्या रकमेची शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रकाश मुरलीधर बागल, मु. पो. निमगुळ, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, धडगांव, तालुका धडगांव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. डी. एच. सोनवणे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, धडगांव, तालुका धडगांव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार)

५ श्री. जे. बी. पावरा, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, धडगांव, तालुका धडगांव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार)

६ श्री. डी. वाय. पाटील, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, धडगांव, तालुका धडगांव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार)

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८४

निर्णय दिनांक २९-०१-२००९

१ श्री. अशोक गुलाब इंगावले, अपिलार्थी
गणपती मंदीराच्या समोर, राऊळवाडी,
चितोड रोड, धुळे, जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ६,
धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा पोलीस उपमहानिरीक्षक,
राज्य राखीव पोलीस बल, नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ६, धुळे |
| | जन अपिलीय अधिकारी | : | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ६, धुळे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील एका मुद्दयासंदर्भात माहिती पुरविली होती, तथापि दुस-या मुद्दयासंदर्भात माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार टिपणीची सत्यप्रत पुरविता येणार नाही असे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यांच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी काही कागदपत्रे जोडली नसल्याचे कारण सांगून त्यांचा अपील अर्ज त्यांना परत केला व तदनंतर दिनाक ०५-०६-२००७ रोजीच्या पत्रानुसार या प्रकरणी प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ६, धुळे यांच्याकडे अपिलार्थीस अपील करण्याचे सुचविले. त्यांनी प्रथम अपील अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर यांच्याकडे सादर केला होता, व तीच त्यांची कृती योग्य होती. पोलीस उप महानिरीक्षकांनी आता त्यांनी ज्या अधिका-याकडे माहिती मागितली होती त्यांच्याकडे अपील करण्याचे सांगून अपिलार्थीची दिशाभूल केली. या अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, उर्वरित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देण्याचे आयोगाने आदेशित करावे व जन माहिती अधिकारी यांच्यावर उचित दंडनीय कारवाई करुन अपील प्राधिकरणाविरुध्द शासनाकडे अहवाल सादर करावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३ ते दिनांक १२-०३-२००७ या कालावधीशी संबंधीत एकूण दोन मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक ०९-०९-२००३ रोजी दिलेल्या पत्राची सत्यप्रत व या पत्रावर त्यांनी दिनांक २७-०९-२००३ रोजी सादर केलेल्या निवेदनावर तत्कालीन अधिका-यांनी केलेल्या सूचना व त्यानुसार या प्रकरणी देण्यात आलेल्या निर्णयाच्या संबंधात वेळोवेळी काढलेल्या टिपण्या यांच्या सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती दिली व मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अपिलार्थीस असे कळविले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नियमानुसार टिपणीची सत्यप्रत त्यांना पुरविता येणार नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०४-२००७ रोजीचे प्रथम अपील दिनांक १४-०५-२००७ रोजी

सादर केले. अपिलार्थीने सदर अपील पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल यांना उद्देशून केले होते. पोलीस उप महानिरीक्षक राज्य राखीव पोलीस बल, नागपूर यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाल्यानंतर अपिलार्थीशी पत्रव्यवहार करुन शेवटी अपिलार्थीस प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी तथा समादेशक, धुळे यांच्याकडे करण्याचे त्यांच्याकडील दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये सुचविले. तथापि अपिलार्थीने, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ६, धुळे ज्यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले त्यांच्याकडे अपील न करता, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००७ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचे म्हणणे आयोगास लेखी स्वरुपात सादर केले असून, त्यामध्ये त्यांनी असा लेखी युक्तिवाद केला आहे की, त्यांनी माहितीसाठी मागणी केलेल्या अर्जातील टिपणीची प्रत मागितली होती ती विधानसभेस देता येणारी माहिती असल्याने त्यांना पुरविणे आवश्यक होते, तथापि त्यांना टिपणीची प्रत उपलब्ध न करुन दिल्यामुळे त्यांच्यावर घोर अन्याय झाला आहे त्यामुळे माहिती पुरविणारे मा. श्री. जानरावसाहेब, समादेशक यांना शास्ती लादावी व त्यांना मुद्दा क्रमांक २ ची माहिती विनामूल्य देण्याचे आदेश व्हावेत तसेच यासंदर्भात त्यांना दुसरे तिसरे अपील करण्याचा प्रसंग आल्याने त्यांना लागलेला खर्च रुपये १००० इतकी नुकसानभरपाई म्हणून मंजूर करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांच्या विभागात पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होते. ते अंदाजे १५ ते १६ वर्षे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होते, तथापि त्यांना नंतर सेवेतून बडतर्फ करण्यात आले. अपिलार्थी हे, त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही, ते ती माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही व्यक्तिशः उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली मुद्दा क्रमाक २ शी संबंधीत माहिती त्यांच्या अज्ञानामुळे ती अपिलार्थीस दिली गेली नाही. ती माहिती अपिलार्थीपासून दडवून ठेवण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नव्हता. आयोगाने आदेश दिल्यास ही माहिती ते अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने ज्या वेळी टिपणीची माहिती मागितली त्यावेळी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास टिपणीच्या मुद्दयाची प्रत देय असू शकत नाही अशा अर्थाचा विषय वेळोवेळी वर्तमानपत्रातून चर्चिला गेला असल्याने अपिलार्थीस टिपणीची प्रत देता येत नाही अशी त्यांची भावना झाली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून ज्या

अधिका-याची म्हणजे समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, धुळे यांची नेमणूक केली आहे, अशा प्राधिकरणाकडे प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे सरळ व्दितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी मूळात समादेशक यांच्याकडे माहिती मागितली असल्याने ते अपिलीय अधिकारी ठरत नाहीत व त्यांचे वरिष्ठ, पोलीस उपमहानिरीक्षक हे अपिलीय अधिकारी ठरतात. अपिलार्थीच्या या धारणेमुळे त्यांनी पोलीस उप महानिरीक्षक यांच्याकडे माहितीसाठीच्या अर्जाकरिताचे प्रथम अपील केल्याचे दिसून येते. केवळ अपिलार्थीने पोलीस उप महानिरीक्षक यांच्याकडे अपील केल्यामुळे पोलीस उपमहानिरीक्षक हे या प्रकरणातील जन अपिलीय अधिकारी होत नाहीत. अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने विशिष्ट जन माहिती अधिकारी व विशिष्ट जन अपिलीय अधिकारी यांच्या माहिती देण्यासाठी व त्यावरील अपिलावर निर्णय देण्यासाठी नेमणूका करणे त्यांना अनिवार्य आहे. विचाराधीन प्रकरणी समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ६, धुळे यांची अर्जदाराच्या प्रथम अपिलावर निर्णय देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस जर राज्य राखीव पोलीस बलासंदर्भात काही माहिती हवी असेल तर त्यांनी याच जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे प्रथम अर्ज व अपील करणे भाग आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही समादेशकाच्या कार्यालयीन स्तरावर होती, यासाठी समादेशक सहाय्यक हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले होते. अपिलार्थीने पोलीस उप महानिरीक्षक हे जन अपिलीय अधिकारी आहेत या स्वतःच्या धारणेवर त्यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि अपिलार्थीची ही धारणा वर स्पष्ट केल्याप्रमाणे चुकीची आहे त्यामुळे अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील या प्रकरणी पोलीस उप महानिरीक्षक यांच्याकडे न पाठविता ते राज्य राखीव पोलीस बल यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांनी केली नाही व त्याचा परिणाम म्हणजे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पूर्णरित्या त्यांना आजपावेतो प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीने टिपणीची प्रत मागितली आहे. त्याचे अवलोकन करता ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे "माहिती" या शब्दाच्या व्याख्येमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली कोणत्याही स्वरुपातील माहिती असा अर्थ असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेखे, दस्तऐवज, ज्ञापने, सूचना, अभिप्राय इत्यादीचा समावेश होतो. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ ची माहिती अपिलार्थीस देय ठरत आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती सशुल्क देण्याची

विहित मुदत व्यपगत झाली असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना आता विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जात मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये समादेशक श्री. जानराव यांना शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि उपरोक्त प्रकरणी समादेशक श्री. जानराव हे मूळात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त झाले आहेत, केवळ अपिलार्थीने त्यांच्याकडे माहिती मागितली म्हणून ते जन माहिती अधिकारी सिध्द होत नाहीत, या पदाकरिता सक्षम प्राधिकरणाने अधिनियमातील कलम ५ च्या तरतुदीनुसार समादेशक सहाय्यक यांची जन माहिती अधिकारी अशी विशिष्ट नेमणूक केली आहे. तसेच अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत संबंधितांनी प्रथम प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस एका मुद्दयावरील माहिती केवळ अज्ञानामुळे, वर्तमानपत्रातील या विषयावरील त्यावेळी चालू असलेल्या वादामुळे त्यांनी "टिपणी" ही माहिती अपिलार्थीस न देण्याचा मार्ग पत्कारला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे अथवा अपिलार्थीपासून कोणत्याही असद्हेतुने माहिती दडविल्याचे या प्रकरणी संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्पयावर निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होण्याचे आदेश नाहीत, मात्र पोलीस उप महानिरीक्षक यांनी अपिलार्थीस पत्र पाठवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपेक्षित व सकारात्मक कारवाई केली नाही हे पोलीस उप महानिरीक्षक, नागपूर यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे व पोलीस उप महानिरीक्षक यांना असे प्रकार टाळण्याची सूचना देण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने रुपये १००० इतकी नुकसानभरपाई मागितली आहे, तथापि या रकमेचा आवश्यक तो तपशील त्यांनी आयोगाकडे सादर न केल्याने अपिलार्थीस नुकसानभरपाई देण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक | २९-०१-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. अशोक गुलाब इंगावले, गणपती मंदीराच्या समोर, राऊळवाडी, चितोड रोड, धुळे, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ६, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ६, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८५

निर्णय दिनांक २९-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. चौधरी नरेंद्र बारकू,<br>दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा<br>प्रताप चौक, मनपासमोर, धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जात<br>प्रमाणपत्र पडताळणी समिती नाशिक विभाग, नाशिक<br>आयुक्तालय परिसर, नाशिक रोड, नाशिक | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा संचालक समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र<br>राज्य, चर्च रोड, पुणे - ०१ | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सदस्य सचिव विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नाशिक विभाग, नाशिक |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अपर आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २१-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अधिनियमानुसार माहितीसाठी कोणतेही कारण देण्याची आवश्यकता नसतांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी जनहित स्पष्ट होत नसल्याचे कारण देऊन त्यांना माहिती देण्याचे नाकारले असल्याचे नमूद केले आहे. त्याचबरोबर त्यांनी या अर्जामध्ये त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याने त्यांना अधिनियमातील कलम २० (१) नुसार शास्ती लावण्याची व त्यांच्यावर शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडे जात प्रमाणपत्र पडताळणी प्रस्तावाबाबत दिनांक ०१-०१-२००१ ते ३१-१२-२००६ या कालावधीशी संबंधीत माहिती एकूण पाच मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे किती जात पडताळणी प्रस्ताव प्राप्त झाले त्यांची संख्या, संबंधीत कर्मचा-यांचे नांव, कर्मचारी नोकरी करीत असलेल्या शासकीय, निमशासकीय कार्यालयाचे नांव, जिल्हा, प्रस्ताव प्राप्त झाल्याचा आवक क्रमांक व दिनांक, अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इत्यादी संदर्भात प्राप्त झालेल्या नोकरी विषयक जात पडताळणी प्रस्तावाची जाती निहाय माहिती, जात वैधता प्रमाणपत्र दिलेल्या कर्मचा-याचे नांव, संख्या, कार्यालयाचे नांव, जातीचा संवर्ग, वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक ३१-१२-२००६ अखेर धुळे, नंदुरबार व नाशिक या जिल्ह्यातील प्रलंबीत असलेल्या नोकरीविषयक प्रस्तावांची जातीनिहाय संख्या, कर्मचा-याचे नांव, कार्यालयाचे नांव व जातीचा संवर्ग - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, "आपल्या अर्जामधून जनहित स्पष्ट होत नाही. तसेच समितीने शासकीय नियमशासकीय प्रस्तावासंदर्भात जाती संवर्गानुसार नोंदी ठेवलेल्या नसल्यामुळे आपण मागितलेली माहिती उपलब्ध करता येत नाही" असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०९-२००७ रोजी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २७-०९-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. सदर आदेश अपिलार्थीस प्राप्त

होण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे जातीनिहाय ठेवली जात नसल्याचे आयोगास अवगत केले, तथापि अपिलार्थीस जातीनिहाय माहिती सोडून, उर्वरित माहिती ते अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत देऊ शकतील असे आयोगास स्पष्ट केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः त्यांच्याकडील अर्जाव्दारे पाच मुद्दयावर माहिती मागविली आहे, तथापि त्यातील मुद्दा क्रमांक ३ व ५ याव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जातीनिहाय माहिती मागितली आहे, तथापि अशा प्रकारची जातीनिहाय माहितीची नोंदणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात होत नसल्याने अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत अभिलेखे माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार तपासणीसाठी प्रथमतः उपलब्ध करुन घ्यावे लागतील. याकरिता त्यांनी, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ५ शी संबंधीत माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या अभिलेख्याच्या तपासणीसाठी वेगळ्याने अर्ज करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ४ शी संबंधीत माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थीस नाकारण्याचे कोणतेही प्रयोजन जन माहिती अधिकारी यांच्याकडे असावे असे दिसून येत नाही. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीव्दारे कोणतेही जनहित स्पष्ट होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे मूळातच देय ठरत असल्याने, व्यापक जनहिताचा मुद्दा येथे गैरलागू ठरत आहे. तसेच आज उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस ही माहिती ते ३० दिवसाच्या आत देऊ शकतील, असे आयोगासमोर स्पष्ट केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १, २ व ४ शी संबंधीत माहिती, अधिनियमाव्दारे सशुल्क माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला

असल्याने अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत म्हणून त्यांना अपील चालविण्यामध्ये स्वारस्य नाही असा निष्कर्ष काढून जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास अयोग्य वाटतो. याचबरोबर, अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदींनुसार जास्तीत जास्त ४५ दिवसाच्या कालावधीमध्ये निर्णय देणे भाग होते, तथापि त्यांनी अपिलार्थीस निर्णय देण्यासाठी अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा असमर्थनीय विलंबाने निर्णय दिल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद सचिव (सामाजिक न्याय) यांनी घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या दिनांक १२-०१-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार विहित कालावधीमध्ये प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्यांच्या अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद देण्याच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीमधील कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आवश्यकता नसतांना माहिती नाकारण्याची कारणे त्यांना कळविली आहेत असे आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. या संदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्याची कारणे त्यांना कळविणे अधिनियमातील कलम १९ (८) (एक) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, २ व ४ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चौधरी नरेंद्र बारकू, दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८७

निर्णय दिनांक २९-०१-२००९

१ श्री. प्रविण शिवाजीराव कदम, अपिलार्थी
सुमतीनगर, लासलगाव, तालुका निफाड,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नाशिक शहर पोलीस आयुक्तालय,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
शहर पोलीस आयुक्त, नाशिक शहर, नाशिक

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर वाहतूक विभाग नाशिक शहर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय, नाशिक |
| | त्रयस्थ पक्ष | : | श्री. के. एन. आडके |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत तर अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २८-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नाही किंवा त्यांच्या अपिलासंदर्भात कोणते आदेशही पारित केले नाही, अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्यानुसार कारवाई केली नाही व अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही, अपिलीय अधिकारी यांनी माहिती नाकारल्याने अपिलकाराचे फार मोठे नुकसान होणार आहे व अपिलीय अधिकरी यांनी जन माहिती अधिकारी यांना शास्ती केलेली नाही. यावरुन त्यांनी सदर अपील राज्य माहिती आयोगाकडे केलेले आहे. आपल्या अशा प्रकारच्या अभिप्रायासह त्यांनी आयोगास जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याने त्यांना जास्तीत जास्त शास्ती लावण्याचे व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. के. एन. आडके, वाहतूक पोलीस (शहर) यांच्याविरुध्द केलेला तक्रार अर्ज व त्यासंबंधी झालेल्या चौकशीचा संपूर्ण अहवाल या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००३ पुढील कालावधीशी संबंधीत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या दिनांक ०५-०२-२००३ रोजीच्या तक्रार अर्जासंबंधीची संपूर्ण कागदपत्रे, जाबजबाब, अहवाल, आदेश, टिपणी, शेरे, चौकशीचा अंतीम अहवाल - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने माहितीची मागणी केलेल्या अर्जाची नोंद त्यांच्या कार्यालयात झाल्याचे दिसत नसल्याबाबत अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीकडून त्यांनी केलेल्या अर्जाची स्थळप्रत असल्यास ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ३१-०३-२००७ रोजी समक्ष हजर राहून सादर करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अशाच प्रकारचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०४-२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे निर्णय दिला असून या पत्राव्दारे अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांनी पुरविली आहे.

सदर निर्णय अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील ८६५२/०७ या क्रमांकाने दिनांक ०१-०६-२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येते. या पृष्ठ्यर्थ त्यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीची

सत्यप्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय दिल्याचे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अनुमान त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन करता येते. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जी माहिती मागविली होती त्या मुद्दयांच्यासंदर्भात, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दिनांक ०५-०२-२००३ च्या तक्रार अर्जासंदर्भात सदर तक्रार अर्ज त्यांना प्रथमतः त्यांच्या कार्यालयात सहजरित्या उपलब्ध झाला नाही. तसेच पोलीस ठाण्यामध्ये स्थानिक अर्ज अभिलेखावर जपून ठेवण्याची मुदत दोन वर्षाची असते. अपिलार्थीने माहितीच्या मागणीकरिता केलेला तक्रार अर्ज अभिलेख्यात जपून ठेवण्याची मुदत व्यपगत झाली होती, तरीही विशेष परिश्रम घेऊन, जुने अभिलेखे शोधून अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली. अपिलार्थीच्या मागविण्यात आलेल्या माहितीची छाननी करता अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्याकडे असलेली माहिती पुरविली गेली आहे. अपिलार्थीने अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही किंवा आदेश पारित केलेले नाही, असे आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामधील त्यांचे विधान अशा प्रकारे चुकीचे ठरत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती विहित मुदतीत दिली नसल्याचे त्यांनी आयोगाकडील व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थीचा तक्रार अर्ज जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने माहिती अधिका-यास व अपिलीय अधिका-यास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत देता आली नाही, हे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेले दिनांक ०१-०६-२००७ च्या पत्रामध्ये कबूल केले आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो व त्यांना माहिती देण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडील त्यांच्या संदर्भिय मूळ तक्रार अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले होते. यावरुन जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीपासून माहिती दडवून ठेवण्याचा अथवा माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा उद्देश सिध्द होत नाही. अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी

जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास शास्ती केली नसल्याचे नमूद केले आहे. या मुद्दयावर असे नमूद करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांना, माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे अथवा इतर प्रशासकीय कारवाई करण्याचे इतर कोणतेही अधिकार नाहीत. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास शास्ती लावली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने केलेल्या तक्रारीसंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे व त्याव्दारे त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. श्री. के. एन. आडके, पोलीस शिपाई यांनी मोटार व्हेईकल अॅक्टमधील तरतुदीप्रमाणे कारवाई केली आहे. अशा प्रकारची नस्तीवरील टिपणी, शेरे, अहवाल मागविण्याची पध्दत पोलीस विभागाकडे प्रचलीत नाही. त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आता माहिती देण्याचा प्रश्न उरत नाही हे पाहता, व अपिलार्थीस आता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली माहिती प्राप्त झाली असल्याने आणि जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यास योग्य आहे या निष्कर्षाप्रत प्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रविण शिवाजीराव कदम, सुमतीनगर, लासलगाव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर वाहतूक विभाग नाशिक शहर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय, नाशिक

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८३

निर्णय दिनांक २९-०१-२००९

१ श्री. शेख अजीजभाई अब्दुल कादीर, अपिलार्थी
४४, नाईकवाडपुरा, संगमनेर, तालुका संगमनेर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे
विभाग, बंगला नं. ४, जेलरोड, येरवडा,
पुणे - ४११ ००६

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर |
| | त्रयस्थ पक्ष | : | वैशाली वाईन्स, संगमनेर, जिल्हा अहमदनगर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २८-०३-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-११-२००६ रोजी प्रथम अपील सादर केले असता, या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क हे माहिती अधिकारी होते व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क हे अपिलीय अधिकारी होते, तथापि आता या रचनेत फरक करण्यात आलेला असून संबंधित जिल्ह्याचे उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांची जन माहिती अधिकारी म्हणून व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांची अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाल्याचे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले. त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक ०२-०९-२००६ रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांना राज्य माहिती आयोगाच्या व्दितीय अपिलाच्या सुनावणी संदर्भात पाठविलेल्या नोटिशीसोबत प्रथम प्राप्त झाला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या, दिनांक ०२-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी व त्या अर्जावर हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कारवाई करावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची प्रत आज उपस्थित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर यांना प्रत्यक्षात आयोगातर्फे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०२-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी व त्या अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कारवाई करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख अजीजभाई अब्दुल कादीर, ४४, नाईकवाडपुरा, संगमनेर, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२४

निर्णय दिनांक २९-०१-२००९

१ श्री. सुदाम दयाराम पाटील, अपिलार्थी
मु. कोतकर किराणा समोर, भडगांव रोड, पाचोरा, तालुका
पाचोरा, जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १. श्रीमती अराख कमल लक्ष्मण
२. कु. जयवंता हरजी पवार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ३०-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या त्यांच्या म्हणण्यामध्ये दिनांक २३-०५-२००७ पर्यंत त्यांना मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती अपिलीय अधिकारी

यांच्याकडून मिळालेली नाही असा कोठेही उल्लेख केलेला दिसत नाही, तरी दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या दिलेल्या निर्णयात अर्जदाराला मागितलेली माहिती देण्याचे अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुन अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांना, अपिलार्थीने मुख्याध्यापकाने त्यांना पुरविलेली माहिती खोटी व शासन नियमबाह्य नोंदी केलेल्या नकल प्रती दिल्याने त्यांच्यावर शिस्तभंगविषयक व दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली होती, तथापि या मुद्यांना पाठीशी घालून जन माहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक यांना सहकार्य केले आहे. म्हणून जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जून १९८५ पासून ते अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"श्रीमती कमल अराख व कु. जयवंता हरजी पवार ह्या सेवेत हजर झाल्यापासून आजपर्यंत सेवेत कार्यरत आहे. त्यांच्या मुळ सेवा पुस्तकात सेवेत हजर झाल्यापासून आज पर्यंत अद्यावत कालावधीतील केलेल्या नोंदीच्या साक्षांकित केलेल्या नक्कल प्रती मुदतीच्या आत मिळणे बाबत."

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने हा अर्ज विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक तो प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २४-०५-२००७ रोजी पारित केल्याचे दिसून येते. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक ३०-०५-२००७ पर्यंत त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्याचे सूचित केले. अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाली किंवा कसे यासंदर्भात कोणतीही कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. आजच्या सुनावणीची कल्पना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातर्फे, दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या लेखी नोटिशीव्दारे व दूरध्वनीव्दारे दिनांक २०-०१-२००९ रोजी श्री. किनाके, लघुलेखक, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्यामार्फत देण्यात आलेली आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीची मूळ तक्रार ही श्रीमती अराख कमल लक्ष्मण व कु. जयवंता हरजी पवार यांच्या सेवापुस्तकात संबंधीत मुख्याध्यापकाने घेतलेल्या चुकीच्या नोंदीसंदर्भात असल्याचे दिसून येते. सदर नोंदी या कशा चुकीच्या आहेत हे अपिलार्थीने विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना त्यांच्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये स्पष्ट केले आहे. येथे असे नमूद करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे. त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जर काही माहिती पुरविली असेल तर ती त्यांच्याकडे जशी उपलब्ध आहे तशीच पुरविली असणार. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीच्या सत्यासत्यतेबाबत अपिलार्थीस काही शंका किंवा आक्षेप असतील तर त्यांनी त्यांच्या शंकाचे निरसन समाजकल्याण विभागाच्या अधिका-यांकडून करुन घेणे इष्ट राहिल, असे आयोगास वाटते. याकरिता विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या अर्जाचे नीट अवलोकन करुन अपिलार्थीच्या मूळ तक्रारीवर आवश्यक तो निर्णय घेणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. अपिलार्थीने संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना पुरविलेली माहिती खोटी असल्याचे नमूद करुन त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ काही संदर्भ जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केल्याचे दिसून येते, तथापि या मुद्दयांची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल त्यांच्या निर्णयामध्ये घेतलेली नाही. सबब विभागीय समाजकल्याण अधिकारी यांना, असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या त्यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून उद्देशून केलेल्या अर्जाची त्यांनी गांभीर्याने दखल घेऊन अपिलार्थीने नमूद केल्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तकात जर चुकीच्या नोंदी संबंधितांनी घेतल्या असतील तर या प्रकरणी या नोंदी प्रचलीत नियमाप्रमाणे दुरुस्त करण्याबाबत योग्य ती कारवाई त्वरित करावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००७ रोजीच्या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने त्यांच्यावर सचिव (सामाजिक न्याय) यांना, शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक २३-०५-२००७ रोजी दाखल केलेल्या अर्जावर आवश्यक ती कारवाई हे आदेश त्यांना प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत करावी व आपल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलार्थीस विनामूल्य कळवावा.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुदाम दयाराम पाटील, मु. कोतकर किराणा समोर, भडगांव रोड, पाचोरा, तालुका पाचोरा, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५४

निर्णय दिनांक २९-०१-२००९

१ श्री. सरदार हरजीतसिंग तीरथसिंग सहानी, अपिलार्थी
५-१-५५/१, उस्मानपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तहसीलदार (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०६-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या दिनांक ०७-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपर्यंत मिळाली नाही, तसेच

त्यांनी या प्रकरणी अपर विभागीय आयुक्त यांना दिनांक २५-०४-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, त्यांनी दिनांक २४-०५-२००६ (वर्ष अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे) रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीची कल्पना त्यांनी अपिलार्थीस दिली नाही व त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही. मात्र अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ३०-०५-२००७ रोजी निर्णय देण्यात आला. त्यांनी जिल्हाधिकारी लोकशाहीदिनाच्या वेळी टोकन नंबर ५६/०२ या क्रमांकाने दाखल केलेल्या तक्रार अर्जामध्ये, अनधिकृत बांधकामाचे फोटो जोडल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. जिल्हाधिका-यांच्या पातळीवर त्यांच्या तक्रारीचे निवारण न झाल्याने त्यांनी विभागीय लोकशाहीदिनामध्ये तक्रार केली होती. त्यांच्या माहितीनुसार त्यांनी दाखल केलेले संबंधीत फोटो महसूल कार्यालयातून गहाळ केले गेले आहेत, त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०४-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विभागीय लोकशाहीदिन टोकन नं. ६१/०५ दिनांक १४-०३-२००५ रोजीच्या तक्रार अर्जासोबत जोडलेल्या अनधिकृत बांधकामाच्या फोटोच्या प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांच्या तक्रार अर्जासंबधी मूळ संचिका तपासली असता अपिलार्थीने आपल्या तक्रार अर्जासोबत अनधिकृत बांधकामाचे फोटो जोडले नसल्याचे व फोटोबाबत कोणताही उल्लेख केला नसल्याने अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज निकाली काढल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा दिनांक ३०-०५-२००७ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील रद्द करण्यात येत आहे असा निर्णय दिला. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०३-२००५ रोजीच्या लोकशाहीदिनी विभागीय आयुक्त यांना उद्देशून केलेल्या, अनधिकृत बांधकामाच्या तक्रार अर्जाबरोबर कोणतेही फोटो जोडलेले नाहीत. या अर्जाबरोबर त्यांनी लोकशाहीदिन तक्रार अर्जाची पूर्ण फाईल या शीर्षाखाली काही कागदपत्रे त्यांच्याकडे दाखल केली होती. सदर

कागदपत्रांचा शोध घेता अपिलार्थीस अपेक्षित असलेले फोटो जन माहिती अधिकारी यांना या फाईलमध्ये आढळून आले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांची छाननी केली असता असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १४-०३-२००५ रोजीच्या अर्जाबरोबर (टोकन क्रमांक ६१/०५) कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत बांधकामाबाबतचे फोटो जोडले नव्हते, तसेच सदर फोटो या अर्जाबरोबर जोडले असल्याचा कोणताही उल्लेख त्यांनी या अर्जामध्ये केलेला नाही. अपिलार्थी हे आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या वरील विधानाचे खंडन करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनधिकृत बांधकामासंदर्भात काही फोटो सादर केले होते यासंदर्भात कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे दिलेला नाही. तसेच या प्रकरणाशी संबंधीत नस्तीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी असद्‌हेतुने त्यांना टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे निदर्शनास न आल्यामुळे व तसेच योग्य त्या ठोस पुराव्याअभावी अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सरदार हरजीतसिंग तीरथसिंग सहानी, ५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८८
निर्णय दिनांक ३०-०१-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रल्हाद नारायण अल्हाट,<br>रा. नंदूरबार. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर उपविभाग,नंदूरबार,जि.नंदूरबार | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग, नंदूरबार | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १६.३.२००७ रोजी नोंदणी केलेले व तद्नंतर त्रूटींची पूर्तता करुन आयोगाच्या औरंगाबाद येथील कार्यालयात दि. ३०.५.२००८ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपावेतो, कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन, यामुळे जन माहिती अधिकारी

यांच्यावर दंडात्मक कारवाई होऊन त्यांना विनामूल्य माहिती मिळावी व अपिलापोटी झालेला खर्च देण्यात यावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "युनिट ३ मध्ये लक्ष्मीनगर,संभाजीनगर,एकतानगर,सिंधी कॉलनी,गिरीविहार कॉलनी मधील विज बील थकबाकीदाराची यादी, मिटर धारकांची यादी, कनेक्शन कटची यादी", ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले की, त्यांनी सादर केलेल्या अर्जाप्रमाणे, त्यांना आवश्यक असणारी माहिती त्यांनी स्वतः व्यक्तिशः कार्यालयात येऊन, ही माहिती लेजरवर पहावी तसेच आवश्यक असल्यास त्यांना रजिस्टरवरील माहितीही अधिकाऱ्यांच्या समक्ष पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्व जण अनधिकृतरित्या गैरहजर आहेत. जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांना आज रोजीच्या सुनावणीची कल्पना आयोगाच्या दि. १६.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे व आयोगाच्या कार्यालयातून दि. २१.१.२००९ रोजीच्या दूरध्वनीद्वारे श्री. प्रताप उपअभियंता यांच्यामार्फत देऊनही ते गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने ही

माहिती प्रतींच्या स्वरुपात मागितली असताना, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या माहितीच्या अभिलेख्यांची पाहणी करण्याचे त्यांच्याकडील दि. २९.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करण्यासाठी गेले असल्याचा पुरावा त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही, यावरुन व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले किंवा कसे, याचा आयोगास कोणताही बोध होत नाही. व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती हस्तगत करुन घेण्याची जबाबदारी पूर्णतया अपिलार्थीची असते, तथापि हे उत्तरदायित्त्व अपिलार्थीने पूर्णपणे पार पाडले आहे किंवा कसे, हे योग्य त्या कागदपत्रांच्या व पुराव्याच्या अनुपलब्धतेमुळे तसेच अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळून येत नाही. सबब त्यांची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. अपिलार्थीस माहिती देण्याच्यादृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रल्हाद नारायण अल्हाट, एकतानगर, नळवारोड, नंदूरबार

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,शहर विभाग, नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८९
निर्णय दिनांक ३०-०१-२००९

१ श्री. संतोष मांगू चौधरी, : अपिलार्थी
रा. नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य लिपीक,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव,
जि.नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव,
जि.नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ८.६.२००७ रोजीचे,राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १८.६.२००७ रोजी नोंदणी झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांच्या दि. ४.४.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.२.२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये, अपिलार्थीस

मुख्याध्यापक वेतनश्रेणी मंजूरीनुसार वेतन फरक, सेवानिवृत्तीवेतन व त्यातील फरक आणि उपदान या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खालीलप्रमाणे उत्तर दिले आहे.

"मुख्याध्यापक या पदावर पदोन्नती झाल्यानंतर फरकाचे बिलाची तपासणी सुरु आहे. सदर तपासणी अंतिम झाल्यानंतर सेवानिवृत्ती वेतन व उपदान निधीची कार्यवाही करण्यात येईल. शासनाकडून व महानगर पालिका कडून अनुदानाची रक्कम उपलब्ध झाल्या बरोबर सर्व शिक्षकांच्या बरोबरच एकत्र रित्या फरक अदा करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल."

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही निर्णय दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत, तर जन माहिती व जन अपिलीय अधिकारी हे त्यांना आज रोजी सुनावणीची कल्पना आयोगाच्या दि. १६.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे व आयोगाच्या कार्यालयातून दि. २१.१.२००९ रोजी समक्ष त्यांच्या कार्यालयातील श्री. बावीस्कर यांच्यामार्फत निरोप देऊनही ते विनापरवानगी गैरहजर आहेत. त्यांनी आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर सुनावणीसाठी कोणताही प्रतिनिधी पाठविला नाही, हे येथे सखेद नमूद करण्यात येऊन त्यांच्या अनुपस्थितीसंदर्भात आयोग या आदेशाद्वारे तीव्र नापसंती व्यक्त करत आहे.

उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ४.४.२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.७.२००७

रोजी घेतली व या संदर्भातील आपले आदेश दि. १७.९.२००७ रोजी पारीत केले. या निर्णयाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जावर दिलेला निर्णय पुनरुच्चारित केला आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे, तरी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन ते मुख्याध्यापक या पदावर कार्यरत असताना सुधारित झालेला त्यांच्या वेतनश्रेणीतील फरक आणि वेतन फरकामध्ये त्यांना अनुज्ञेय इतर अनुषंगीक देय रकमा त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून हव्या आहेत. अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादावरुन त्यांना मालेगाव महानगरपालिकेतील शिक्षण मंडळाकडून एकूण रु.५०२४/- इतकी देय रक्कम अप्राप्त आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शासनाकडून व महानगरपालिका,मालेगाव यांच्याकडून अनुदान फीची रक्कम उपलब्ध झाल्यानंतर अपिलार्थीस फरक अदा करण्याचे आश्वासित केले आहे. अपिलार्थीस देय असलेल्या फरकाची रक्कम पाहिल्यास या फरकाची रक्कम विहित मुदतीत देणे मालेगाव मनपाला अशक्य होते, असे वाटत नाही. तेव्हा या प्रकरणी स्वतः महानगरपालिका, आयुक्त यांनी लक्ष घालून अपिलार्थी व त्यांच्या सारखे इतर कर्मचारी यांचे वेतनश्रेणीतील फरक त्यांना त्वरेने कसे देता येईल, यासंदर्भात विचार होणे जरुरीचे आहे, असे आयोगास वाटते. आयोगाच्या या सूचनांवर आयुक्त, महानगर पालिका यांनी त्वरेने कार्यवाही करावी, असे आयोगास अपेक्षित आहे.

या टप्प्यावर असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ४.४.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, शिक्षण मंडळ यांनी आपला निर्णय पारित करणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दीड महिन्याच्या विलंबाने सुनावणी ठेवली व एकदा सुनावणी झाल्यानंतर परत दीड महिन्याच्या विलंबाने आपले आदेश पारित केले. अशाप्रकारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदतीत कारवाई न करुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची अक्षम्य हेळसांड केल्याचे येथे प्रतीत

होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार व बेपर्वा कार्यशैलीची आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली आहे, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव यांनी, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव यांच्या बेजबाबदार व बेपर्वा कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष मांगू चौधरी, एन-३२/एन-७/२१/६ उमाग्रज निवास, स्वामी विवेकानंदनगर,सिडको नं.३, नाशिक-४२२ ००९

२. जन माहिती अधिकारी मुख्य लिपीक, महानगरपालिका, शिक्षण मंडळ, मालेगाव, जि.नाशिक-४२३ २०३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी, महानगरपालिका, शिक्षण मंडळ, मालेगाव, जि.नाशिक-४२३ २०३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव, जि.नाशिक-४२३ २०३ यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२९०
निर्णय दिनांक ३०-०१-२००९

१ श्री. संतोष मांगु चौधरी, : अपिलार्थी
रा. नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य लिपीक,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव,
जि.नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्रशासनाधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव,
जि.नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ८.६.२००७ रोजीचे,राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयास दि. १८.६.२००७ रोजी नोंदणी झालेले, द्वितीय अपील आयोगाच्या आज रोजी विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव जि.नाशिक यांच्याकडून ६० दिवसांपेक्षा अधिक दिवस झाले तरी कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी अशी माहिती मागितली आहे की, "त्यांना

नोव्हेंबर, २००५ ते एप्रिल, २००६ या कालावधीतील सेवानिवृत्तीवेतन ३९४८०/- रुपये ऐवजी ३८,७७२/- मिळालेले असून, त्यांना रु.७०८/- कमी सेवानिवृत्ती वेतन मिळाले आहे. कमी मिळालेले सेवानिवृत्ती वेतन बँक खात्यसावर जमा व्हावे."

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात उधृत केलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.३.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन, "अपिलार्थीस कमी मिळालेल्या सेवानिवृत्तीवेतनाची रक्कम रु. ७०८/- चे तपासणीचे काम सुरु असल्याचे व सदर रक्कम त्यांना देय असल्यास, शासनाकडून व महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध झाल्यावर अदा करण्यात येईल", असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २.४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही व या संदर्भात आपले कोणतेही आदेश प्राप्त न केल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत. अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेला सेवानिवृत्तीवेतनाच्या फरकाची रक्कम रु.७०८/- त्यांच्या खात्यावर मालेगाव महानगरपालिकेतर्फे वर्ग करण्यात आली असून सदर फरकाची रक्कम नगरपालिकेने त्यांच्या खात्यामध्ये दि. १७.१०.२००७ रोजी रक्कम रु.२८४६/- इतकी जमा केली असून या रकमेमध्ये ती रक्कम समाविष्ट आहे. अपिलार्थीच्या मूळ गाऱ्हाण्याची तड आता लागलेली आहे. अपिलार्थीच्या खात्यावर सदर रक्कम जमा होण्यापूर्वीच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे द्वितीय अपील दि.१८.०६.२००७ रोजी दाखल झाले होते.

अपिलार्थीच्या वरील युक्तिवादावरुन अपिलार्थीने ज्या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता, त्या मुद्यावरील कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीने विचाराधीन अपील सादर केल्यानंतर आता पूर्ण झाली आहे, त्यामुळे आयोगास निर्णय देण्यासाठी कोणताही वेगळा मुद्दा उपस्थित होत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे,

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष मांगू चौधरी,एन-३२/एन-७/२१/६ उमाग्रज निवास, स्वामी विवेकानंदनगर,सिडको नं.३,नाशिक-४२२ ००९.

२. जन माहिती अधिकारी मुख्य लिपीक, महानगरपालिका, शिक्षण मंडळ, मालेगाव, जि.नाशिक-४२३ २०३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ,मालेगाव, जि.नाशिक -४२३ २०३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव, जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२९१
निर्णय दिनांक ३०-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अब्दुल मजीद मुसा शाह,<br>रा. मालेगाव जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर उपविभाग क्र.३, जुने आग्रा<br>रोड,मालेगाव,जि.नाशिक.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर तथा ग्रामीण, मोतीभवन, मालेगाव<br>जि.नाशिक | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्षः १) श्री. बद्रे आलम अब खालीक
२) श्री. एम.एच.अब्दुल्लाह

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.०५.०५.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयास दि. २१.५.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आयोगाच्या आज रोजी विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि.२७.१.२००९ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती देण्यात आली आहे व त्यांना आता या माहितीची गरज न राहिल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीस आता माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य राहिले नसल्याने त्यांनी, वरील परिच्छेदामध्ये केलेली ही विनंती मान्य करण्यात येत आहे व त्यांचे आज रोजी विचाराधीन असलेले द्वितीय अपील क्र.२२९१/०७,दि.२१.०५.२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२२९१/०७, दि.२१.०५.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अब्दुल मजीद मुसा शाह, रा. किल्ला झोपडपट्टी,रविवार वॉर्ड,घर नं.१२२,गली नं.४, मालेगाव जि.नाशिक-४२३२०३.

२. जन माहिती अधिकारी उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग क्र.३,जुने आग्रा रोड,मालेगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,शहर तथा ग्रामीण,मोतीभवन,मालेगाव,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२९२
निर्णय दिनांक ३०-०१-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पुरुषोत्तम रामविलास तापडे,<br>रा. मालेगाव जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>इमारत पर्यवेक्षक,<br>मालेगाव महानगरपालिका,मालेगाव,<br>जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>नगररचनाकार,<br>मालेगाव महानगरपालिका,<br>मालेगाव,जि.नाशिक. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १५.०९.२००६ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. २२.०९.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आयोगाच्या आज रोजी विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.८.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी

यांच्याविरुध्द जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.७.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.७.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ३.८.२००६ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित माहितीच्या प्रती ८ दिवसांच्या आत सशुल्क देण्याचे सूचित केले. या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांचेशी वेळोवेळी संपर्क केला व जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३.८.२००६ रोजीच्या निर्णयाप्रमाणे माहितीची मागणी केली, तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना 'ड' पंचनाम्याची प्रत दिली व उर्वरित माहिती देण्यास टाळाटाळ केली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केला असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. त्यांच्या या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने त्यांनी व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी त्यांची दि. ८.६.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ५.६.२००६ रोजी सोमवार वॉर्ड सी.टी.एस.नं.२३३ ही इमारत महानगरपालिकेने पाडली. यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - आयुक्त यांनी दिलेले आदेश, सदरच्या इमारत पाडण्याकामी संबंधित प्रभाग अधिकारी यांनी केलेल्या सर्व अहवालाच्या प्रती, पोलीस विभागास पोलीस बंदोबस्त मिळण्याकामी दिलेले पत्र, त्यासाठी घेतलेल्या आयुक्त यांच्या मंजूरी आणि सदरचा भाग हा कुठल्या प्रभागात समाविष्ट आहे, त्या प्रभागाचे नाव व पंचनाम्याची प्रत - या माहितीचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील ७.७.२००६रोजी प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस काही माहिती दिली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापही त्यांनी मूळ अर्जात संदर्भित केलेली इमारत पाडण्याकामी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या काही अहवालाच्या प्रती त्यांना अद्यापही प्राप्त झाल्या नाहीत, तसेच इमारत पाडण्यासाठी आयुक्तांनी केलेल्या पंचनाम्याच्या प्रतीही त्यांना प्राप्त झाल्या नाहीत. या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य मिळाव्यात, अशी त्यांची अपेक्षा आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दि. ७.७.२००६ रोजी व दि. १२.७.२००६ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित करण्यात आली होती. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केलेल्या काही अहवालाच्या प्रती व पंचनाम्याच्या प्रती याबाबत ते आयोगास समाधानकारक खुलासा करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही अपिलार्थीस काही माहिती देणे भाग आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये प्रभाग अधिकाऱ्याने केलेल्या सर्व अहवालाच्या प्रती, अशा माहितीची मागणी केलेली होती. यामध्ये अपिलार्थीने त्यांना निश्चितपणे कोणत्या विषयावरील व प्रभाग अधिकाऱ्यांच्या कोणत्या शाखेकडील अहवालाच्या प्रती अपेक्षित आहेत, याचा तपशील दिला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून संबंधित विषयावरील नस्तीच्या व त्यावरील अभिलेख्यांची स्वतः तपासणी करावी व त्यामधून ज्या कागदपत्रांच्या प्रती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून येणे बाकी आहे, त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढून घ्याव्यात. अपिलार्थीस संबंधित अभिलेख्याच्या तपासणीसाठी कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही व ही तपासणी त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत फक्त एकदाच करणे अनुज्ञेय राहिल.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केलेल्या पंचनाम्याच्या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्या नसल्याचे दिसून येते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस संदर्भिय इमारत ज्या रोजी पाडली, त्या रोजी/दिवशी करण्यात आलेल्या पंचनाम्याची प्रत त्यांना हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी स्वत: व्यक्तिशः उपस्थित राहावे. ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या प्रतिनिधीमार्फत प्राप्त करुन घेणे अनुज्ञेय राहणार नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही संपूर्ण माहिती मिळाली नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर उचित कायदेशीर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे, त्याचबरोबर अपिलार्थीने देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही मुद्यांवर मोघम स्वरुपात माहिती मागितली आहे. या मुद्यासंदर्भात आयोगाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी हे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. सबब तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती व निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित अभिलेख्यांची तपासणी करुन विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पुरुषोत्तम रामनिवास तापडे, रा. शुक्रवारपेठ, पाचकंदील,मालेगाव-नाशिक-४२३ २०३.

२. जन माहिती अधिकारी इमारत पर्यवेक्षक, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२९५
निर्णय दिनांक ३०-०१-२००९

१ श्री. जहीर अहमद मोहंमद उस्मान, : अपिलार्थी
रा. मालेगाव जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राध्यापक,
मोहम्मदीया तिब्बीया कॉलेज ॲण्ड अस्सायर
हॉस्पीटल,मालेगाव,जि.नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य ,
मोहम्मदीया तिब्बीया कॉलेज ॲण्ड अस्सायर
हॉस्पीटल,मालेगाव,जि.नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.०१.१२.२००६ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १२.१२.२००६ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आयोगाच्या आज रोजी विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि.१२.१.२००९ रोजीचे पत्र आयोगाचे कार्यालयात प्राप्त झाले असून या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना विचाराधीन अपील,

जन माहिती अधिकारी यांच्याकडून संबंधित रेकॉर्ड दाखविले गेले असल्याने, पुढे चालवावयाचे नाही, म्हणून सदर अपील खारीज करावे, असे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील क्र.२२९५/२००७ खारीज करण्याची आयोगास विनंती केली असल्याने, अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील क्र.२२९५/०७, दि.१२.१२.२००६ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२२९५/०७, दि.१२.१२.२००६ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जहीर अहमद मोहंमद उस्मान,रा.जुने निसा हॉस्पीटल,अंजूमन चौक, मालेगाव जि.नाशिक -४२३२०३.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक,मोहम्मदीया तिब्बीया कॉलेज ॲण्ड अस्सायर हॉस्पीटल,मालेगाव,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,मोहम्मदीया तिब्बीया कॉलेज ॲण्ड अस्सायर हॉस्पीटल,मालेगाव,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४५
निर्णय दिनांक ३०-०१-२००९

१ श्री. सरदार हरजितसिंग तिरथसिंग सहानी, : अपिलार्थी
रा.उस्मानपूरा जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपआयुक्त,
करमूल्यनिर्धारण अधिकारी,
महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त,
महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: १) वॉर्ड अधिकारी - 'ड'
महानगरपालिका,औरंगाबाद.
२) मालमत्ता अधिकारी तथा करमूल्यनिर्धारण
अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद.

जन अपिलीय अधिकारी: कर निर्धारक व संकलक,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०४.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आयोगाच्या आज रोजी विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना मागणी केलेल्या माहितीच्या सत्यप्रती अपेक्षित असताना, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या माहितीच्या छायाप्रती देण्यात आल्या आहेत. SPEC कडून तयार केलेले माहितीपत्रक दिले नाही, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ द्वारे मागितलेली माहिती दि. २७.२.२००७ रोजीच्या अर्जाप्रमाणे दिली नाही, जन माहिती अधिकारी व पहिले अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कसूर केला आहे,त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता कराच्या संदर्भात १९७५ पासून ते अपिलार्थीने प्रथम अर्ज करेपर्यंतच्या कालावधीची माहिती एकूण ४ मुद्याद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - घ.नं.५-१-५५ CTS No.१७०१६ या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या वर्षापासून माहिती पत्रक तयार केले आहे, त्या वर्षापासून मालमत्तेसंबंधीचे रेकॉर्ड, घ.नं.५-१-५५ वर ज्या मालकाच्या नावाची नोंद आहे व आजपर्यंत जी मालमत्ता कराची थकबाकी आहे, ती माहिती, या घराच्या शेवटच्या भरलेल्या मालमत्ता कराची रक्कम व दिनांकाची माहिती, घर ५-१-५५ वर दुकाने व भाडेकरु आज रोजी आहेत, त्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे किती वर्षापासून नोंद आहे त्याची माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताच प्रतिसाद दिला गेला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ९.३.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ९.३.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस तात्काळ माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.३.२००७ रोजी काही माहिती पुरविली. तथापि जन अपिलीय अधिकारी

यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस पूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना प्राप्त झालेली नाही. सदर माहिती अपूर्ण असून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहितीपत्रकाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झाली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही प्रभाग अधिकारी व कर आकारणी या दोन वेगवेगळया विभागाकडील विषयाशी संबंधित होती. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी या दोन स्वतंत्र विभागाचे दोन स्वतंत्र जन माहिती अधिकारी संबंधित आहेत.

जन माहिती अधिकारी (प्रभाग अधिकारी) यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ हे त्यांच्याशी संबंधित आहेत. मुद्दा क्र. २ व ३ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २९.१.२००९ रोजी पुरविली आहे.

या प्रकरणाशी संबंधित दुसरे जन माहिती अधिकारी (तथा मालमत्ता व करमूल्य निर्धारण अधिकारी,महानगरपालिका) यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने, मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ व ४ शी संबंधित माहिती त्यांच्या विषयाशी संबंधित होती व ती त्यांनी अपिलार्थीस दिली नाही. अपिलार्थीस माहिती न देण्याची कारणे आयोगाने विचारली असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस दुसऱ्या एका संदर्भाद्वारे दि. २४.१०.२००५ रोजी पुरविली असल्याने त्यांनी ही माहिती परत पुरविली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती

न देण्याचे कारण म्हणजे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नाही, असे सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा दि. २५.१.२००७ रोजीचा मूळ अर्ज उपआयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांच्याकडे केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दोन वेगवेगळया विषयाशी संबंधित होती. त्यामुळे अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज ज्यांच्याकडे प्रथमतः प्राप्त झाला त्यांनी, अपिलार्थीच्या अर्जाची प्रत दुसऱ्या विभागाकडे पाठवून त्या विभागाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात संबंधित विभागास कळविणे गरजेचे होते व त्यांच्या या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे गरजेचे होते. तथापि अशाप्रकारची अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपेक्षित असलेली कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या दि. २५.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र.१ चे अवलोकन करता या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे - 'मालमत्तेसंबंधी रेकॉर्ड पाहिजे'-अशी माहिती मागितली होती. मालमत्तेसंदर्भातील त्यांना निश्चित कोणते रजिस्टर हवे आहे, याचा या माहितीमध्ये उल्लेख नाही, त्यामुळे अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची ठरते, तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना घर क्र.५-१-५५ सी.टी.एस.क्र.१७०१६ या मिळकतीच्या कर आकारणी विभागाकडील माहितीपत्रकाची आवश्यकता असल्याचे सांगितले. आज सुनावणीच्या वेळी उपस्थित कर आकारणी विभागाचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहितीपत्रक विनामूल्य देण्याची तयारी दर्शविली.अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.१.२००९ रोजी पुरविल्याचे दिसून येते. मुद्दा क्र. ३ द्वारे अपिलार्थीने अशी माहिती मागितली आहे की, - 'घर क्र.५-१-५५ वर शेवटची भरलेली मालमत्ता कराची रक्कम व दिनांक', - यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि.

२९.१.२००९ रोजी दिलेली माहिती ही चुकीची आहे. या मुद्यासंदर्भात माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित मालमत्ताधारकाने मालमत्तेचा कर सन १९८१ पासून भरला नाही, अशी माहिती दिली आहे. अपिलार्थीने शेवटचा कर भरल्याचा दिनांक व रक्कम, यांची मागणी केली असताना, जन माहिती अधिकारी यांनी वर म्हटल्याप्रमाणे दिलेले उत्तर चुकीचे ठरते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी प्रभाग अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती कर आकारणी विभागाच्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील अपिलार्थीच्या दुसऱ्या विषयासंदर्भात दि. २४.१०.२००५ रोजी दिल्याचे त्यांनी आज रोजी आयोगास दाखविले व एकदा ही माहिती दिल्यानंतर अपिलार्थीस परत माहिती देण्याची गरज नाही, या धारणेने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही. अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही माहितीची मागणी केल्यास, ती माहिती जरी अर्जदारास दुसऱ्या कोणत्याही विषयासंदर्भाने पुरविली गेली असली तरीही अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास प्रतिसाद देताना जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास ती माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देणे त्यांना अनिवार्य आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस कर आकारणी विषयासंदर्भाने दि. २४.१०.२००५ रोजी कथित कागदपत्रे अपिलार्थीस यापूर्वी पुरविली असतील तरी किंवा अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करेपर्यंत या माहितीमध्ये काही बदल होण्याचीही शक्यता आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस त्यांनी मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती दि. २४.१०.२००५ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे दिली होती, हा युक्तिवाद आयोग फेटाळून लावत आहे. थोडक्यात, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत दिली नसल्याचे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी, अपिलार्थीस आजपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती सुसंगत नसल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक यांनी आयोगासमोर दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती कर

निर्धारण विभागाच्या जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे अपील अर्जावर त्यांना साक्षांकित स्वरुपात माहिती दिली नाही, SPEC कडून तयार केलेले माहितीपत्रक दिले नाही, हे मुद्दे उपस्थित केले आहेत. तथापि त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून साक्षांकित स्वरुपात माहिती मागितल्याचे व तसेच SPEC कडून तयार झालेल्या माहितीपत्रकाचीही त्यांनी मागणी केल्याचे आढळून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील हे दोनही मूळ अर्जामध्ये समाविष्ट नसलेले अतिरिक्त मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे.यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करणे भाग आहे.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन व अधिनियमातील कलम ६(३)(एक) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने, आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. मालमत्ता व कर निर्धारण विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (प्रभाग

अधिकारी 'ड' या विभागाशी संबंधित माहितीसह) अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सरदार हरजीतसिंग तिरथसिंग सहानी, घ.नं.५-१-५५/१,उस्मानपूरा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी वॉर्ड अधिकारी- 'ड', महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी तथा करनिर्धारण अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२९६

निर्णय दिनांक   ३१-०१-२००९

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, — अपिलार्थी

वाडिभोकर रोड, देवपूर,

धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण

कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी

मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग,

धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०१-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने याच माहितीकरिता यापूर्वी राज्य माहिती आयोगाकडे याच माहितीसंदर्भात दिनांक १७-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले होते. त्यावर आयोगाने

सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २९-११-२००८ रोजी पारित केले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२९६/०७, दिनांक २३-०१-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, वाडिभोकर रोड, देवपूर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उप विभाग, क्रमांक १, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग, साक्री रोड धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**श्रज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२९७

निर्णय दिनांक ३१-०१-२००९

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, अपिलार्थी
वाडिभोकर रोड, देवपूर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, धुळे

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०१-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले असून आपल्या दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०७-२००६ ते ३०-१०-२००६ या कालावधीशी संबंधीत, जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"ओम क्रिटीकलने दिनांक ०८-०७-२००६ रोजी रुपये १५० चाचणी फी भरुन दिनांक ०८-०७-२००६ रोजी मीटर टेस्टींगचा अर्ज दिला होता. मीटर तपासणीसाठी दिनांक २६-१०-२००६ रोजी कंपनीचे कर्मचारी आलेत. सदर विलंबास कोण अधिकारी (नांव व हुद्दा) जबाबदार आहे ? त्यानंतर अधिका-यावरील प्रति आठवडा रुपये १०० ही दंडात्मक कार्यवाहीची पावती मिळावी व सदर अधिका-याच्या सर्व्हिस बुकमध्ये सरकारी कार्यवाहीस कसूर केल्याच्या नोंदीचे प्रमाण (पुरावा) मिळावा."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र अपिलार्थीच्या या मूळ अर्ज व अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी उप कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरीने दिनांक २०-०१-२००७ रोजी एक पत्र पाठविले असून अपिलार्थीस त्यांनी माहिती मागितलेल्या प्रकरणी खुलासा केला असल्याचे नमूद केले आहे. तसेच या पत्रामध्ये अपिलार्थीस कार्यकारी अभियंता यांनी खुलासेवार माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विचारलेली माहिती पुरविली नाही, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती असंबद्ध स्वरुपाची आहे. त्यांनी विचारणा केलेली माहिती ही निश्चित स्वरुपाची होती, तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी मूळ अर्जामध्ये विलंबास जबाबदार कोण अधिकारी आहेत त्यांची नांवे व पदनाम यांची विचारणा केली असता यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जास व त्यावरील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या अपील अर्जाच्या संदर्भात त्यांच्याकडील पत्र क्रमांक २६८ दिनांक २०-०१-२००७ व्दारे माहिती पुरविली आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे मीटर टेस्टींग वेळीच झाले असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कथित विलंबाकरिता कोणीही अधिकारी जबाबदार नाही. अपिलार्थीचे मीटर प्रयोगशाळेमध्ये दिनांक २६-१०-२००६ रोजी आणले असून यासंदर्भातील टेस्टींग रिपोर्ट अपिलार्थीस दिनांक १४-११-२००६ रोजी दिलेला आहे. मीटरचे टेस्टींग अपिलार्थी यांच्या उपस्थितीत करण्यात आलेले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीची या प्रकरणातील मूळ तक्रार त्यांच्या ओम क्रिटीकल केअर सेंटर या इस्पितळाचे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने बसविलेल्या मीटर संबंधात, सदर मीटर वेगाने फिरत असल्याचे आढळल्यावरुन अपिलार्थीने या मीटरची चाचणी घेण्याकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे दिनांक १२-०७-२००६ रोजी आवश्यक ते चाचणी शुल्क रुपये १५० इतके कंपनीच्या कार्यालयामध्ये भरले. अपिलार्थीने सदर शुल्क भरल्यानंतर इस्पितळातील मीटर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिका-यांनी दिनांक २६-१०-२००६ रोजी काढून नेले. या टप्प्यावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचा-यांनी अंदाजे तीन महिने इतका कालावधी घेतला. दिनांक २६-१०-२००६ रोजी मीटर काढून घेतल्यानंतर हे मीटर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या प्रयोगशाळेत पाठविले. तदनंतर सदर मीटरची चाचणी अपिलार्थीच्या उपस्थितीत दिनांक १०-११-२००६ रोजी घेण्यात आली व अपिलार्थीस टेस्ट रिपोर्ट देण्यात आला. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक १२-०७-२००६ रोजी मीटर चाचणीसाठी आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर १५ दिवसाच्या आत त्यांना मीटर टेस्टींगचा निकाल प्राप्त होणे

आवश्यक असतांना सदर मीटरची चाचणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिका-यांनी विलंबाने घेतली व या विलंबास निश्चितपणे कोण जबाबदार आहेत याची माहिती अपिलार्थीने अपेक्षिली आहे. मूळात या प्रकरणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मते कोणताही विलंब झाला नसून अपिलार्थीने त्यांच्या प्रयोगशाळेमध्ये अपिलार्थीचे मीटर प्राप्त झाल्यापासून त्यांनी १५ दिवसाच्या आत या मीटरची चाचणी अपिलार्थीच्या उपस्थितीत करुन घेतली आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या कक्षेमध्ये अर्जदाराने अर्ज केल्यापासून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे प्रतिसाद देणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतेही निश्चित असे उत्तर दिलेले नाही. जर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मते अपिलार्थीने संदर्भित केल्या प्रकरणी त्यांच्याकडील कोणताही अधिकारी जबाबदार असल्याचे आढळून येत नव्हते तर त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस कळविणे भाग होते, तथापि तसे न करता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रश्नास तांत्रिक तपशील मुद्दयावर भर देऊन अपिलार्थीस खुलासा केला. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून त्यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव सिध्द केला असल्याने व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, वाडिभोकर रोड, देवपूर, धुळे - ४२४ ००२.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२९८

निर्णय दिनांक ३१-०१-२००९

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, अपिलार्थी
वाडिभोकर रोड, देवपूर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग,
धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०१-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-१०-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने वीज कनेक्शन तोडण्याच्या केलेल्या कारवाईसंदर्भात दिनांक १८-०८-२००६ ते ३०-१०-२२००६ या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जा. क्र. /उपकाअ/शवग्रा/बिलींग/ धुळे/४०५१ रजिस्टर ए. डी. ने पाठविलेल्या नोटीसप्रमाणे आपण कार्यवाही केली का, आणि केली असल्यास त्याविषयीची संपूर्ण माहिती, वीज कनेक्शन तोडण्याचा अहवाल, वायरमन व अधिका-याची नांवे मिळावीत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०७-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दिनांक ३१-१०-२००६ रोजी केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी उत्तर दिले आहे. आयोगाने सदर उत्तराच्या प्रतीची मागणी केली असता जन माहिती अधिकारी सदर पत्र आयोगास दाखवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले पत्र हे उप कार्यकारी अभियंता यांनी चेअरमन ओम क्रिटीकल केअर सेंटर प्रायव्हेट लिमिटेड यांना उद्देशून लिहिलेले एक पत्र असून, या पत्रामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, धुळे यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे असलेल्या विद्युत बिलाची थकबाकी पूर्णतः भरण्यासंदर्भात पाठविलेली नोटीस असल्याचे आढळून येते. या पत्राची प्रत उप कार्यकारी अभियंता यांनी संबंधीत कनिष्ठ अभियंता, रामवाडी यांना अग्रेषित करुन अपिलार्थीने बिलाची

रक्कम पूर्णपणे न भरल्यास त्यांचा विद्युत पुरवठा त्वरीत बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावर त्यांनी पुढे काय कारवाई केली यासंदर्भात माहिती हवी आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली बहुतांश माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही, कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये, अपिलार्थीस ही माहिती देण्यासंदर्भात प्रथमतः विहित केलेल्या मुदतीत निर्णय घेणे व माहिती देण्याचा निर्णय झाल्यानंतर ती अपिलार्थीस एका ठराविक मुदतीत तरतुदीनुसार देणे एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील अपिलार्थीने संदर्भित केलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कारवाई, वीज कनेक्शन तोडण्याचा अहवाल, वायरमन व अधिका-यांची नावे एवढी माहिती अपिलार्थीस देय ठरते. अपिलार्थीने या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'कारवाई केली का ? नसल्यास का नाही', अशा प्रकारची माहिती विचारली आहे. अशा प्रकारची माहिती अपिलार्थीस वरील तरतुदीनुसार देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या माहितीतील उर्वरित माहिती, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविणे, अनिवार्य आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस विहित मुदतीत सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-१०-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे सिध्द होत असल्याने त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, यांना करण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक ५-१२-२००६ रोजीच्या अपील अर्जावर दिनांक २१-०७-२००८ रोजी म्हणजे, अधिनियमातील विहित मुदतीपेक्षा विलंबाने आपला निर्णय दिला असून त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी देखील आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, वाडिभोकर रोड, देवपूर, धुळे - ४२४ ००२.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उप विभाग, क्रमांक १, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग, साक्री रोड धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२९९

निर्णय दिनांक ३१-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मनिष सुरजमल जाखेटे,<br>वाडिभोकर रोड, देवपूर,<br>धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत<br>वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, धुळे | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण<br>कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग,<br>धुळे | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०१-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०१०-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वीज बिलामधील ग्राहकास देय असलेल्या परावर्तीत रकमेसंदर्भात विद्युत वितरण कंपनीकडून कायद्याची पायमल्ली होत असलेल्या प्रकरणी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" दि. १६-०९-२००६ रोजी ओम क्रिटीकलने केलेल्या तक्रारीनुसार - दि. २६-०३-२००६ ते २६-०६-२००६ या बिलापोटीची रक्कम वीज कायदा २००३ च्या तरतुदीनुसार परावर्तीत केली का? सदर तक्रारीचे एम. एस. इ. डि. कंपनीने काय निवारण केले आहे ? याविषयी विस्तृत माहिती मिळावी."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक तो प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०७-२००८ रोजी आपला निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले व याच दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस 'पुर्नउत्तर' या शीर्षकाखाली त्यांच्याकडील दिनांक १६-०९-२००६ रोजी केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात केलेल्या कारवाईबाबत अवगत केले. तथापि अपिलार्थीने त्यांना ही माहिती प्राप्त होण्यापुर्वीच वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेल्या त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०९-२००६ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात त्यांनी केलेल्या कारवाईविषयी अवगत केले असून, या पत्राबरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे परावर्तीत रकमेसंदर्भात केलेल्या प्रस्तावाची प्रत दिली आहे, असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जी माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ३०-११-२००६ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे अपेक्षित होते त्या मुदतीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न होता ती दिनांक २१-०७-२००८ रोजी म्हणजे अंदाजे एक वर्षे ८ महिने इतक्या विलंबाने म्हणजे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजी प्रथम अपील

केल्यानंतर दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती, अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देणे हे जन माहिती अधिकारी यांच्या दृष्टीने फार कठीण काम होते, अशातली कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीसंदर्भात, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आता आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर अशा प्रकारांची पुनरावृत्ती त्यांनी टाळावी अशा त्यांना सूचना देण्यात येत आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही सुनावणी न घेऊन अथवा आपला निर्णय अपिलार्थीस न कळवून अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जाची अधिनियमातील विहित मुदतीत सुनावणी न घेऊन अक्षम्य उपेक्षा केल्याचे आढळून येते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अपील प्रकरणी विलंबाने कारवाई करुन जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची नोंद व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता या प्रकरणाशी संबंधीत पूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य मिळाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, वाडिभोकर रोड, देवपूर, धुळे - ४२४ ००२.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उप विभाग, क्रमांक १, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग, साक्री रोड धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३००

निर्णय दिनांक ३१-०१-२००९

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, अपिलार्थी
वाडिभोकर रोड, देवपूर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग,
धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दिनांक ३०-०५-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" रु. १,५२,६७५ /- महाराष्ट्र वी. वि. कं. लि. ग्राहकाला देणे लागत असतांना ग्राहकाकडून थकबाकीपोटी वसूली करणे, त्यावरील व्याजाची वसूली करणे आणि ग्राहकाने ते न भरल्यास त्यांच्या वीजेचे कनेक्शन तोडणे हे कृत्य वीज कायदा (महाराष्ट्र) आणि वीज नियंत्रक आयोगाच्या कायद्याप्रमाणे बेकायदेशीर कृत्य आहे का ? असल्यास बेजबाबदार अधिका-यावर कोणता गुन्हा नोंदविला जातो ? सदर गुन्ह्यास वीज वीतरण कं. मार्फत वीज नियामक आयोगाच्या कायद्याप्रमाणे जबाबदार अधिका-यास काय शिक्षा दिली जाते ? "

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खालीलप्रमाणे उत्तर दिले आहे.

" दि. २२/१२/०३ ते ३०/११/०६ ग्राहक तक्रार निवारण न्याय मंच ग्राहक तक्रार क्र. ६२/२ च्या आदेशाप्रमाणे १,५२,६७५ /- ही रक्कम वळती करणेबाबत - याबाबत खुलासा करण्यात येतो की, दावा क्रमांक ६२/२ चा निकाल ६/६/०२ रोजी देण्यात आला असतांना सदर निकालाविरुध्द राज्य कमिशन मुंबई यांचे कडेस अपिल नं. १०१५/०४ व किरकोळ अर्ज १३४४/०४ नुसार राज्य कमिशन मुंबई यांचे कडेस अपिल दाखल करण्यात आले होते. सदर अपिलाचा एकतर्फी निकाल दि. २४/१/०५ रोजी देण्यात आला असतांना त्यांची कार्यालयीन प्रत दि. १९/१०/०६ रोजी या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सदर आदेशाप्रमाणे या कार्यालयाने त्वरीत अमलबजावणी करुन सदर बिलाची रक्कम १,५३,८२०/- ऑक्टो. ०६ च्या विज बिलातून कमी करुन देण्यात आले आहे याबाबत राज्य कमिशन मुंबई यांच्या हुकुमाप्रमाणे ग्राहक तक्रार निवारण मंच धुळे यांचा निकाल कायम ठेऊन त्याप्रमाणे अमलबजावणी केलेली आहे. सदर बाब न्यायप्रविष्ठ असल्यामुळे न्यायालयाच्या हुकुमाप्रमाणे अमलबजावणी करण्यात आली आहे."

तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आदेश दिले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या

निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले उत्तर दिशाभूल करणारे आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात प्रथम अर्जाव्दारे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी 'वीज नियामक आयोगाच्या कायद्याप्रमाणे बेकायदेशीर कृत्य आहे का ? ' या मुद्दयावर माहिती विचारली होती. तथापि माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी ही माहिती विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास उपलब्ध करुन देणे एवढीच प्रक्रिया सीमित आहे. तथापि अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केलेले त्यांचे अभिप्राय, हे "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. अपिलार्थीने याच अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली उर्वरित माहिती देखील प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. अपिलार्थीने मागणी केलेले मुद्दे वीज नियामक कायद्यामध्ये समाविष्ट नाहीत. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विद्युत कायदा २००३ मध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कायद्याच्या या तरतुदीमध्ये समाविष्ट आहे अशा प्रतीची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे या प्रकरणी भाग होते. तथापि त्यांनी या मुद्दयावर अपिलार्थीस कोणतीही माहिती न देता अपिलार्थीस थकबाकी संदर्भात त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्रामध्ये खुलासा केला आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०४-२००७ रोजी पुरविलेली माहिती अपूर्ण असल्याचे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त

प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, वाडिभोकर रोड, देवपूर, धुळे - ४२४ ००२.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उप विभाग, क्रमांक १, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३०२

निर्णय दिनांक ३१-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मनिष सुरजमल जाखेटे,<br>वाडिभोकर रोड, देवपूर,<br>धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>धुळे | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण<br>कंपनी मर्यादित, धुळे | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, धुळे |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग, धुळे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ३०-०५-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आजपर्यंत त्यांच्या प्रथम अपिलावर कोणतेही आदेश किंवा कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही असे नमूद केले आहे व त्याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये (जो प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांना दिनांक १२-०२-२००७ रोजी प्राप्त) जन माहिती अधिकारी यांच्याकडे विद्युत नियामक आयोग आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कायद्याची माहिती करुन घेण्यासाठी दिनांक २२-१२-२००३ ते ३०-११-२००६ या कालावधीशी संबंधीत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्राहक तक्रार निवारण न्याय मंच यांच्या आदेशाप्रमाणे रुपये १,५२,६७५, दिनांक २२-१२-२००३ पासून ३०-११-२००६ पर्यंत वळती करु नये असे आदेश आहेत का ? एम. एस. इ. डी. कंपनीच्या अधिका-यांच्या मनात येईल तेव्हा सदर रक्कम वळती करावी असा आदेश आहे का ? सदर आदेशाच्या विलंबास एम. एस. इ. डी. चे कोण अधिकारी जबाबदार आहेत. सदरील विलंबामुळे न्यायालयाच्या झालेल्या अपमानास जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर एम. एस. इ. डी. का कंपनीने काय कारवाई केली - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन त्याव्दारे अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, धुळे जिल्हा ग्राहक मंचाने अपिलार्थीच्या थकबाकी बिलातून रुपये १,५२,६७५ इतकी रक्कम वळती करण्याचे आदेश प्रथमः दिनांक २२-१२-२००३ रोजीच्या निर्णयाव्दारे दिले होते. तथापि या आदेशाची अंमलबजावणी करण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे अपील केले. त्या अपिलावर दिनांक २४-०१-२००५ रोजी आयोगाने निर्णय दिला. सदर निर्णय दिनांक १९-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या वीज देयकाच्या बिलातून रुपये १,५२,६७५ इतकी रक्कम जन माहिती अधिकारी

यांच्याकडून वळती करण्यात आली. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये पुढे असा मुद्दा मांडला की, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायालय मंचाने दिनांक २२-१२-२००३ रोजी आदेश देऊनही त्या आदेशाची अंमलबजावणी ऑक्टोबर २००६ पर्यंत झाली नाही, यामध्ये जो विलंब लागला त्या विलंबाप्रीत्यर्थ त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, धुळे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या दिनांक २२-१२-२००३ च्या आदेशावर त्यांनी राज्य ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे अपील केले होते. राज्यस्तरावरील प्राधिकरणाने धुळे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या आदेशास स्थगिती दिली होती. त्यांच्या राज्यस्तरावरील प्राधिकरणाकडे केलेल्या अपिलावर दिनांक २४-०१-२००५ रोजी निर्णय दिला गेला. सदर आदेश त्यांना १९-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संबंधित आदेशाची अंमलबजावणी ऑक्टोबर २००६ च्या बिलामध्ये केली होती. या प्रकरणी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीने कोणत्याही अधिकाऱ्यास आजपर्यंत जबाबदार धरलेले नाही.

राज्यस्तरावरील प्राधिकरणाने धुळे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या आदेशास स्थगिती दिली होती असा जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने युक्तिवाद केला, तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने हे स्थगिती आदेश आयोगास सादर केलेले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात व वास्तावास धरुन नसलेली माहिती काही मुद्दयावर मागितली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ग्राहक मंचाच्या आदेशाच्या अंमलबजावणीच्या विलंबास एम. एस. इ. डी. चे कोण अधिकारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर एम. एस. इ. डी. कंपनीने काय कारवाई केली ती माहिती, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. या प्रसंगी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक १२-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये म्हणजेच अधिनियमातील विहित केलेल्या तरतुदीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला आहे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०-०७-२००८ रोजी निर्णय दिला. या प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देऊन आणि नंतर प्रथम

अपिलावर अंदाजे एक वर्ष दोन महिने इतका कालावधी व्यपगत झाल्यानंतर त्यावर सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये या मुद्दयावरील माहिती पुरविली नसल्याचे आढळून येत आहे व त्याव्दारे त्यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी, अपिलार्थीस देय असलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत मुद्देनिहाय व विनामूल्य पुरवावी. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना, उपरोक्त प्रकरणी संबधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. व जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या अत्यंत बेजबाबदार व बेपवाई कार्यशैलीची, यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे दिनांक २२-१२-२००३ रोजी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाने आदेश देऊनही या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी ऑक्टोबर २००६ ची जन माहिती अधिकारी यांना कोणत्या कारणास्तव वाट पाहावी लागली व अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जर संबंधितांनी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली असेल तर या प्रकरणी, त्यांना आवश्यक वाटल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबधितांवर जबाबदारी निश्चित करावी, असे त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. व्यवस्थापकीय संचालक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, वाडिभोकर रोड, देवपूर, धुळे - ४२४ ००२.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३०३

निर्णय दिनांक ३१-०१-२००९

१ श्री. अन्सारी मो. रमझान मो. मक्की, अपिलार्थी
११२, मो. मक्की मंझील, राजानगर, मालेगाव, तालुका
मालेगाव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०१-०३-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांच्या अपील अर्जावर संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कारवाई केलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-१२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुख्याध्यापक, सरदार हायस्कूल, मालेगाव यांच्यावर बोर्डाने लावलेल्या रुपये १९६०० /- इतक्या दंडाची व त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई होऊन संबंधीत मुख्याध्यापकाच्या दोन वार्षिक वेतनवाढी थांबविण्याच्या आदेशासंदर्भातील माहिती मागितली होती. अपिलार्थीचा या मुद्दयांशी संबंधीत माहितीचा दिनांक ०७-१२-२००६ रोजीचा अर्ज प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांना दिनांक १३-१२-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंबधात अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांच्या दिनांक ०७-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुख्याध्यापक, सरदार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, मालेगाव यांना मार्च १९९३ साली विभागीय मंडळ विभागाने आवेदनपत्र विलंबाने सादर केल्यामुळे केलेल्या रुपये १९६०० इतक्या दंडासंबधीची कागदपत्रे, पत्रव्यवहाराच्या प्रती व मुख्याध्यापक, सरदार हायस्कूल यांच्या दोन वेतनवाढी थांबविल्याबाबतची कागदपत्रे याची माहिती मागवली होती. यापूर्वी १९९३ साली नाशिक विभागीय मंडळ अस्तित्वात नसल्याने जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती देऊ शकले नाहीत, मात्र या संदर्भातील चलन त्यांच्या

कार्यालयात जमा झाल्याचा पुरावा त्यांनी अपिलार्थीस दाखविला. यासंबधातील सर्व कागदपत्रे आता निर्लेखित केली असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ बाबतच्या माहितीसंदर्भात अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, नाशिक बोर्डाच्या सूचनेवरुन त्यांनी या मुद्दयावरील माहितीसंदर्भात सरदार हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, मालेगाव या शिक्षण संस्थेकडे माहितीसाठीचा अर्ज व अपील अर्ज केल्यास संबंधीत मुख्याध्यापक व संस्थाचालक हे त्यांच्या अर्जाचा स्वीकार करत नाहीत व त्यांनी सरदार हायस्कूलकडे केलेली पत्रव्यवहाराची सर्व पाकिटे पोस्ट कार्यालयातून परत येत असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी ज्या दोन मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली होती, त्यापैकी एका मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी निर्लेखित केली असल्याचे अपिलार्थीस अवगत करुन दिले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असण्याचे कोणतेही कारण नाही, कारण मुख्याध्यापक, सरदार हायस्कूल मालेगांव यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून झाली नाही, ही कारवाई सरदार हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, मालेगाव या संस्थेमार्फत झालेली आहे, त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली कागदपत्रे या संस्थेकडे असणार हे उघड आहे, तथापि ही संस्था अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज व अपील अर्ज स्वीकारण्यास नकार देत आहे असे अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन दिसून येत आहे. त्यांच्या युक्तिवादाच्या पृष्ट्यर्थ त्यांनी या संस्थेस पाठविलेली व संस्थेकडून विना तामीली परत आलेली पाकीटे आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीच्या युक्तिवादाचे दृढीकरण होत आहे. या पाकिटावर संबंधीत पोस्टमनने "सदर मालक घेत नाही परत" असे अभिप्राय दिनांक १६-०५-२००६ व दिनांक २५-०५-२००६ रोजी दिले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती या संस्थेकडे उपलब्ध आहे व ही संस्था माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे, कारण सदर संस्थेस शासनाकडून नियमितपणे अनुदान प्राप्त होत असते व या संस्थेवर शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग यांचे पूर्णतः नियंत्रण आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संस्थेचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर हजर नाहीत. सबब शिक्षण उपसंचालक, नाशिक यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने या प्रकरणातील मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती, त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी, संबंधीत संस्थेतील सर्व संबंधितांची हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत बैठक बोलवावी व

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबधीत संस्थेमार्फत उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी. जर विहित मुदतीत संबंधीत संस्थेने अपिलार्थीस माहिती दिली नाही अथवा त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज, प्रथम अपील अर्ज स्वीकारण्यास नकार दिला तर त्यांच्यावर माध्यमिक शाळा संहितेमधील तरतुदीनुसार आवश्यक ती कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षण उपसंचालक यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत संपूर्ण माहिती संबंधीत संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अन्सारी मो. रमझान मो. मक्की, ११२, मो. मक्की मंझील, राजानगर, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४ विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३०९

निर्णय दिनांक ३१-०१-२००९

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, अपिलार्थी
वाडिभोकर रोड, देवपूर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग,
धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०५-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी दिनांक ०९-०२-२००७ रोजी लोडशेडींग मुक्त लाईनविषयी माहिती मागितली असतांना त्यांना आजपर्यंत कोणतीही माहिती अथवा खुलासा प्राप्त झालेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एक्सप्रेस फिडर लाईन (लोडशेडींग मुक्त) बाबत एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २७-०६-२००७ रोजी विनामूल्य पुरविली गेली असल्याने त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे त्यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागणा-या विलंबाची कारणे उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विचारली असता, त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधीक्षक अभियंता यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी लागणार होती, कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रत्यक्षतः अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाच्या ताब्यात होती. कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती किंवा माहितीचा भाग, जर अर्जदाराने ज्या जन माहिती अधिका-यास उद्देशून अर्ज केला आहे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यास त्या जन माहिती अधिका-याने अपिलार्थीच्या अर्जाची प्रत, संबंधीत माहिती ज्या दुस-या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्या दुस-या प्राधिकरणाच्या जन माहिती अधिका-यास, सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (एक) अन्वये पाठविणे व त्याची प्रत अपिलार्थीस देणे गरजेचे आहे. या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे हा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठविणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई त्यांनी केली नाही व अपिलार्थीस त्यांनी स्वतः माहिती देण्याच्या प्रयत्न केला. परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण अनुज्ञेय कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित राहिल्याचे दिसून येते. येथे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा नीट अभ्यास करुन, त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार यापुढे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी येथून पुढे सतर्कतेने कारवाई करावी. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना, राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी व्दितीय अपील केल्यानंतर मिळाल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ३१-०१-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, वाडिभोकर रोड, देवपूर, धुळे - ४२४ ००२.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, क्रमांक १, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर व ग्रामीण विभाग, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६२

निर्णय दिनांक ३१-०१-२००९

१ श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे, — अपिलार्थी
सहाय्यक प्राध्यापक (निवड श्रेणी),
अभियांत्रिकी विद्या शाखा, वाल्मी,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी — प्रतिवादी
वाल्मी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता व सह संचालक,
वाल्मी, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्राध्यापक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस ३१ जुलै २००७ पर्यंत माहिती देण्यात येईल असे प्रथमतः कळविले, तथापि तदनंतर दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना बेकायदेशीररित्या माहिती नाकारली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने केलेला अर्ज इतरांना दाखवून, त्यातील तपशील उघड करुन त्या अर्जाबाबत त्रयस्थ पक्षाचे आक्षेप नोंदविणे हे आक्षेपार्ह आहे व हा गोपनीयतेचा भंग आहे. आपल्या अशा प्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर उचित कारवाई व्हावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये "वाल्मी" या संस्थेवर सिंचन विभागाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या अभियंत्याच्या बाबत एकूण चार प्रपत्राव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संबंधीत अभियंत्याचे जलसंपदा विभागाचे पदनाम, वेतनश्रेणी, सध्याचा पगार, शैक्षणिक पात्रता, सिंचन व्यवस्थापनाचा क्षेत्रीय अनुभव (वर्षामध्ये), वाल्मी येथे पूर्ण केलेल्या प्रशिक्षणांची संख्या, वाल्मीमध्ये ज्या पदावर नियुक्ती झाली त्या पदाचे पदनाम, वाल्मीमधील पूर्ण कालावधी, रजेचा कालावधी, घेतलेल्या व्याख्यानांची संख्या, प्रत्यक्षात व्याख्यानांची संख्या, शैक्षणिक योगदान व वाल्मीने त्यांना दिलेले एकूण वेतन - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती दिनांक ३१-०७-२००७ पर्यंत पुरविण्याचे आश्वासित केले, तथापि तदनंतर दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ८ D व J नुसार देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने मध्यंतरीच्या काळात अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०७-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद विहित मुदतीत व नंतरचा प्रतिसाद वाढीव मुदतीत दिल्याने अपिलार्थीचे अपील कोणतीही माहिती देण्याचे आदेशित न करता अथवा कोणतेही कारण न नोंदविता, निकाली काढले. जन

अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही पूर्णतः सार्वजनिक स्वरुपाची माहिती आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ८ D व J प्रमाणे नाकारली आहे, तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ज्या त्रयस्थ पक्षाशी संबंधीत होती त्या त्रयस्थ पक्षांनी हरकती नोंदविल्याने, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे, उपलब्ध कागदपत्रावरुन, दिसते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील वरील परिच्छेदातील मुद्दयांचे अवलोकन करता, अधिनियमातील कलम ८ D व J हे या प्रकरणी लागू होत नाहीत. कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची आहे. ही माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबतीत कोणताही हस्तक्षेप होईल अशी शक्यता निर्माण होण्याचे कोणतेही कारण आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रामुख्याने, वाल्मी संस्थेकडे जलसंपदा विभागाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-यांचे वेतन, शैक्षणिक पात्रता, रजेचा तपशील, अनुभव इत्यादी संदर्भातील आहे. मूळात त्रयस्थ पक्ष हे वाल्मी या संस्थेकडे प्रतिनियुक्तीवर नेमले जात असतात. यातील सर्व माहिती जलसंपदा विभागाच्या अनेक नस्त्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी व वेगवेगळ्या पातळीवर उघड केलेली असते. यातील अधिका-यांची पदनामे, वेतनश्रेणी ही माहिती तर अधिनियमातील कलम ४ (b) प्रमाणे, स्वंयप्रेरणेने प्रसिध्द करण्याच्या प्रवर्गातील आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस नाकारण्याचे कोणतेही प्रयोजन संबंधीत जन माहिती अधिकारी यांना नसावे. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ३० दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जातील मुद्दा क्रमांक २ बाबत आयोगाचे असे भाष्य आहे की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जी माहिती मागविली आहे त्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाकडे केलेल्या विचारणेसंदर्भात अपिलार्थीचा आक्षेप असल्याचे दिसून येते. अर्जदाराने त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागितल्यास त्यावर काय कारवाई करावी याचे अधिनियमातील कलम ११ मध्ये सविस्तर विवेचन केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, जन माहिती अधिका-यास

अधिनियमातील कलम ११ प्रमाणे कारवाई करण्यास कोणताही प्रत्यवाय नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज ही देखील सार्वजनिक स्वरुपाची माहिती होती. अपिलार्थीस ज्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाची इतर माहिती हवी आहे व ती सार्वजनिक असल्याने ती अपिलार्थीस देण्याचे आयोगाने आदेशित करावे अशी त्यांनी विनंती केली आहे. त्याप्रमाणे व त्याच तत्त्वावर अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षास जन माहिती अधिकारी यांनी दाखविली त्यात जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही गैर कृती केलेली नाही, तसेच अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उचित कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे, या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतूतः अथवा कोणत्या असद्‌हेतुने नाकारल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीस माहिती नाकारतांना त्यांनी त्यांच्या दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अधिनियमातील योग्य त्या कलमांचा उल्लेख करुन अपिलार्थीस माहिती नाकारल्याची कारणे अपिलार्थीस कळविली आहेत. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे, सहाय्यक प्राध्यापक (निवड श्रेणी), अभियांत्रिकी विद्या शाखा, जल व

भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, पत्रपेटी क्र. ५०४, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६३

निर्णय दिनांक ३१-०१-२००९

१ श्री. हेमंत श्रावण खोतकर, अपिलार्थी
गुलमोहर कॉलनी, पडेगाव,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (सिंचन), औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवस पूर्ण होऊन गेल्यानंतरही माहिती न दिल्याने व त्याव्दारे त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा भंग केल्याने त्यांच्यावर

अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना तात्काळ व मोफत पुरवावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व तसेच आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद यावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), औरंगाबाद यांच्याकडे सन २००५ ते २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन) उपविभाग, कन्नड यांची नेमणूक केली गेली असल्याने अपिलार्थीचा दिनांक १४-०५-२००७ रोजीचा अर्ज त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०५-२००७ रोजी हस्तांतरीत केला. सदर अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २४०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता माहिती न मिळाल्याच्या कारणास्तव अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०७-२००७ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीस अपिलार्थीस हजर राहिले नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांच्या कार्यालयातील इतिवृत्त तयार केले असून त्यामध्ये अपिलार्थी गैरहजर असल्याचा उल्लेख केला आहे व त्यांनी आवश्यक असलेले माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले नसल्याचा उल्लख केला आहे. सदर इतिवृत्त जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही, परंतु माहिती पाहण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर राहिले असता, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १४-०५-

२००७ रोजीच्या अर्जाव्दारे, जो त्यांना कार्यकारी अभियंता, यांच्याकडील दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला त्या संदर्भातील माहिती दिनांक १०-१२-२००८ रोजी दाखविली असून ही माहिती पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक १०-१२-२००८ रोजीचे पत्र आयोगास दाखविले. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांनी मागितलेली माहिती पाहण्यासाठी मिळाली असून, त्यामध्ये, त्यांना सध्या माहितीच्या प्रतीची आवश्यकता नाही, असे लिहून दिले आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची कारवाई अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत केली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी, आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये न केल्याने, तेच जबाबदार असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे यासंदर्भात कोणताही उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी आयोगासमोर हजर नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ३१-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत श्रावण खोतकर, गुलमोहर कॉलनी, पडेगाव, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.